REGISTERED No. N.

वर्गणी आगाऊन दिली पाहिजे.
किरकोळ अंकास.....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ६० १
दर ओळीस........ ८१ ०१
दुसरे खेपेस.... .... ....८१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ...................... 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 6 JUNE 1904 NO 22

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख ६ माहे जून सन १९०४ इ० अंक २२

### नोटीस.

रा. रा. नानुराम मलराज मालक मलराज नानुराम मारवाडी राहणार दापुर पोस्ट बोरगांव मंजु तालुके आकोले यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं रामचंद्र मनाजी राहणार दहीगांव यांजवर दि. मु. नंबर २६७/१८९८ चा हुकुम मिळविला व द. र. नंबर २७९ सन १९०३ ची दिली आणि मौंजे दहीगांव येथील शेत सर्व्हे नंबर ६४ पैकीं एकर ९.८२९ आकार रुपये २१ हे शेत सदर्हू रामचंद्र मनाजी याजपासून तारीख २४।३।१९०४ इसवी रोजीं खेरदी घेतले त्याचे किंमती बद्दल रुपये तुह्मास तुमचे वरील हुकुमनाम्याचें देणें आहेत ते रुपये तुह्मी रा. रा. नारायण काशीनाथ दाते वकील आकोला यांचे जवळ तुमचे करितां धरवर टेविले आहेत तरी तुह्मी ही नोटीस पावल्या दिवसापासुन आठ दिवसाचे आंत तुमचे एकंदर हुकुमनाम्याची रकम जितकी निघत असेल तितकी चुकती घेऊन त्याज-बद्दल त्याना पावती लिहून देणें. कळावें. तारीख १।६।१९०४ इसवी०

सही

विश्राजी सखारामजी निशामी
खुद. राहणार दहिगांव
पोस्ट— बोरगांव मंजु

---

सर्व्हे २८ चे शेताचें खातें तुमच्या नांवानें असून यांत तुमचा तिसरा हिस्सा आहे. हा हिस्सा तुह्मी विकण्याच्या विचारांत आहां असें कळलें. आमचा अग्रक्रयाचा अधिकार असूनही तुह्मी आह्माला न विचारतां हा हिस्सा दुसऱ्यास विकीत आहां आणि आह्माला फसविण्यासाठीं त्या खरेदीखतांत भरकाच आंकडा खरीदींत लिहिणार आहां असें ऐकतों. आह्मालाच तो हिस्सा तुह्मी विकावा. तुह्मी सन्यास विक्री करूं नये आणि विनाकारण आह्मास दिवाणीच्या खर्चांत घालूं नये ह्मणून तुह्मांस मुद्दाम ही जाहिर नोटीस दिली आहे. कळावें तारीख २ जून १९०४ इसवी.

सही

लक्ष्मण वल्लद कृष्णाजी
माळी राहणार आलंद
नी० खु० हातची रेघ

---

### जाहिरात

सर्वत्र लोकांस या जाहीर नोटिशीनें कळविण्यांत येते कीं माझा मुलगा नांवें भगवानसिंग वल्लद गुरुदत्तसिंग शीख राहणार ताजना पेठ आकोला हा माझे सांगण्याविरुद्ध वर्तन करी। असून गैर चालीचा निघाला आहे. तर तो कोणाजवळ घर किंवा घरांतील चीजवस्त गहाण टेवील अगर कोणाचें कर्ज वगैरे काढील तर त्यास गहाण वगैरे टेऊन पैसे देऊ नये व कर्जही देऊ नये. दिल्यास त्याबद्दल मी व माझी इस्टेट जबाबदार होणार नाहीं [illegible] सूचना केली आहे. कळावें.

सही

गुरुदत्तसिंग वल्लद मोबासिंग
शीख राहणार ताजनापेठ
आकोला दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

बेशमी सयद गफरू वल्लद सयद इमाम राहणार आळंद रस्तुमाबाद तालुका आकोला यांसः—

खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं मौंजे आलंदे येथील

---

### जमिनीचें वर्गीकरण व तिचे गुणधर्म

जमिनीच्या नापीकपणाचीं मुख्य कारणें अशीं आहेत कीः—

(१) जमीनींत वाळू, चिकणमाती चुना, सेंद्रिय अंश किंवा वित जंगलें लोखंड हीं पाहिजे त्यापेक्षां अधिक प्रमाणांत असलीं पाहिजेत.

(२) जमीनींतील मातीचा पापुद्रा फार पातळ असून त्याखालीं लागलीच कठीण खडक असेल.

(३) शेतांतील पाणी निचरून जाण्यास मार्ग नसल्यामुळें तें शेतांतच सांठून राहत असावें.

(४) जमीनींत क्षारोत्पादक पदार्थ फार असल्यामुळें जमीनींत आंबोशी येत असेल किंवा वनस्पति घातक क्षार जमीनीवर येत असतील. जो पदार्थ जमीनीच्या पोटात फार असेल ह्मणजे त्यांच्यांत रासायनिक किंवा हवा [illegible] पाहून जमीनीत नवे नवे क्षार उत्पन्न होतात व त्यामुळें तेथें कोणतींही पिकें जगत नाहींत.

हवामान, पाऊस, व जमीनीच्या अंगीं पाणी साठवून ठेवण्याची शक्ती असण्याची अवश्यकता.

हवेची अनुकूलता—एकंदरींत थंड हवा व चांगला पाऊस पडला असता ह्मणजे त्या वर्षी शेतकरी वर्गाची सुबत्ता आहे असें समजावें. अशा प्रकारचें हवामान असलें ह्मणजे त्या प्रदेशांत बटाटे, द्राक्षें, अननस वगैरे बागाइती पिकें चांगलीं होतात. त्याच प्रमाणें इतर सर्व प्रकारचीं पिकें शेतकऱ्यांस त्रास न पडतां पिकतात, व पिकानां वरून पाणी देण्याची अवश्यकता राहत नाहीं.

हवेची प्रतिकूलता—ज्या ठिकाणीं हवामान अनुकूल नसेल त्या ठिकाणीं हवेची रुक्षता झाडें वगैरे लावून मनुष्यास कमी करितां येण्यासारखी आहे. अशा ठिकाणची जंगल कटाई अति बेपर्वाईनें केली ह्मणजे तेथील हवामान ज्यास्त ऊष्ण होतें; त्याच्या उलट सर्व देशभर झाडें लावून जंगल वाढविलें तर तेथची हवा थंड व स्थीर होते. सोसा ट्याचे वारे सुटले ह्मणजे जोंधळा, मका व केळी सारखीं उंच वाढणारीं पिकें किंवा द्राक्षवेल व नागवेलीचे झाडें यांची फार नासाडी होते ह्मणून ते शेतकीस फार अपायकारक आहेत. तशांतून वारा जर रखरखीत व अति ऊष्ण असला तर मग पिकाचा आदीं समूळ नाश होण्याची भीति असते; कारण रुक्ष हवेनें जीवंत झाडांतीलच आर्द्रता काय पण जमीनींतील ओलावा व तळ्यांतील पाणी सूद्धां सुकून जातें. त्याचप्रमाणें अति थंड व सार्द्र वारा सुटला ह्मणजे तो झाडासच हानीकारक असतो असें नाहीं तर तो प्राणिमात्रासही अपाय कारक आहे.

वऱ्हाडच्या पावसा संबंधानें माहिती—वऱ्हाडांतील शेतीचा हंगाम पावसाळ्याच्या अगोदर दीड दोन महिन्या पासून ह्मणजे ग्रीष्म ऋतूपासून सुरूं होतो. अश्विनी व भरणी या नक्षत्रांतील पर्जन्यवृष्टी विशेष महत्वाची नाहीं या पासून जरी कोणत्याहि प्रकारची हानी नाहीं तरी त्यापासून शेतीला विशेष फायदाही होत नाहीं. कृत्तिका व रोहिणी या मधील पाऊस बराच महत्वाचा आहे. हा जरी अनिश्चित असतो व त्यावर कोणी भिस्त ठेऊन राहत नाहीं तरी या नक्षत्रांत पाऊस पडल्यास शेतीच्या किस्तगारीस मदत होते. नांगरून ठेवलेल्या जमिनीचीं ढेंकळें या पावसानें मऊ होऊन फुटतात शिवाय कापसाची पेरणी जरी नित्य [illegible] व हंगामशीर आहे असें वाटल्यास शेतकरी लोक कापसची पेरणी या नक्षत्रांतही करतात, व पेरणी साधल्यास ती योग्य काळीं जाहली असें मानलें जातें.

वर्षा ऋतू अथवा खरीपाचा पाऊस- या काळाची अति महत्वाची वेळ मृग ऋतूची होय. कपाशीच्या हंगामाची सर्व भर या नक्षत्रावर आहे व याच नक्षत्रांत कपाशीच्या पेरण्या सार्वत्रिक सुरूं होतात. मृगाच्या पावसाच्या अभावीं आर्द्रामध्येंही पेरण्या करतां येतात पण पूर्वीच्या पेरण्याची बरोबरी आर्द्राच्या पेरण्यानें होत नाहीं व तितकें पीकही येत नाहीं. याच नक्षत्रांत मका, राळा व भात यांची पेर होते.

मृग नक्षत्रांत पावसाची सुवृष्टी झाली असल्यास आर्द्राच्या पावसाची जरूरच आहे असें नाहीं. तथापि यामध्यें पावसाची बुरबुर आल्यास वाईट नाहीं. पुनर्वसु मध्यें जवारी पेर होते. गत नक्षत्रांत भरपूर पाऊस पडला असल्यास आतां उघाडी पडलेली चांगली. पण तीं जर कोरडीं गेलीं असतील तर पर्जन्यवृष्टीची या नक्षत्रांत अत्यंत जरूरी आहे.

पुष्य नक्षत्रांत जवारीची पेरणी होते. आतां थोडथोडा पाऊस येणें चांगलें पण आतां पर्यंत पाऊस जर खूप झाला असेल तर त्याचीही जरूरी नाहीं. आश्लेषा मध्यें मात्र पावसाची बुरबुर चालूं राहिली पाहिजे. अतिवृष्टि किंवा अति आकर्षण दोन्हीही अपाय कारक आहेत.

शरदृतु अथवा रब्बीचा पाऊस—मघा व पूर्वा नक्षत्रांत तीळ व करडी पेरतात. याही वेळेस भिज पाऊस पडला पाहिजे व मधून मधून उघाडी असली ह्मणजे फायदेशीर असते.

उत्तरा नक्षत्रांत हरभऱ्याचें बीं जमीनींत टाकतात व यावेळीं पावसाची फार जरूर असते तथापि झड लागल्यास कापसाची खराबी होते. या नक्षत्रा नंतर सर्व पावसाळ्यांत मृग नक्षत्राप्रमाणेंच महत्वाचें असें हस्त नक्षत्र येतें. पूर्वीच्या नक्षत्रामध्यें कशीही पुरी अपुरी पर्जन्यवृष्टि झाली असली तरी सर्व पिकांस या नक्षत्रांतील पाऊस अत्यावश्यक असतो. हत्तीचें नक्षत्र कोरडें गेलें तर त्यापासून पिकास बराच धोका पोंचतो. त्याच्या उलट या नक्षत्रांत जर मुबलक पाऊस पडला तर पूर्वीच्या नक्षत्रांतील पावसाची न्यूनता चांगली भरून येते. जवस, हरभरे, लाख, व वाटाणा हीं पिकें पेरण्याची हीच वेळ आहे. हस्तांमध्यें जर पडावा तसा पाऊस पडला तर चित्रांतील पावसाची जरूर राहत नाहीं इतकेंच नाहीं तर त्या वेळीं पाऊस पडूंही नये. हस्तांतच [illegible] चित्रापासुन पिकांचा बचाव होईल पण झालेली नुकसानी भरून येण्याचा संभव

पर्जन्योत्तर वृष्टि— स्वाति व विशाखामध्यें पाऊस नको असतो कां कीं त्यामुळें पिकास अपाय होतो. पण अनुराधा नक्षत्रांत रब्बीचे पिकास थोडासा भिजपाऊस आलेला चांगला. व मागील नक्षत्रें कोरडीं गेलीं असतील तर यावेळीं पाऊस येणें फार फायद्याचें असतें. या नंतर पावसाची मुळींच जरूरी राहत नाहीं इतकेंच नाहीं तर त्यामुळें मळणी वगैरे पुढील कार्यास व्यत्यय येऊन उभे असलेल्या पिकांची न मात्राची नासाडी होते.

---

वऱ्हाडसमाचार

तिथी अधिक जेष्ठ वद्य ८ शके १८२६

## रणसंग्राम

सध्यां आशिया खंड हें लढाईचें मुख्य स्थळ बनलें आहे. पाश्चात्य राष्ट्रांनीं पूर्वेकडील राष्ट्रांमध्यें आपलें साम्राज्य वाढवावें असा आजकालचा मनु आहे. हें चक्र असेंच पूर्वेकडे फिरत चाललें होतें इतक्यांत त्या चक्राची नेमी फिरवून टाकणारी नवीन चालक शक्ती पूर्वेकडील राष्ट्रांत उत्पन्न झाली ही आनंदाची गोष्ट होय. रशिया व जपान या दोन राष्ट्रांमधील लढाईंत या नव्या शक्तीचें प्रदर्शन उत्कृष्ठ होत आहे. रशिया सारखें प्रचंड राष्ट्र दुसरें नाहीं असें आह्मी पुस्तकांतून वाचीत आलों पण जपानच्या चिमुकल्या राष्ट्रानें जी नेटानें, उत्साहानें व बहादरीनें लढाई चालविली आहे तिजमध्यें रशियाची पिच्छेहाट एकसारखी होत चालली आहे. रशियाला आपलें पाउल मागें मागें घ्यावें लागत आहे. यालू नदीवर जपानानें जी लढाई दिली तींत जपानची सरशी झाली तेव्हां असा तर्क निघाला होता कीं रशियाच्या मनांतून शत्रूला असेंच पुढें पुढें येऊं द्यावें आणि एकदम छापा घालून शत्रूची दाणादाण करावी असा प्रथम बेत होता. यालूच्या लढाईसंबंधानें ही गोष्ट थोडीशी जमेला धरली तरी नुकतीच किनचॉ येथें मोठी लढाई झाली तेव्हां रशियाचीच पुनः दाणादाण झाली आणि जपानी लष्करानें मोठ्या कर्तबगारीनें विजयश्री संपादली. किनचॉचा किल्ला सर केला तेव्हां पांच दिवस युद्ध चाललें होतें. रण मोठ्या निकराचें होतें. आणि रशियानें देखील आपली पराकाष्ठा करून पाहिली. जपानची जयश्री आणि रशियाची पादाक्रांती या दोन गोष्टी पूर्वेकडे प्रचलीत असलेली नवी क्रांती जगास विदित करीत आहेत. पाश्चात्य साम्राज्याचा मक्ता जपानानें हिसकाऊन घेतला आहे आणि जपान व त्या राष्ट्राच्या बरोबरीनें

[illegible]हाट मागें हटवितील इतकेंच नाहीं तर पूर्वेत्य साम्राज्याची जाणीव पाश्चात्य राष्ट्रांस चांगली करून देतील. साम्राज्याचा इतिहास घड्याळाच्या आंदोलकाप्रमाणें आहे. हा आंदोलकाचा झोका पूर्वेकडील अंतिम प्रदेशाला स्पर्श करून चुकला आहे. आणि आतां त्या आंदोलकाची गती पूर्वेकडून पश्चिमेकडून वळली आहे. जपानमध्यें पुष्कळसा जीव आहे. त्या राष्ट्राला राष्ट्रीय प्रगती साठीं आपल्या व्यक्तिविषयक गोष्टी विसरण्याची कला चांगली कळली आहे. ही राष्ट्रीय प्रेरणा सर्व राष्ट्रांतील लोकांचा एकजीव करून सोडीत आहे आणि ह्मणूनच जपानाची सरशी व जयश्री आमच्या डोळ्यांला संतोषवीत आहे.

जपानाच्या ओघानें तिबेटाची आठवण सहजी होते. तिबेटाची स्वतंत्रता लयास जात आहे ही गोष्ट आह्मांसच काय पण आमच्या राज्यकर्त्यांसही सुखद वाटणार नाहीं. तिबेटाची मोहिम आमच्यात राज्यकर्त्यांनीं सुरू केली आहे तेव्हां आमच्या इंग्रजी भक्कम शक्तीची वाखाणणी करावी किंवा तिबेटीपणा कायम राखण्या साठी जीव कीं प्राण करणाऱ्या शत्रूंची तारीफ करावी हा एक गूढ प्रश्न आहे. ट्रान्सव्हालच्या लढाईत बोअर लोकांचे पराक्रम चकित करीत तेव्हां त्यांचा धन्यवाद तोंडीं आपोआप येई पण तिबेटाच्या लढाईंत मनाची स्थिती अगदीं विचित्र होते. थोड्या दिवसां पूर्वीं जैनी खेड्या जवळ एक चकमक झडली तेव्हां त्या खेड्याची तटबंदी सुरुंगानें उडवून दिली तरी तिबेटी लोकांनीं मोठ्या कंटकपणानें व शौर्यानें लढाई केली पण अखेरीला तोफांच्या भडिमारापुढें प्राण सोडून ते जीवन्मुक्त झाले. ही जीवन्मुक्ती तिबेटाचा राष्ट्रीयपणा व्यक्त करीत आहे. या मोहिमेचा शेवट उघडच आहे, हत्तीनें चालविलेल्या तुडवातुडवीपुढें तिबेटी क्षुद्र लोक कितीसा जीव धरणार ! ही तिबेटची मोहिम लवकर बंद होईल तरी बरी. तिबेटी रानवटपणाशी आमच्या राज्यकर्त्यांस कांहीं कर्तव्य नव्हतें. पण सुधारणेचा झेंडा रोंवण्याची ही साम्राज्य तृष्णा इंडियाला फार भोगावी लागत आहे ह्मणून फार दुःख होतें.

## राष्ट्रीय जिव्हाळा

इंडिया हें महान राष्ट्र खरें. पुष्कळशा देशी राज्यांचें एक राष्ट्र बनलें आहे. ब्रिटिश साम्राज्यानें हीं जुनीं राज्यें एकवटलीं आणि तेव्हांच देशी छोट्या छोट्या राज्यांचीं मूळचीं स्वातंत्र्यें नष्ट झालीं. या साम्राज्याच्या क्रांतीनें आमचें एक नवीनच राष्ट्र होत आहे. आमचा प्रजाधर्म आमचा एकजीव करीत आहे, किंबहुना हा एक जीव पूर्वीच होऊन चुकला आहे. आमचा आपलेपणा निराळ्या कोटींतला आहे. पूर्वीच्या छोटेखानी आपलेपणाला नवी उन्नतर गती मिळत आहे. आह्मी जुना आपलेपणा विसरावयाचा नाहीं तर त्या जुन्या आपलेंपणाला नवी समदृष्टि जोडून द्यावयाची आहे. पूर्वी हिंदू मुसलमान इत्यादि आपपर-

हिंदू मुसलमान, पार्शी इत्यादि विजातीय धर्मवाली मंडळी आपल्यांतील परकीयपणा सांडून टाकीत आहेत. या नव्या क्रांतीच्या बुडाशीं सर्वांचेंच कल्याण आहे पण हें कल्याण सर्वांचा एकजीव होण्यामध्यें आहे. हा एकजीव बरोबर होत नाहीं. आणि ह्मणूनच अह्मी मृत राष्ट्राच्या जोडीला जाऊन बसा आहों. आमच्यामधील ही मृतकला जाई पर्यंत आमचे राज्यकर्ते आह्मांस परकी लेखतील, आह्मांस दूर दूर अंतरावर ठेवितील आणि आमच्यामध्यें कांहीं दर्शनीय सद्गुणांचा जिव्हाळा पुनः खेळूं लागे पर्यंत त्यांच्या ठायीं आह्माविषयीं आदरभक्ती जागृत राहणार नाहीं. राज्यकर्त्यांपुढें आह्मी दास्यत्वानें हात पसरतों, आणि आह्माला हीच संवय फार लागली आहे. त्यामुळें 'न मागे तयाची रमा होय दासी' यांतील खऱ्या रहस्याविषयीं आह्मी आंधळे बनलों आहे.

आमची ब्रिटिश रमा आह्मावर कृपा करील तो दिवस सोन्याचा होय. हल्लीं त्या राज्यदेवीची प्रतिसारणाची क्रिया आह्मावर चालूं आहे. हल्लींची वेळा मोठ्या आणिबाणीची आहे. आह्मी या सांप्रतच्या ब्रिटिश क्रांतींत कोठें जाऊं याचें कांहींच अनुमान बांधता येत नाहीं. निराशा, दास्य, विस्खलितपणा, भेदाभेद, फाटाफुटी इत्यादि कारणांनीं आमचे लोक मृत राष्ट्राच्या पदवीला पोंचत जातील. कदाचित हा काल असा आहे कीं मागील अनुभवाचा फायदा करून घेतला, नवीन राष्ट्रीय प्रेरणा चांगली अंतर्बाह्य बिंबली आणि इतिहासज्ञांच्या ह्मणण्या प्रमाणें नवा आपले पणा आमच्या मध्यें खरा राष्ट्रीय जिव्हाळा उत्पन्न करील तर आह्मी एक राष्ट्र होऊं आणि ब्रिटिश राष्ट्राचें शिखर सर्व जगांत उंच होऊन जगाला प्रकाशमान करील.

आमचा भावी मार्ग राष्ट्रीय सभा दाखवीत आहे आणि याच मार्गांत आमचे राष्ट्रीय जिव्हाळे आहेत. या संबंधानें बंगाल्याचे प्रसिद्ध जमेदार राजा प्यारी मोहन मूकरजी हे थोडे दिवसापूर्वीं बोलले कीं जपान काय आणि इतर युरोपांतील राष्ट्रें काय या सर्वांच्या मोठेपणाचा खरा जिव्हाळा त्यांच्या त्यांच्या राष्ट्रीय प्रेरणामध्यें आहे. राष्ट्रीय प्रेरणा जर आह्मा मध्यें नाहीं तर नाना कला कौशल्यें हीं आह्मा मध्यें वाढण्याचा संभवच नाहीं. त्यांचा पुढील उद्गार असा आहे कीं इंडिया ह्मणजे गुलाम पैदा करण्याचीच भूमी राहावी असाच ईश्वरी संकेत असला पाहिजे असें मला वाटत नाहीं. ब्रिटिश इंडियाचा इतिहास ह्मणजे सदा सर्वकाळ निव्वळ प्राणधारणेचा जीवनकलह आणि बळी तो कान पिळी या संहारकारी बलवानांचे खेळ यांचाच इतिहास राहील अशी माझी मनदेवता साक्ष देत नाहीं. ईश्वरी कृपेंतला हा देश दिसतो. निसर्गतः रमणीय व श्रीमान असा हा देश आहे; येथील कल्याणकारी धर्माच्या छत्राखालील लोक समूह केव्हां तरी मागें पुढें विद्यमान राष्ट्रामध्यें उन्नतर पायरीला चढला पाहिजे. राजा प्यारी मोहन मकरजी आणखी ह्मणतात कीं आमच्या लोकांमध्यें हा सद्गुण आला पाहिजे कीं आपला आपलेपणा कमी झाला पाहिजे, आपल्याच पायावर धोंडा पाडून ओढण्याची संवय कमी व्हावयाला पाहिजे, कांहीं तरी अधीक राष्ट्रीय जिव्हाळा आपल्या सर्वांच्या मनांतून खेळूं लागला पाहिजे, व्यक्ती विषयक आपलेपणा थोडा विसरला पाहिजे आणि सर्व समूहासाठीं झीज सोसण्यास शिकलें पाहिजे. राजा प्यारी मोहन यांचे वरील उद्गार चिर स्मरणीय आहेत. खरा राष्ट्रीय जिव्हाळा खरा आह्मी ओळखला पाहिजे. हल्लीं आपण आपल्या जुन्या साधुसंतांच्या पुण्यतिथींचे उत्सव करितों, जुन्या मुत्सद्यांची व छत्रपतीची आठवण त्यांच्या सद्गुणांनीं सर्वांस करून देत आहों, इत्यादि गोष्टी आमच्या मनोवृत्तींला योग्य शिक्षण देतात व आह्मा मधील खरा आपलेपणा सजीव करीत आहेत. हा आपलेपणा पुनः अंगीं येतांना त्या त्या काळचा मत्सर, धर्मभेद इत्यादि भेदक गोष्टी आह्मापासून आपोआप गळून पडत आहेत हें पक्कें ध्यानांत धरलें पाहिजे. याचा प्रत्यक्ष दाखला आह्मांस राष्ट्रीय सभेच्या बैठकींत सांपडेल. हिंदु, मुसलमान, पार्शी किंबहुना कांहीं कळकळीचे राज्यकर्तेही आमच्या राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सर्व देशाच्या कल्याणसंपदा उघड्या व खुल्या करूं पहात आहेत. असा हा अप्रतिम देखावा नवा राष्ट्रीय आपलेपणा चांगला व्यक्त करितो. या राष्ट्रीय जिव्हाळ्यामुळें सर्व भेदक गोष्टी लयास जात चालल्या आहेत. हल्लीं लार्ड कर्झनच्या बादशाही दडपशामुळें लोकपक्षाची पिच्छेहाट झाली तरी नवीन एकजीव करणारा राष्ट्रीयपणा आमचा भावी कार्यक्रम जोरानेंच चालवीत आहे. कर्झनशाहीच्या आघातामुळें आमचा राष्ट्रीयपणा चेंडू सारखी उशी घेऊन उंच वर उडेल यांत आह्मांस बिलकूल संदेह वाटत नाहीं. राष्ट्रीय सभा ह्मणजे सुशिक्षित लोकसमूहाची मुख्य प्रेरणाशक्ति होय. हल्लीं जी औद्योगिक चळवळ सुरूं आहे. ती या राष्ट्रीय सभे मुळेंच आहे. इंडियांत राजिक चळवळीच्या पाठोपाठ ही औद्योगिक चळवळ सुरूं झाली आहे इतकेंच नाहीं तर त्या परस्पराच्या मुख्य जीवनशक्ती आहेत जपानाची उत्क्रांती या दोन चळवळी मुळेंच एवढी मोठी झाली आहे. जपानच्या उत्क्रांतीचें आदीकारण ह्मणजे त्या देशाचा राष्ट्रीयपणा होय. हा अंतस्थ जिव्हाळा आह्मामध्येंही संचरूं पहात आहे आणि त्याच्याच जोरावर आह्मी ह्मणतो कीं ईश्वर भाग्यसंपदांचा पाऊस आपल्या या देशावर लवकरच पाडील !

## मारवाडी

मारवाडी हा वर्ग तत्वबुद्धीचा आहे. त्याला कोणत्या विद्येचा किती पसारा पाहिजे हें चांगलें समजतें. मारवाडी सरकारी चाकरीच्या नादीं कधींच पडत नाहीं; आणि ह्मणूनच त्याला कधीं बी. ए. एम. ए. पर्यंतच्या अभ्यासाचा खटाटोप करावा लागत नाहीं. त्याला न्यायाधिशाची जागा नको, वकिलीचा धंदा आवडत नाहीं, इंग्रजी डाक्टरीची त्याला गरज नसते, इत्यादि गोष्टींनीं त्याच्या गरजा संकुचित झाल्यामुळें तो इंग्रजी विद्येच्या अट्टाहासामध्यें बिलकूल पडत नाहीं. त्याला त्याच्या व्यवहाराचें धोरण मुख्य असतें आणि त्या व्यवहाराला अवश्य लागणारी विद्या शिकण्या पलिकडे तो फारसा जात नाहीं. कोणत्या विद्येची चहा किती ठेवावी हें आमच्या मारवाडी बंधुवर्गापासून सर्वांनीं शिकावें असें आह्मी मुद्दाम सूचवितों. इंग्रजी अंमलांत सरकारी चाकरीच्या पायीं आमच्या लोकां पैकीं

पांढरपेषा मंडळीचा किती तरी काळ व्यर्थ खर्चला जातो ! इंग्रजी विद्यांच्या पायीं आमची तरुण मंडळी अगदीं निर्जीव होते व त्यांचा काल, पैसा व शक्ती यांचा फार ऱ्हास होतो हें सांगतांना आमचा एक विनोदी विद्वान् मित्र सहजीं ह्मणाला कीं आमच्या देशाच्या मागें दोन ब्रिटिश कायदे जबरदस्त लागले आहेत. पहिला हत्यारांचा कायदा व दुसरा शिक्षणाचा कायदा. आह्मी हत्यारांस शिवूं नये आणि पुस्तकांच्या भांडाराखालीं मान वर करूं नये असा हा दुर्धट प्रसंग आहे. वरील विचारांत पुष्कळशी अतिशयोक्ती आहे तथापि त्यांतील तथ्यांश आपण मारवाडी दृष्टीनें स्वीकारला पाहिजे.

थोड्या महिन्यांपूर्वी आह्मी विद्यार्जनाच्या कालाची मर्यादा मनुष्य वयांत येण्याला जो काल लागतो तों पर्यंतची असावी असें ह्मटलें होतें. विद्यार्थी दशा मनुष्य वयांत येतो तेव्हांच संपावयाला पाहिजे ह्मणजे वयाच्या १८ वे वर्षी ह्मणा किंवा सिव्हील सरव्हिसच्या वयाच्या इयत्ते प्रमाणें २१ वे वर्षी ह्मणा मनुष्याला दुनियेदारीला लागतां आलेंच पाहिजे. ज्याला त्याला आपला पोटापाण्याचा उद्योग संपादलेल्या विद्याधनावर चालवितां आला पाहिजे. आमच्या देशाचा प्राचीन इतिहास कदाचित ब्रह्मचर्याची मर्यादा अधीक वया पर्यंत वाढवील पण सध्यांच्या जीवनकलहा पुढें वयाची १९ वे किंवा २१ वे वर्षाची मर्यादा स्वीकारली पाहिजे. त्या शिवाय आमच्या पूर्वीच्या मर्यादा पुष्कळच सुटल्या आहेत तेव्हां जुनें दीर्घकालीन ब्रह्मचर्य आह्मांस कितीही पहिजे असलें तरी सध्यांच्या पिढीला हा विद्यार्जनाचा काल विद्यमान विपत्कालीं पुढें ढकलतां येण्यासारखा नाहीं.

—•—

इंग्रजी विद्याभांडार मोठें आहे पण आपण तत्वदृष्टीनें त्या भांडारांतून स्वतांच्या गरजा प्रमाणें विद्यारत्नें वेंचून घेतलीं पाहिजेत. अशाच प्रकारचा विचार सरकारच्या मनांत विशेष घोळत होता; आणि ह्मणूनच त्यांनीं प्राथमिक शिक्षणाचे दोन भाग करण्याचा विचार केला आहे. नागरिक प्राथमिक शिक्षणाचा क्रम असा ठेवावयाचा आहे कीं त्याच्या योगानें पुढील उच्च प्रतीचा वाङ्मय याचा अभ्यासक्रम सुलभ होईल. त्याच्या उलट खेडे गांवाच्या शाळांतून निराळाच प्राथमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम चालूं करण्यांत येणार आहे. या शिक्षणाला ग्राम्य प्राथमिक शिक्षण अशी संज्ञा दिली तरी वावगी नाहीं. या नवीन शिक्षणाला प्रारंभ मध्य प्रांतांतून करण्यांत आला आहे असें कळतें. तेथें अर्ध्या वेळाच्या शाळा ठेविल्या आहेत; आणि बाकीच्या वेळांत शेतीचें काम शिकविण्यांत येतें. मूळ उद्देश असा आहे कीं शेतकऱ्यांच्या मुलास शेतीच्या धंद्याविषयीं चौकसपणा व शोधकपणा यावा आणि त्यांस नित्याच्या देवींघेवीचें व सावकारी धंद्याचें यथायोग्य ज्ञान व्हावें. त्यांचीं क्रमिक पुस्तकें साध्या व सोप्या भाषेंत असावीं, आणि त्यांतील विषयींही नित्याच्या परिपाठांतले असावेत. व्याकरणाची थोडीशी ओळख पुरें आहे. हिशोबाची माहिती चांगली करून दिली पाहिजे. असा शिक्षणक्रम चालूं करण्यापूर्वी शिक्षकवर्गही चांगला पाहिजे. आणि त्यांस हें नवें धोरण पूर्णपणें कळलेलें पाहिजे. चांगला शिक्षकवर्ग मिळविण्यासाठीं पगाराची योजना अधिक उदारपणानें व्हावयाला पाहिजे असें आह्मी ह्मणतो. आमच्या प्रांतांतहि हा मध्यप्रांतील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास कर लाकरच सुरू व्हावयाचा आहे. ही सुधारणा आह्मी मोठ्या आनंदानें पसंत करितों आणि इतकेंच इच्छितों कीं प्राथमिक क्रमा पुढील विद्याभ्यास देखील उपयोगाच्या दृष्टीनें बदलण्यांत येईल तर सरकाराचे तरुण पिढ्यांवर मोठे उपकार होतील. सध्यांचा विद्याभ्यास उपयोगाच्या बाजूनें पुष्कळच छाटण्यासारखा आहे आणि ती छाटछाट लवकर होईल तितकें फार उत्तम !

—:•:—

## निजामशाही

निजामशाहीचा व आमच्या प्रांताचा अर्थाअर्थी कांहींच संबंध राहिला नाहीं. निजाम सरकारची प्रजा ह्मणून आमचे कहींच हक्क नाहींत. वऱ्हाडाचा पूर्व संबंध अगदींच तुटला आहे आणि मध्यप्रांताशीं जोडलेला नवा संबंध आह्माला अजीं परको अंमलासारखा वाटत आहे तरी हळूंहळूं आह्मी मध्यप्रांताच्या राजरिवाजांशीं ओळख करून घेत आहों. निजामशाहीचा संबंध तुटला तेव्हांच आमच्या प्रांतिक लोकांस फार विषाद वाटला. पण कांहीं अनिवार्य गोष्टी असतात आणि तशांतलाच हा नवा राजिक संबंध आहे. आतां निजामशाहीची खूण आमच्या प्रांतांत फक्त एक राहिली आहे. हिंदुस्थान सरकारानें मुद्दाम कृपा करून खुणें साठीं एक विशिष्ट योजना केली आहे ही योजना अशी कीं दरसाल हुजूर निजाम सरकारच्या नांवानें एक दिवस वऱ्हाडाच्या राजधानींत एक मोठा बाहुटा फडकत ठेवून त्यांच्या नामाचा जयघोष व्हावा ह्मणून तोफांची सलामी देण्यांत येणार आहे. हा बहुमानाचा संस्कार दरवर्षी निजाम सरकारच्या वाढ दिवशी उपरावतीत करण्यांत येईल. प्रमोधसिंधू कर्ते लिहितात कीं येत्या २१ वे तारखेला हा समारंभ तेथें व्हावयाचा आहे. बावटा मोठ्या खर्चानें तयार करण्यांत येत आहे. त्याची उंची ४० फुट ठेवणार असून कमिशनरच्या कचेरीवर हा उभा करण्यांत येणार आहे. आमच्या मतें या दिवशीं सर्व सरकारी कचेऱ्यांस सुटी द्यावयाला पाहिजे. ह्मणजे हा दिवस मोठ्या मंगल सणाच्या सुदीना प्रमाणें सर्व प्रांतभर पाळण्यांत येईल. अशी व्यवस्था अवश्य व्हावी असा लोकांचा मोठा मनोदय आहे. स्थानिक सरकारांनीं लोकांच्या या इच्छेचा आदरपूर्वक स्वीकार करावा असें आह्मी ह्मणतों.

———

आमच्या पैकीं शिकलेला लोकसमूह सरकारी चाकरीच्या इतका नादीं लागला आहे कीं त्याला त्या भावी दास्याची लाज ह्मणून कसलीच वाटत नाहीं. सरकारी चाकऱ्या पैकीं मुख्य मुख्य हुद्देदाऱ्या आह्मा लोकासाठीं नसतातच पण आमचें सरकार असा लेखी अभिप्राय कोठें दडपून देत नाहीं. तोंडानें गोड गोड उदात्त विचार साखरे सारखे पसरावे आणि सरकारी जागा भरतांना मात्र आपल्या कृतीला अगदीं चुकूं नये असा सार्वत्रिक परिपाठ दिसतो.

आमच्या प्रांतांत असाच प्रकार आहे हें निराळें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. पण अलिकडे एका दोनशे अडीचशे रुपये पगाराच्या जागेसंबंधानें एक विलक्षण भेदाभेद ठेवण्यांत येत असतो असें आह्मी ऐकतों. ही जागा ह्मणजे डिपुटी कमिशनरच्या हेड क्लार्काची होय. या जागेवर युरेशिअनच असावेत असा कांहीं अधिकाऱ्यांचा अभिप्राय दिसतो. मागें इलिचपूरची जागा भरताना असा प्रकार घडला होता असें ह्मणतात. रा. रा. नारायण बाळकृष्ण गद्रे ह्मणून क्रिरिस्ताव आहेत. ते हल्लीं पेनशनर आहेत. त्यांस हेड क्लार्काची जागा देऊं नये कांकीं ते पूर्वाश्रमीं ब्राह्मण होते असा आक्षेप निघाला होता. अलिशान रेसिडेंटांनीं हा अभिप्राय तेव्हांच खोडून टाकला आणि त्या नंतर एका ब्राह्मणासही हेड क्लार्काची जागा देण्यांत आली. अजूनही कांहीं अधिकारी हेडक्लार्कांच्या जागे संबंधानें ब्राह्मणाला नाकारतात असें ह्मणतात. असा खराच प्रकार असेल तर रा. रा. हेअर साहेब हे आपल्या लेखी अभिप्रायानें हा गैरसमज दूर करितील अशी आह्मांस आशा आहे. विशेष माहिती मिळाल्यावर आह्मी या संबंधानें तपशीलवार लिहिणार आहों. सरकारी चाकरींत आमच्या लोकांची अशी छी थू होत आहे हें आह्मांस एका दृष्टीनें बरें वाटतें पण कागदीं असे दोषात्मक अभिप्राय नसावेत एवढीच आमची इच्छा आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— हवेंत थंडपणा बराच आला आहे. एक दोन पाऊसही पुष्कळ ठिकाणीं झाले. पण वायुमंडळाचे शास्त्रावरून असें अनुमान निघतें कीं पर्जन्य कालाला प्रारंभ होण्याला आणखी पाऊण महिना निदान लागेल. रोगराई ह्मणण्या सारखी कोणतीच नाहीं.

रा. रा. निजामुद्दीन साहेब डेपुटी कमिशनर, यवतमाळ यांची बदली एका संस्थानाच्या दिवाणगिरीवर होणार आहे असें कळतें.

मेजर कोलेन डेपुटी कमिशनर आकोला यांची बदली लवकरच इलिचपुरास होणार आहे.

रा० रा० भगवानदीन पोलिस इनस्पेक्टर बुलढाणा यांची बदली इलिचपुरास होऊन त्यांच्या जागी रा० रा० गोविंद रामचंद्र इनस्पेक्टर, इलिचपुरास यांस बुलढाण्यास बदलण्यांत आलें.

———

आकोला. ३-६-०४

सर्व लोकांना विदित व्हावें कीं वैश्यमहासभा मीरतच्या तर्फे पंडित चुन्नीलालजी उपदेशक आले आहेत. त्यांनीं ता. २ जून रोजीं रात्रौ शेठ हजारीमलजी पोद्दार यांच्या दुकानावर सर्व अग्रवाल व महेश्वरी लोकांच्या समक्ष वैश्य महासभेचा उद्देश व जातीची सुधारणा या विषयांवर रसभरित शास्त्रप्रमाणयुक्त चांगलें व्याख्यान दिलें. पुष्कळ वैश्यमंडळी जमली होती. व्याख्यानाचा प्रभाव चांगला राहिला. व व्याख्यान संपल्या नंतर सर्व अग्रवाल लोकांनीं एकमतानें लग्नसमारंभामध्यें किंवा प्रेत नेतेसमयीं जो पैसा नीच जातींच्या लोकां करितां उधळत असत तो उधळूं नये. व अपशब्द सयुक्त गाणीं गाऊं नयेत असा ठराव करून सर्वांनीं सह्या केल्या व महेश्वरी लोकांनीं वेश्यांचा नाच व वरच्या दोन गोष्टी बंद केल्या व त्यांनींहि सह्या केल्या. मी आशा करितो कीं हळूं हळूं आणखी कुरीति बंद करण्याकरितां कटिबद्ध होतील. व मीरठच्या वैश्य अनाथालयाचा अद्यापि कांहीं एक प्रबन्ध झाला नाहीं परंतु आशा आहे कीं कांहीं तरी प्रबंध करतील. मी अकोला येथील सर्व वैश्य लोकांना धन्यवाद देतो व हे लोक लहान लहान खेड्यामध्यें वरच्या गोष्टी बंद करणें हें आपलें कर्तव्यकर्म समजतील.

आपका

शुभचिंतक.

---


## जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आह्मी सोडा वाटर आणि लेमोनेट यांचे भाव फार कमी केले आहेत नवीन भाव येणें प्रमाणें:—

| | डझन | आणे |
|---|---|---|
| सोडा वाटर | १ | ९ |
| लेमोनेट | १ | १२ |
| रासबेरी | १ | १२ |
| जिंजर | १ | १२ |

याप्रमाणें कमी भावांत पूर्वी सारखाच चांगला उत्तम माल विकण्याची व्यवस्था आह्मी मुद्दाम केली आहे.

आकोला ४ जून १९०४ } पेस्तनजी आणि सन गव्हर्नमेंट मेल कानट्राक्टर


---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००८=॥ |
| सोनें २४।= | चांदी ७१। |
| जवारी ९९ | मसुर ७८॥ |
| गहू काठे ८९ | बनशी ९.० |
| सरकी | ९ |
| मीठ | ३॥ रु. मण |
| चणे | ३ रु. मण |
| तूप | १० रु. मण |
| तेल | ४॥ रु. मण. |
| रुई जीन | ८? |
| कापूस | १०-९९ |

---

वर्तमानसार

**मोठ्या हुद्याच्या जागा युरोपियन व युरेजियन लोकांकरितांच आहेत.**— लाहोर येथील व्हेटनरी कॉलेजच्या विद्यार्थ्यांस बक्षिसें वाटण्याचा समारंभ नुकताच पंजाबचे ले. गव्हर्नर सर चार्लस रीव्हज यांच्या प्रमुखत्वाखाली झाला. त्यावेळीं आपल्या भाषणांत पंजाबचे ले. गव्हर्नरांनीं असें स्पष्ट बोलून दाखविलें कीं, मोठमोठ्या हुद्याच्या नवीन होणाऱ्या जागा युरोपियन व युरेजियन लोकांकरितांच आहेत. व त्या सरकारनें त्यांसच दिल्या पाहिजेत. या जागा मिळण्याची नेटिव लोकांनीं आशा धरूं नये. त्यांनीं लहान पगारांवर संतुष्ट राहावें.

गेल्या ता. २२ रोजीं पुणें येथें शहरवासी लोकांची एक मव्हेट सभा भरून तींत शहरवासी लोकांतर्फे रा. रा. टिळक यांच्या हस्तें जगद्गुरु शंकराचार्य मठ संकेश्वर यांस सत्कार पूर्वक साडेचार हजार रुपये महादक्षिणा अर्पण करण्यांत आली.

म्हैसूर येथील चीफ कोर्टाचे माजी मुख्य जज्ज मि. रामचंद्र आय्यर यांनीं आपली दोन लक्ष रुपयांची मालमत्ता शृंगेरी येथील श्री शंकराचार्यच्या मठास अर्पण केली आहे, व यापुढें राहिलेलें आपलें आयुष्य वनवास पत्करून ईश्वरसेवेंत घालविण्याचें ठरविलें आहे.

सूरत येथें रस्त्यांतून अन्नअन्न करीत फिरणारा एक भिकारी नुकताच मरण पावला. त्यावेळीं त्याच्या खोलीचा तपास पोलीस करीत असतां तेथें नोटा, रोकड नाणें मिळून दहा लक्ष फ्रांकचा ऐवज सांपडला.

स्विस्लंडमधील तीन मोठ्या वर्तमानपत्रांची लढाईची बातमीदार ह्मणून एक बाई जिनीव्हाहून टोकिओला जाण्या करितां निघाली आहे.

अमेरिकेंत एका लष्करी अधिकाऱ्यानें मोटार गाडीला पंखें लाविलीं आहेत, त्या योगानें ती फारच वेगानें जाते.

कलकत्ता म्युनिसिपालिटीनें शहरांतील कचऱ्याचा नाश करणारें यंत्र एक लक्ष ऐंशी हजार रुपये खर्च करून आणलें आहे या यंत्रानें चोवीस तासांत दीडसें टन कचरा जाळला जातो. वि० वि०

पंजाब प्रांतांतील झेलम जिल्ह्यांत प्लेगनें इतका कहर मांडला आहे कीं, तिकडील पिकें उभीं राहून नासून चाललीं आहेत. तीं कापण्याला कोणी मनुष्य नाहीं! कांहीं म्हातारीं कोतारीं व मुलें आहेत, पण तरुण पुरुष नाहींत!

रंगूनच्या जनरल इस्पितळाचे मेडिकल अधिकारी कॅप्टन रोस्ट यांनीं, रक्तपितीचा घाणेरडा रोग समूळ बरा करणारें रामबाण औषध शोधून काढिलें असून त्या योगानें त्यांनीं रंगून येथें एकंदर एकुणतीस रक्तपितीच्या रोग्यांना बरें केल्याचें समजतें.

सपाटीवर राहाणाऱ्या माणसांपेक्षां, उंच प्रदेशीं राहणाऱ्या लोकांचा कंठ फार मधुर असतो. अमेरिका येथील इंडस पर्वतांत लोक १० हजार पासून १४ हजार फूट उंच जागेवर राहतात. तेथील पुरुषवर्गाचा कंठ स्त्रियांप्रमाणें मधुर व स्त्रियांचा कंठ लहान मुलांप्रमाणें बारीक आहे ह्मणतात.

—जपानांतील स्त्रिया आपल्या डोकीच्या केसांची रचना अशी करतात कीं, त्यावरून अमुक स्त्री अविवाहित, विवाहित, किंवा विधवा, असून पुनःविवाह लावूं इच्छिणारी अथवा न इच्छिणारी आहे, हें पाहणारास तेव्हांच समजतें. कुमारिका केशरचना अशी करतात कीं, त्यांचे डोकीवर ते पंख्याप्रमाणें किंवा फुलपाखराच्या पंखांसारखे दिसतात; यामध्यें त्या दागिनेही घालतात. विधवा होऊन तिला पुनः लग्न करावयाचें असेल ती आपला बुचडा पाठीकडे बांधते. व तिला पहिल्या नवऱ्याचे मरणानंतर सदैव वैधव्यांत राहणें असेल, ती आपले केस कापून अगदीं आखूड करिते; व त्यांत भूषणें मुळींच घालीत नाहीं! के०

**दानशूर**—गेल्या १० वर्षांत अमेरिकेंतील श्रीमान गृहस्थांनीं १८३३०००००० रुपये धर्मार्थ दिले. यांत १३ हजार रुपयांचे खालच्या रकमा धरल्या नाहींत. एकट्या कार्नेजीनेंच २८६५०००००रुपये दिले. ज्या देशांत असें कर्णा सारखे दाते आहेत त्याची भरभराट कशी होणार नाहीं!

—**दसी**—जपानीयुद्धाच्या ताज्या तारा अमीर काबुलाहून मुद्दाम स्वार पाठवून नेत असतो व त्या दरबारांत वाचून त्यावर आपलें मत देत असतो. जपानांत ऐक्य आहे ह्मणून त्याचे असे पराक्रम चालले आहेत; अफगाणिस्थानांत आपसांत तंटेलढाया होत असत त्यामुळें आपण मागें पडलों; आपली उन्नती व्हावयाची असेल तर सर्व महंमदीयांनीं एक झालें पाहिजे असें अमीर दरबारी मंडळीस ह्या तारा वाचून सांगत असतो.

ज्यामध्ये एकही भिकारी सांपडत नाहीं असे स्काटलंडमध्यें ४१ गांव आहेत. हिंदुस्थानांत अशीं ४६ दरें तरी सांपडतील काय? मो. वृ.

विशनऱ्यांच्या कळपांत केवळ अन्नासाठीं गेलेल्या अर्भकांस पश्चात्ताप झाला असल्यास परत स्वधर्मांत घ्यावें अशाबद्दल पुण्यांतील एका पक्षाकडून श्रीस विनंति करण्यांत आली होती. आपल्या भाषणांत श्रीनें या विनंतीस समर्थक उत्तर दिलें. बाटलेल्या मुलांस परत स्वधर्मांत घेण्याची खटपट करण्यापेक्षां केवळ पोटाकरितां धर्मांतर करण्याचा त्यांवर प्रसंग न येईल अशीच खटपट करणें अधिक इष्ट आहे, असें श्रींनीं आपलें मत दिलें; व अशा तऱ्हेची चळवळ निवारण्यास त्यास गादीची अनुमति असून गादीकडून अशा संस्थेस प्रोत्साहनही मिळेल असें श्रीकडून आश्वासनही मिळालें.

बेलजियममध्यें घेंट नांवाचें एक शहर आहे, तेथें कुत्र्यांचा उपयोग पोलिसच्या शिपायांच्या ऐवजीं करण्यांत येतो, व तें काम कुत्रे सुरेख रीतीनें बजावितात. श्री. स.

एके दिवशीं एक अल्पवयस्क जपानी कुमारी कन्या एका जपानी सेनापतीच्या सन्मुख जाऊन एकदम उभी राहिली. आणि ह्मणाली "सेनापतिसाहेब माझ्या आईनें मला जे आजवर खाऊस ह्मणून पैसे दिले ते मी तसेच सांचवून ठेविले आहेत. कारण मला माहित होतें कीं रूस व जपान यांच्यामध्यें लढाई ही खास होणारच. तेव्हां हे मजे सांचलेले पंचवीस रुपये आपण घ्यावे व ते हल्लीं चालू असलेल्या संग्रामकार्याकडे खर्च करावेत."

**मारामारी**— दिल्ली येथें नुकताच एक पुनर्विवाह होऊन वधुवरांची मिरवणूक चालली असतां तिजमध्यें विधवाविवाहास अनुकूल अशीं गाणीं कांहीं लोक ह्मणत चालले होते. त्यावरून उलट पक्षाची मंडळी चिरडून जाऊन दोन्ही पक्षांची मोठी मारामारी झाली. पोलीसांनीं मारामारी मोठ्या युक्तीनें मिटविली.

**मोतीं गोल करण्याची कृति**— मो. गडकर यांनीं मोतीं स्वच्छ, पाणीदार व गोल करण्याची एक नवीन कृति शोधून काढली आहे. ती त्यांनीं आपल्या कारखान्यांत नोकरीस राहिलेला आपला पुतण्या रामलाल गडकर यांस सांगितली. तो ही कृती बाहेर फोडील किंवा तिचा तो दुसरीकडे उपयोग करील, असा संभव दिसल्यावरून त्यांनीं त्याजवर हायकोर्टांत मनाईचा अर्ज केला होता. त्याचा न्यायमूर्ती चंदावरकर यांनीं वादीस अनुकूल निकाल केला आहे.

**यंदाचा पर्जन्ययोग**—यंदा मृग पुनर्वसु व उत्तरा या तीन नक्षत्रांचाच पाऊस काय तो विपुल पडेल; बाकी नक्षत्रें मध्यम पडतील. तारीख ६ रोजीं मृग लागतो. या दिवसापासून पावसाळ्यास थोडी सुरवात होईल. तारीख १० पासून चांगली सुरवात होईल.

**केसरी पत्रावर अधिकाऱ्यांचा कटाक्ष**— केसरी वर्तमानपत्र जबलपुर हायस्कूलच्या लायब्ररींत घेण्यांत आलेलें शाळा इन्स्पेक्टरच्या दृष्टीस पडतांच त्यांनें डायरेक्टरला लिहून त्यांच्या मार्फत हेडमास्तरांस दपटशा देऊन पत्र घेणें बंद करविण्यांत आलें आहे. कोती समजूत!

ओरिसा प्रांतांतील मोरभंज संस्थानच्या राजेसाहेबांनीं, जपान अथवा अमेरिका देशांत जाऊन उपयुक्त कला शिकणाऱ्या हिंदुस्थानांतील विद्यार्थ्यांकरितां तीन स्कॉलरशिपा ठेविल्या असून त्यांपैकीं एक फक्त कातड्याचें काम शिकून येणाऱ्याकरितां आहे. ओरिसा हा हिंदुस्थान देशाचा अगदीं मागसलेला प्रांत असतां तेथील एका संस्थानिकास धंदेशिक्षणाची इतकी अवश्यकता भासावी आणि त्यानें कलाशिक्षणाच्या कामीं अशा प्रकारें खर्च करण्यास स्वतः होऊन तयार व्हावें. आणि आमच्या सुधारलेल्या आर्यावर्तांत राहणाऱ्या संस्थानिकांकडे विद्वान लोकांचीं डेप्युटेशनें अशा कामीं जाऊनही व्यर्थ व्हावीं, हें आश्चर्य आहे. आम्ही सदर राजेसाहेबांचें ह्या कामीं अभिनंदन करितों.

बरोबर तीस वर्षांपूर्वी हिंदुस्थानचे केवारी मि. दादाभाई नवरोजी बडोद्याच्या दिवाण गिरीवर होते. आणि आज त्याच महत्वाच्या जागी या दुसऱ्या पारशी गृहस्थाची नेमणूक होत आहे. अर्थात मि. दादाभाई जसे ह्या जागेवर असतां न्यायाच्या आणि इतर बाबतींत आपला पारशीपणा विसरून निमत्सर न्यायदृष्टीनें आपलें कर्तव्य बजावीत होते, त्या पदावर आरूढ झालेले खान बहादूर केरसापजी रुस्तुमजी हे आपली कामगिरी बजावतील असें संस्थानांतील प्रजाजनांस आणि इतर सर्व लोकांस वाटत आहे. ज्ञा. प्र.

मोहनिद्रा हा योगशास्त्राचा एक भाग आहे. आपल्या मनोवृत्ति आकर्षण करून त्यांचा परिणाम दुसऱ्याच्या मनोवृत्तीवर व क्रमशः शरीरावयवांवर प्रतिबिंबीत करणें यास मोहनिद्रा असें ह्मणतात. ह्या मोहनिद्रेचे दोन प्रकार आहेत. आपल्या इच्छाशक्तीनें दुसऱ्या मनुष्य मनुष्याच्या मनोवृत्तीचा आणि कर्मेंद्रियांचा लय ह्मणजे त्यास विगतचेतन करून आपले इष्टहेतु साध्य करून घेणें हा एक, व आपल्या इच्छाशक्तीचा प्रयुज्य मनुष्याचे अंतःकरणांत प्रवेश करून व स्वतः विगतचेतन होऊन प्रयुज्य मनुष्याचे इच्छे विरुद्ध कार्यांशिवाय करून घेणें हा दुसरा प्रकार होय. वि. वि.

## नोटीस

बेजनी रा० रा० नरहर रावस ढवळे राहणार पातुरशेखबाबू तालुका बाळापूर यांसः—

खाली सही करणार यांजकडून या लेखानें कळविण्यांत येतें कीं तुह्मी आकोला वऱ्हाडसमाचार वर्तमान पत्रांत तारीख १३ मे १९०४ तारखेची जाहिर नोटीस दिली ती पोचली. नोटीशींत तुह्मी लिहिलेला मजकूर खोटा व लबाडीचा आहे. मौजे आलेगांव येथील शेत सर्व्हे नंबर ५ एकर २१ गुंठे २७ आकार रुपये ४० चे शेत १३१२ पासून १३११ फसली पावेतो सात अकरा पानी वहिवाटीत पडेल असें आम्हीं आहे. सदहू पोटेवाटणीप्रमाणें तें शेत आमच्या ताब्यांत आहे. आम्ही सदहू शेताचा दोन वर्षे भोगवटा घेतला आहे. आमच्या पोट-हिस्साकडे हेत तें शेत होतें. तुम्ही जी नोटीस दिली आहे तिजवरून आम्ही तुमच्या स्वतःच्या व तुमच्या भाऊबंदांच्या लबाडीचा खुलासा करून असें वाटतें कीं तुह्मा इराद्यानें सदहू शेताचा ताबा जाणूनबुजून व लबाडीनें करावयाचा आहे आणि त्याकरितां तुह्मी बनावट लोकांसहि तयार करण्यास उभे केले आहा. अशा रीतीनें मी तुमचा ताबा कदापि देणार नाहीं. तिसरी कोणी लुटें आहे. तुह्मी कायद्याच्या रीतीनें आह्मावर काम चालवावें. असें न करितां दांडगाई चालवाल तर तुह्मांवर फौजदारी करणें येईल; आणि या नोटिशीचा खर्च व इतर नुकसानी तुह्मांवर पडेल. कळावे ३० मे १९०४ इसवी.

सही

रामकृष्ण योगाजी वाणी

राहणार पातुरशेखबाबू

हुजूर खुद.


## जाहिरात

**स्टोअर्स सप्लायर्स**

आमही गिरण्या, जिनिंग फॅक्टरी, म्युनिसिपालिटी, कारखाने, इंजिनिअर्स इलेक्ट्रिक लोकल बोर्डस वगैरेंना लागणारें व दुर्मिळ सर्व प्रकारचें सामान फारच माफक दरानें पुरवितों.

**धी ग्लोब स्टोअर्स कंपनी.**

जनरल मरचन्ट्स

काळबा देवी रोड

मुंबई.

REGISTERED No. N.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ ६
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०१
दुसरे खेपेस .... ........०१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy ........................ 2 as
Advertisement.
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line „ 2 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 13 JUNE 1904 NO 23

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख १३ माहे जून सन १९०४ इ० अंक २३

### बंगाली जादू

बीरसाधनी यंत्रः- या योगें पैशाचा रुपया, चवलीची पावली, हळदीचें कुंकू, कुंकवाची हळद इत्यादि हजारों आश्चर्यकारक प्रयोग करून दाखवितां येतात. इतकेंच नव्हे तर चतुर मनुष्यास ह्या योगें आपला चरितार्थच चालवितां येणें शक्य आहे. किं० ८८

जादूचा इस्टेट नं. १ लाः- या ६ पानांच्या योगें एका वेळीं सर्वच कोरीं पानें, पुनः त्यांचेच एके आणि लगेच त्याच पानांचे पाचलये करितां येतात. या रूपांतरानें प्रेक्षक चकित होतात. किं. ८२

जादूचा इस्टेट नं. २ राः-या ५ पानांच्या योगें एकाकेळीं लाल बदाम सातल्ये तर त्याच पानांचे लगेच किलवरचे सातल्ये करितां येतात. किं. ०२

भानामती साधनी प्रश्न ( १०० )- ह्या १०० प्रश्नांपैकीं प्रेक्षकानें कोणताही प्रश्न धरिल्यास, त्याच्या उत्तरासह बिनचूक आपणांस सांगतां येतें. हा चमत्कार अलौकिक आहे. किं. ०२

कर्णपिशाच्च साधनी पानें:- ह्या ७ सात पानांत शेंकडों आंकडे आहेत. प्रेक्षकानें मनांत धरलेला अंक बिनचूक सांगण्याचें हें एक अप्रतिम साधन आहे. किं० ८२

सर्व चिजा एकदम घेणारास १२ आण्यांस मिळतील.

सूचना-अशाच प्रकारचे १२५ मनोहर खेळ स्वतः तयार करितां येण्यासारखें 'नवा जादूगार' हें पुस्तक ०१२ किंमतीचें आहे तरी वरील ५ चिजा घेणारास ८ आण्यास देऊं. मनीऑर्डर पाठवा. अगर व्ही. पी. नें मागवा.

रा० वि० इनामदार.
पळसगांव पो० मायणी जि० सातारा.

### जाहिरात

सर्व लोकांस जाहिर करण्यांत येत आहे कीं, जनावरांचे रोग दुरुस्तीकरितां गत वर्षाप्रमाणें ह्या वर्षी एप्रील महिन्याचे १ तारखेपासून आकोट, चांदूररेल्वे, चिकलदा-मेळघाट आणि केळापूर ह्या तालुक्यांत व्हेटरनरी असिस्टंट्स ( गुरांचे दाक्तर ) नेमले गेले आहेत. ते-घोडे, गायी, बैल म्हसी, कुत्रे इ० ग्राम्य पशूनां औषधोपचार करून त्यांना रोगांपासून होणाऱ्या यातनांतून मुक्त करितील. करितां वरील संस्थांचा लोकांनीं होता होईल तेवढा आपापला फायदा करून घ्यावा.

वरील ठिकाणच्या इस्पितळांतून गुरां करितां औषधोपचार फुकट केले जातील. कळावे. ता० ७ जून १९०४ इ०

J. S. Jetheji.
सुपरिन्टेन्डन्ट
सिव्हिल व्हेटरनरी डिपार्टमेंट
सेंट्रल प्रॉव्हिन्सेस.

### जाहिरात

सर्वत्र लोकांस जाहिर करण्यांत येतें कीं लक्ष्मी जवजे श्रीराम भट शेगांव तालुके खामगांव ही माझी भाऊ बीरादर आहे. माझे नावचे असलेले मौजे लोहार तालुके खामगांव येथील इनाम नंबर १ व शेगांव येथील इनाम नंबर १ हे तिचे वहीवाटीत आहेत. व शेगांव येथील घरेही तीचेच ताब्यांत आहे. त्या सर्व स्थावर जंगम जिनगीवर माझी मालकी आहे. ती कोणी गहाण, खरेदी लिहून घेऊन कर्ज वगैरे देऊं नये व बक्षीसही लिहून घेऊं नये. घेतल्यास त्याचबद्दल सदर्हू जिनगी जबाबदार न होता ज्याचा तो होईल. कोणी फसूं नये ह्मणून अगाऊ सुचना केली आहे. कळावें. तारीख ८।६।१९०४ इ०

सही
नरहर भट बीन प्रल्हाद-
भट रा॥ शेगांव
दस्तुर खुद

### नोटीस.

साहेबराम मोतीराम मालक रामरतन साहेबराम दुकान पनज. पोस्ट-पनज तालुके आकोट. यास.

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, कसबे आकोट येथील धाब्याचे घर तीन मजली आह्मांस मोती व पुनमचंद वल्लद लालचंद व रामधन वल्लद लालचंद अ० पा०क. मोती, व सुरज्या वल्लद देवकरण अ० पा० क० चुलता मोती वल्लद लालचंद सोनार राहणार आकोट याना ९२१ रुपयास विकून ता० १६ जून सन १९०४ इसवी रोजी खरेदीखत लिहून दिले आहे. हे घर तुमचेपासी ३०० रुपयावर गहाण आहे. गहाणखताचे तारखे पासून आजपावेतो अंदाज्यानें ७ वर्ष ९ महिने होतात. गहाणखतात व्याज १२ आणे शेकडा आहे. त्या मानाने हिशोबा प्रमाणें ५०९ व्याजा सुद्धां तुमचे देण्याकरितां काढून घेतले आहेत करितां तुह्मांस नोटीस देण्यांत येते कीं नोटीस पावतांच तुह्मी आमचे पासून रुपये ५०९ घेऊन आह्मास पावती द्यावी व गहाणखतही आमचे स्वाधीन करावे. विनाकारण तुह्मी जर मूकचे रिणकोतर व आमचेवर दावा कराल तर कोर्टखर्च आह्मी तुह्मास देण्यास योग्य होणार नाहीं. कळावें ता० ७-६-४ इ०

सही
चुनीलाल सिवचंद तर्फे देवीदत्त
रामदत्त दुकान आकोट
दस्तुर खुद्द.

### नोटीस.

बेशमी बजाई मर्द रावजी पाटलीण राहणार दहिगांव तालुका आकोट यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझ्या मामी आहां-आणि मामा रावजी पाटील जीवंत असतांना आणि त्यांच्या पश्चात् तुह्मी माझें पालन पोषण मातोश्री प्रमाणें केलें. माझा वडील भाऊ मरण पावल्यामुळें आणि मी अज्ञान असल्यामुळें सर्वच जबाबदारी तुह्मा उभयतांवर पडली. आमच्या मालकीचा दहिगांवच्या 'पट्टी' नांवाच्या शेतांतील ½ हिस्सा तुह्मी आपल्या भावाच्या सल्यानें दांडगाईनें हिस काढून घेतला आहे गुदस्ता पर्यंत मी तो हिस्सा वाहिला. यंदा तुह्मी दांडगाई व बेमानी आरंभली आहे. आमच्या भावाच्या हातची धरवर ५०० रुपयांची तुह्मी डुबवूं पहात आहां. त्याचप्रमाणें आमची बैलाची जोडी १ पेवांतली दोन शेर पायलीची जवारी १४ खंड्या, चांदीचीं करदोडा व कडें आणि भांडीकुंडी वगैरे सामान तुह्मी मला परत देत नाहीं; आणि मला घरांतून हांकलून मात्र तुह्मी दिलें आहे. ही सर्व गोष्ट तुमच्या मातोश्रीच्या अधिकाराला शोभत नाहीं. तुमच्या मुला प्रमाणें मी आहे. माझ्या हातून कांहीं गोष्ट चुकली असल्यास त्याबद्दल क्षमा करावी. पण आमची अशी स्थावरजंगम इस्टेट तुह्मी लुबाडून घेऊं नये. माझी जिनगी मला नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांत परत द्यावी. तसें करण्यास चुकल्यास तुह्मांवर सरकार दरबार करून या नोटीशीच्या खर्चासुद्धां आणि इतर बाबीसुद्धां सर्व इस्टेट ताब्यांत घेतली जाईल कळावें. तारीख ९ जून १९०४ इ०

सही
लुंग्या वल्लद संपत देशमूख
राहणार दहिगांव निशाणी
वखर.

### जाहिरात

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आह्मी सोडा वाटर आणि लेमोनेट यांचे भाव फार कमी केले आहेत नवीन भाव येणें प्रमाणें —

| | डझन | आणे |
|---|---|---|
| सोडा वाटर | १ | ९ |
| लेमोनेट | १ | १२ |
| रासबेरी | १ | १२ |
| जिंजर | १ | १२ |

या प्रमाणें कमी भावांत पूर्वी सारखाच चांगला उत्तम माल विकण्याची व्यवस्था आह्मी मुद्दाम केली आहे.

आकोला
४ जून १९०४ } पेस्तनजी आणि सन
गव्हर्नमेंट मेल
कानट्राक्टर

### नोटीस.

मे० हुशेनखान वल्लद खानमहंमदखान बलोच राहणार आकोला. यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे भवरद प्रगणे व तालुके व जिल्हे आकोलें येथील शेत सर्वे नंबर ११ चे शेत तुह्मी व मोतीराम नारायण या दोघा मिळून घेतले आहे त्यांपैकी निम्मे शेत मी मोतीराम नारायण पासून विकत घेतले आहे व त्याजवर तुमची साक्षही आहे. सदर्हू शेत वाटतां येत नाहीं ह्मणून आजपावेतों एकत्र वाहत आले सदरहू शेतांतील निमे हिस्सा मी विकत घेतल्यामुळें तूं ह्मणतो कीं शेत आपआपले वाटून घ्या एकत्र वहात नाहीं. करितां या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं सदर्हू शेत ९ नव तिफना पैकीं सहा तिफन दक्षिणेकडील चांगलें आहे व उत्तरेकडील ३ तीन तिफन पिवळचे असुन त्यांत पाट वगैरे गेले आहे. सहा तिफनांपैकी पूर्वेकडील भाग सफा आहे व पश्चिमेकडील भाग उतार चढाचा आहे. ह्या कारणास्तव शेत वाटतां येत नाहीं करितां पाच पंच नेऊन सदरहू शेत पूर्वेकडील भाग चांगला आहे तो चार तिफन ठेवावा व पश्चिमेकडील भाग खराब आहे ह्मणून पांच तिफन ठेवावे ह्या प्रमाणें वाटणी पंचा समक्ष करून तुझ्या इच्छेस वाटेल तो भाग उचलून घ्यावा. ह्मा प्रमाणें वाटणी ही नोटीस पावले दिवसा पासून आठ दिवसाचे आंत करून घ्यावी अगर चालत आलेले वहिवाटी प्रमाणें एकत्र वहावें ह्या प्रमाणें न केल्यास सदरहू सेत आह्मी वहाणार नाहीं. शेताचे पिकाचे नुकसानी बद्दल वायद्याचे तिपट रुपये व हल्लीं शेतांत जे वखर धरलेले आहे त्याचा खर्च व या नोटिसीचा खर्च व दाव्याचे खर्चासुद्धां नुकसान भरून घेतलें जाईल. कळावें ता. २८।५।०४ इसवी.

सही
शेखबिराम वल्लद शेखहिरू मुसलमान बकरकसाई राहणार
आकोलें दस्तुर खुद्द.

# FOR SALE

A pair of Bay Arab ponies nearly 14 hands going in single and double harness, Price Rs. 500. Apply to Messrs Pestonji and Son, Akola.

## जाहिरात

एका नवीन जिनिंग फॅक्टरीमध्यें १ आण्यापासून ४ आणे पावेतों वर्गणीदार पाहिजेत. ज्यांची इच्छा असेल त्यांनीं तावडतोब खालील पत्त्यावर लेखी कळवावें. कळावें. तारीख ११ माहे जून सन १९०४ इ०

Alpha.

Akola.


वऱ्हाडसमाचार

मिती अधिक जेष्ठ वद्य ३० शके १८२६

## पंक्तिप्रपंच.

आमच्या देशांत राजाश्रया संबंधानें पंक्तिप्रपंच मोठाच होतो आणि काळा गोरा हा भेदाभेद चांगलाच दृष्टीस पडतो. राजाश्रयाला सत्पात्र असा एक गोराच माणूस काय तो ओळखला जातो, कारण काळ्या माणसापेक्षां गोऱ्याच माणसाचें महात्म विशेष मानलें आहे. एवंच सत्ता संपत्तीच्या व मानापानाच्या श्रेष्ठ श्रेष्ठ स्थानांचा अधिकार गोऱ्या लोकांसच प्राप्त होतो. आणि अशा प्रकारें राजदृष्टी गोऱ्या माणसावर लुब्ध होऊन गेल्यामुळें काळी माणसें त्या दृष्टिपथांत क्वचितच येतात. काळा माणूस या संज्ञेंत हिंदू व मुसलमान या उभयविध धर्मवाल्यांचा समावेश होतो आणि गोरा माणूस ह्मणजे एक तर अस्सल युरोपिअन किंवा त्यांच्याशीं तोलास तोल धरणारा युरेशिअनांचा वर्ग होय. अशा या काळ्या गोऱ्यामध्यें राजाश्रयाचा गोड प्रसाद वाटतांना सरकारच्या प्रेमदृष्टीची समता नष्ट होऊन ती प्रेमफुल्ल दृष्टी गोऱ्या माणसांवरच लुब्ध होते आणि मग ते सरकारचे प्रसादपूर्ण व उदार हस्त गोऱ्या माणसांकडेच ओढ घेतात. अर्थातच सरकारी हुद्देगिरीच्या जागा देण्याचे प्रसंगीं गोरी गोमटीं माणसेंच सरकारच्या नजरेंत एकदम भरतात आणि तींच सरकारच्या मर्जीत उतरतात. शेवटीं अशा श्रेष्ठ पदवीला एकटी गोरीच माणसें योग्य होत आणि सर्वारंभे त्यांनाच पहिला हक्क आहे असें ठरतें. या गोऱ्यांच्या हुद्देदाऱ्या सोडून नंतर जीं हमालीचीं, खर्डे घाशीचीं, व दास्याची बहुविध कामें आहेत तीं कामें इतर जनांना सांगण्याची गोष्ट सरकारी विचारांत घेतली जाते.

## दुराग्रही अहंभाव

हा भेदभाव, ही विषम दृष्टी व हा सिंहाचा तराजू आपल्या नित्याच्या पहाण्यांतला व अगदीं अंगवळणी पडलेला आहे. सरकारास गोरा माणूस ह्मटला ह्मणजे अत्यंत प्रिय वाटतो आणि काळा माणूस मात्र त्यांस तितका पटत नाहीं या संबंधानें आह्मी असाही तात्विक वाद काढतो कीं, सरकार स्वजातीच्या लोकांविषयीं इतकी तरफदारी करितात व अत्यंत आवड दाखवितात हें अगदीं स्वाभाविक आहे, किंबहुना, मनुष्यस्वभावच असा आहे कीं तो आपपर भाव नेहमीं जागृत ठेवितो आणि स्वत्वाचा विसर पडूं देत नाहीं. अर्थात् राजाश्रय हा राज्यकर्त्यांच्या ज्ञातीच्या व धर्मांच्या लोकांसच विशेष मिळावा हें स्वाभाविक आहे पण असा हा अनन्य प्रेमभाव कायमचा तसाच चालूं ठेवावा आणि ही पक्षपाताची गोष्ट राजरोसपणें नाकबूलही करावी हें धाष्टर्य मात्र लार्ड कर्झन साहेबांच्या मुत्सद्दीपणांत विशेषच अलंकरणीय होय यांत शंका नाहीं. गेल्या बजेटाच्या वेळीं जो मोठा वादविवाद झाला त्या वेळीं लार्ड कर्झन साहेबांनीं आपल्या अमृत वाणीनें लोकांच्या दृष्टीपुढें मोठी भूल पसरली. व्हाईसराय साहेबांच्या मतें आमची ब्रिटिश राजनीति उत्तम, आमच्या सारखा उत्तम राज्य कारभार अलम दुनियेंत आमचाच, आणि आमच्या सारखे उत्तम राज्यकर्ते सृष्टीवर आह्मीच. या प्रमाणें लाट साहेबांनीं असा हा दुराग्रही अहंभाव तर परमावधीलाच पोचविला आहे. अशी ही सरकारची संतोषवृत्ती, ही सरकारची उत्तम राज्यकारभाराची प्रौढी आणि अशा प्रकारची सरकारची महत्वाकांक्षा या गोष्टी दृष्टीस पडल्या ह्मणजे मनास फार खेद होतो. नुकतांच सरकारी ठराव असा प्रसिद्ध झाला आहे कीं आमच्या राज्यांत नेटिवांस सरकारी चाकऱ्या पुष्कळ पुष्कळच दिलेल्या आहेत; राजाश्रया संबंधानें नेटिवांची पायमल्ली होते ही ओरड खोटी आहे इतकेंच नाहीं तर ब्रिटिश राज्यछत्राखालीं आज सरकारी चाकरीवर नेटिव माणसांचा जेवढा गौरव होत आहे तितका कोणत्याच राष्ट्रांत कधींहि झालेला नाहीं.

## आत्मश्लाघा

ही सरकारी ठरावांतली गर्वोक्ती पाहून मनांत एक प्रकारची उदासीनता व निराशा उत्पन्न होते. सरकारी चाकरीवर नेटिवांची योजना अधिकाधिक व्हावयाला पाहिजे आणि गोऱ्या लोकांस इतकी वरणी देऊं नये असें राष्ट्रीय सभा दरवर्षी आपल्या ठरावानें जगजाहिर करीत असते. हा आक्षेप खोडून काढण्याचा प्रयत्न इंडिया सरकारानें आपल्या ठरावांत केला आहे. असले आत्मश्लाघेचे ठराव आह्मांस पसंत नाहींत. अशा ठरावानें सुधारणा कुंठित होते. सरकाराला दोषच वाटत नाहींत आणि प्रस्तुतची सरकारी चाकरीची स्थिती उत्तमोत्तम आहे तर मग सुधारण तरी कसली व्हावयाची ! दोषा संबंधानें आंधळें करणारा हा ठराव सर्वच प्रगती थांबवितो. भावी सुधारणा अशा ठरावानें मागें सारली जाते. आणि हा ठराव चुकीचा आहे असें प्रतिपादन करणारा व्हाईसराय निपजे पर्यंत सर्व आशाच [illegible]ल्यास गेल्या असें होत आहे. या दृष्टीनें सरकारी ठरावा पासून मोठी निराशा उत्पन्न होते आणि निराशे सारखा दुसरा शत्रू कोणताच नाहीं. आशेनें सर्व जग फिरत आहे आणि जर आशाशक्तीचा सरकार बीमोड करील तर आमचे हातपायच गळल्यासारखे होतील तर त्यांत नवल तें कोणतें !

लोकमता विरुद्ध हा सरकारी ठराव आहे. सरकारी अभिप्राय राष्ट्रीय सभेला, वजनदार पत्रकारांना व इतर लोकसंस्थांना अगदीं गुंडाळून ठेवितो. लोकमत सांगणाऱ्या या सर्व संस्था चुकल्या आहेत आणि सरकार ह्मणते कीं, आमचीच गोष्ट काय ती खरी आणि आमचा अभिप्राय प्रत्यक्ष आंकड्यावर बसविलेला आहे. सरकाराच्या बाजूनें जे आंकडे पुराव्यासाठीं आणिले आहेत त्यांची मीमांसा अवश्य लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. लार्ड कर्झन साहेब ह्मणतात कीं, दरमाहा ७५ रुपये पगारांच्या जागा आणि त्या पेक्षां कमी पगारांच्या जागा या सर्व नेटिवांच्याच आहेत. जणु काय ह्या ७५ रुपय पर्यंतच्या सर्व चाकऱ्यांचा मक्ता नेटिवांनीं घेतलेला आहे. ह्मणून या जागा हिशोबांत सरकारनें धरल्या नाहींत. दरमहा ७५ रु. पगाराच्या जागा पासून दरमहा २ हजार रुपये किंवा त्यापेक्षां अधिक पगाराच्या जागापर्यंतचें एक कोष्टक तयार केलें आहे. अशा जागा आज मितीला ७८२२८ आहेत. पैकीं ६५०० जागा फक्त युरोपियनांच्याच हातीं आहेत. आणि बाकीच्या जागांपैकीं २१ हजार ८ शें जागावर नेटिव लोक नेमिलेले आहेत. २३ कोट प्रजेवर राज्यकारभार चालविण्या साठीं ६५०० युरोपियन लोक पाहिजेत आणि ही संख्या अधिक आहे असें कोणीहि ह्मणणार नाहीं. असा इंडिया सरकारास मोठा भरवंसा वाटतो.

## मुख्य धोरण.

कदाचित या बाजूनें एखादा आक्षेप येईल ह्मणून लार्ड कर्झन साहेब गेल्या बजेटाच्या वेळीं बोलले कीं, सरकारी चाकरीचा राजाश्रय देतांना आह्मी दोन तत्वें मुख्यतः लक्ष्यांत घेतो. प्रथमतः इंडियांच्या राज्यकारभारामधील ज्या श्रेष्ट श्रेष्ट जागा आहेत त्या इंग्रजी लोकांच्याच हातीं असल्या पाहिजेत. सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेमध्यें पसार होऊन नेटिवांसही यांपैकीं कांहीं जागा संपादितां येतात तथापि या जागांवर इंग्लिश लोकच पाहिजेत आणि तेच बहुधा असतात. राज्यप्रकरणींचें खरें ज्ञान, नैसर्गिक मनःप्रवृत्ती, आणि जोरदार नीतिमत्ता हीं राज्य कारभाराला अवश्य लागतात आणि हे गुण इंग्लिश लोकांच्या अंगीं अनुवंशिक संस्कारांनीं व सुशिक्षणांनीं आपोआपच आलेले असतात. तसेंच इंडियावर ब्रिटिश सत्ता असल्यामुळें येथील राज्य कारभार ब्रिटिश लोकांच्याच हातीं असला पाहिजे आणि राज्य कारभाराला उत्तम वळण लावण्याची व त्याला प्रगती देण्याची सर्व जबाबदारी सर्वतोपरी ब्रिटिश लोकांवरच आहे. तेव्हां ज्या जागा युरोपियन लोकांच्याच हातीं असण्याची अवश्यकता नाहीं त्या जागा संबंधानें इंडिया सरकारचें धोरण असें आहे कीं, होतां होईल तों युरोपियन लोकांची या जागावर मुद्दाम होऊन भरती करावयाची नाहीं. विद्वत्तेनें, बुद्धीनें, आणि नीतीनें जेथें लायक असे नेटिव आढळतील तेथें त्यांस त्या जागेवर नेमण्याची सरकार काळजी ठेविते. सरकारींत नेटिव मुत्सद्दीपणाचा व कर्तबगारीचा जेवढा फायदा मिळवितां येईल तेवढा तो करून घेण्याचा सरकारचा विचार प्राधान्येंकरून असतो. पण जेथें शास्त्रीय ज्ञानाची व एखाद्या विशिष्ट कलेची पारंगतता लागते तेथें मात्र त्या विषयांतील प्रवीण अशा युरोपियनांसच नेमण्याची जरुरी सरकारास तसें करण्यास भाग पाडते. वरील दोन गोष्टी संबंधानें सरकारी आकड्यांचा पुरावा देतां देतां बोलण्याच्या भरांत लॉर्ड कर्झन ह्मणाले कीं, सरकारी चाकरींत नेटिवांस जस्त राजाश्रय उदार मनानें देण्यांत येतो तसा इतरत्र क्वचितच आढळेल. ते ह्मणाले कीं रोमन पादशाही पासूनचा इतिहास वाचून पाहिला तरी देखील आमच्या इतकी उदार मनस्विता कोठेंहि आढळणार नाहीं. मध्य एशियांतील रशियन राज्यकारभार, जावा बेटांतील डच लोकांची सत्ता, आल्जिरिया, कोचिन चायना आणि टानकिन येथील फ्रेंच कारभार यांचे आंकडे आह्मी आणवून पाहिले आहेत. त्या त्या राज्यांतून इंडियांतल्या प्रमाणें पुष्कळशा नेटिवांस चाकरी देण्याचा परिपाठ दृष्टीस पडत नाहीं. इंडियांतील सरकारी जागांच्या केलेल्या विल्हेवारीला उद्देशून लार्ड साहेब असेंहि ह्मणाले कीं, इंडियांतील राज्यकारभार युरोपियन असूनहि तो नेटिवांच्या हातून चालविण्यांत येतो. यावरून जेतृ लोकांचीच येथें फारशी सत्ता चालत नसून पराजित लोकांच्या हातूनच त्यांच्या देशाचा कारभार चालविण्यांत येतो आणि ही गोष्ट प्रजाजनांची राजनिष्ठा व सात्विकपणा हीं चांगल्या रीतीनें व्यक्त करिते. आणि आह्मी राज्यकर्त्यांनींहि लोकांच्या या सद्गुणा विषयीं आदरभाव जागृत ठेविला असून उत्तरोत्तर त्यांच्यावर आमचा विश्वास अधिकाअधिकच बसत चालला आहे.

## गुडघाभर पाणी

लॉर्ड कर्झन यांची ही गोड बोली मोठी मोहक वाटते आणि ती खरोखरच प्रत्यक्ष गोष्टीला धरून असती तर आह्मी प्रजाजनांनीं स्वतांस फार धन्य मानिलें असतें. परंतु कागदी आकडेच निराळी गोष्ट बोलतात. सरासरी गुडघाभर पाणी असा हिशोब काढणाऱ्या विद्वानांची एक दंतकथा आहे तिचें स्मरण लॉर्ड कर्झन साहेबांच्या ह्या सरासरीच्या आकड्यांनीं तात्काळ दिलें जातें. ७५ रुपये पगारा वरील सर्व पगारांच्या जागांची सरासरी अशी दिलेली आहे कीं, शेंकडा २० युरोपियन २० युरेशियन, ५०

हिंदू, व १० मुसलमान असे लोक चाकरीत आहेत, ह्मणजे नेटिव लोक शेंकडा ६० असून गोरे लोक सारे ४० सच आहेत. पण वस्तुतः १००।२०० पगारा पर्यंतच्या जागावर कोणी युरोपियन नाहींच ह्मटलें तरी चालेल. २०० ते ५०० पर्यंतच्या पगारावर युरोपियन लोकांचें प्रमाण हळू हळू वाढत जाऊन तें शेंकडा ७० प्रमाणावर येऊन बसलें आहे आणि ६०० ते हजार, दोन हजार व चार हजार रुपये पगारांच्या जागावर युरोपियनांचें प्रमाण ८०-९०-९५ व ९९ पर्यंतही वाढत गेलें आहे.

### अंतस्थ गोष्ट.

मोठमोठ्या पगारांवर बहुतेक सर्व युरोपियनच आहेत आणि ही गोष्ट सरकारांनींहि आपल्या ठरावांत कबूलच केलेली आहे. लोकांचा जो मुख्य आक्षेप आहे तो मोठमोठ्या हुद्देदारीच्या जागा संबंधानेंच आहे आणि हा आक्षेप खोटा आहे असें सरकारानें कोठेंच ह्मटलें नाहीं. तेव्हां वरील सरकारी ठरावाचा सारांश असाच निघतो कीं, लष्करी खातें, विद्या खातें, पब्लिक वर्क्स खातें, जंगल खातें, पोलिस खातें, दर्याखातें, पोस्टल खातें आदिकरून सर्व खात्यांतील श्रेष्ठ श्रेष्ठ अधिकारांच्या व पगारांच्या जागावर युरोपियन अधिकारीच बहाल आहेत आणि प्रत्येक खात्यातील खालच्या कमी दर्जाच्या हलक्या जागावर अठराहि पगड जातीच्या नेटिवांचीच योजना करण्यांत येते. या खालच्याहि पगारावर युरोपियन लोक न आणितां आह्मां करितांच त्या जागा मुद्दाम राखून ठेविल्या आहेत हे राज्यकर्त्यांचे आह्मांवर उपकारच होत! रोमन पादशाही पासूनच्या इतिहासाचा दाखला देऊन लार्ड कर्झन साहेबांनीं आपल्याव इंग्रजी राज्याची जी अप्रतिम थोरवी गायिली आहे तीहि इतिहासाला सोडून आहे. खुद्द इंडियांत मुसलमानी पादशाही नांदत असतांन देखील हिंदु लोकांकडे प्रांतांची सुभेदारी, लष्करचें आधिपत्य इत्यादि मोठमोठीं हुद्देदारीचीं कामें देण्यांत येत असत. मुलकी खात्याच्याहि श्रेष्ठ जागा हिंदु लोकांना दिल्या जात होत्या. या वरून मोंगल अमदानींत दिलेल्या राजाश्रय इतका राजाश्रय प्रस्तुतच्या इंग्रजी कालांत दिला जात नाहीं असें मोठ्या कष्टानें आह्मांस ह्मणावें लागतें. तात्पर्य हें कीं अधिकारी लोक प्रस्तुतचा सरकारी ठराव हा वेदवाक्या प्रमाणें आधारभूत समजतील आणि त्यामुळें नेटिवांस राजाश्रयाची भाग्यसंपदा मिळण्याची जी थोडि बहुत संधी होती तीहि फार दूर झाली. आणि याच विचाराच्या बाजूनें हा ठराव सर्वथा त्याज्य होय.

---

### परिक्षांची शक्ती

नुकेतच कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या परीक्षांचे कांहीं निकाल वाचण्यांत आले तेव्हां त्या निकालांची भयंकर स्थिती पाहून आह्मांस विद्यार्थी वर्गाची मोठी कींव आली. कित्येक हायस्कुलांचे शेंकडा ५-७ उमेदवारही युनिव्हर्सिटीच्या प्रवेश परीक्षेंत पसार झाले नाहींत. हा निकाल फार कडक असून असले निकाल विद्यार्थ्यांचो मोठी ना उमेद करितात. किंबहुना त्यांच्या विद्यार्जनाचा नादहि अशा निराशेनें अजिबात सुटतो. सहस्त्रावधी तरुण मंडळींचा या विद्यार्जनाच्या पायीं आयुष्य व पैसा पुष्कळ खर्च होतो आणि परीक्षा मधून जर त्यांच्या परिश्रमांचें कांहींच चीज झालें नाहीं तर त्यांचा अतिशय हिरमोड होतो आणि त्यांच्या मानसिक शक्तींना एका प्रकारचा राजयक्ष्मा जडल्या सारखा होतो. हल्लीं विद्यार्थ्यांचा प्रचंड समूह युनिव्हर्सिटीच्या परीक्षांच्या चक्रांत पडलेला आहे. पुष्कळशा बाजूंनीं या चक्रामध्यें त्यांचा पक्का चुराडा होऊन जातो. जी विद्यार्थी मंडळी मोठमोठ्या परीक्षा अवतीर्ण होतात त्यांना देखील दुनियेदारीला लागतांच त्यांस त्यांच्या विद्याधनाचें चांगलेंसें पाठबळ मिळत नाहीं. अलीकडील शाळा व पाठशाळा या मधील विद्या इतक्या प्रचुर आहेत कीं त्यांना व्यवहारामध्यें कोठेंच फारशी किंमत येत नाहीं आणि ह्मणूनच पुष्कळसे विद्वान् विद्यार्थी गृहस्थाश्रमीं होतात तेव्हां असा उद्गार काढतात कीं, इतक्या वर्षांची हीं भाराभार पाठांतरें व्यर्थ होत. त्यांच्या मध्यें प्रपंचाला लागणारें द्रव्य मिळवुन देण्याची शक्ती नाहीं असा ते आपला अनुभव सांगूं लागतात. विद्या ही तात्विक दृष्ट्या अमोल्य खरी, पण व्यवहाराच्या कसोटीनें जर तिला बाजारांत कांहीं मूल्य येत नाहीं तर ती विद्या आमच्या पुष्कळशा गरीब विद्यार्थी समूहाला नको आहे असें ह्मणणें भाग पडतें.

व्यवहाराच्या दृष्टीनें अलीकडे असें वाटूं लागलें आहे कीं, पुष्कळशा विद्यार्थी समूहासाठीं ह्या इंग्रजी विद्या व परीक्षा बंद होतील तर फार बरें होईल. प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेचा जो खर्च येतो तो इतका मोठा असतो कीं, त्या खर्चाच्या मानानें तितके रुपये दरमहाहि त्यास मिळवितां येत नाहींत. कांहीं जणांच्या गोष्टी आह्मांस अशा माहीत आहेत कीं, त्यांच्या विद्यार्जनासाठीं खर्चलेला पैसा जर एखाद्या शेतींत घातला असतां तर त्याला जहागिरी उत्पन्ना प्रमाणें कांहीं तरी रकम दरसाल प्रपंचासाठीं खात्रीनें मिळाली असती. ह्या इंग्रजी विद्यार्जनानें सरकारी मोठ्या पगाराची नोकरी आपल्या मुलांस मिळेल ह्या आशेवर पुष्कळच आईबाप व तीं मुलें फसतात. सरकारी चाकरीचा तो पूर्वीचा उत्तम काल आतां उरला नाहीं ही गोष्ट लोकांच्या लक्ष्यांत अद्यापहि येत नाहीं हें मोठें आश्चर्य होय. आमच्या वरील विवेचनावरून कोणी असें समजूं नये कीं, ' वाङ्मयात्मक विद्या शिकून विद्वान् होऊं नये असा आमचा अभिप्राय आहे. ह्या विद्या पैशाच्या गोष्टी आहेत, तेव्हां ज्यांना आपल्या पितृधनाचें चांगलें पाठबळ नसेल त्यांनीं साधारण लिहिण्या वाचण्याच्या शिक्षणा पलीकडे कोणत्याच विद्येच्या भरीं पडूं नये. आणि त्यांनीं आपल्याला जो कांहीं धंदा लौकर येण्या सारखा असेल तो उचलण्याच्या मार्गाला जलदी लागावें हें उत्तम. सध्यांच्या विद्यार्थीसमूहा संबंधानें काय योजना करावी हा मोठा राष्ट्रीय प्रश्न असून तो फार गूढ आहे. एक दोन व्यक्तींचा हा विषय नव्हे. आणि निरुपायानें अन्यत्र गति कुंठित झाल्यामुळें मातापितरें आपल्या अपत्यांस या शिक्षणाच्या क्रमांतून कसे तरी ओढून काढतात आणि हा त्यांचा दोष नव्हे हें आह्मी पूर्ण ओळखूनहि आहों. या प्रश्नाचा योग्य निकाल लागण्याला देशी उद्योग धंदेच वाढले पाहिजेत. सरकारी चाकरीची आशा करीत बसणें व्यर्थ होय. पुष्कळशा लोकांना व्यवहार करून पैसे मिळवून चरितार्थ चालवावयाचा असतो. त्यांनीं इंग्रजी सुखकर विद्यांचा व परीक्षांचा नाद सोडून उद्योगधंदा करण्याची हाव धरावी आणि उद्योगधंदा चांगल्या उर्जितदशेस आणून देशांचें दारिद्र्य दूर करावें हीच गोष्ट आह्मांस पुढील पिढीस सूचवावयाची आहे.

---

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— या सप्तकांत एका रात्रीं चांगला पाऊस झाला आणि हवेंत गारवा आला असून पाऊस लवकरच चांगला जमून येण्याचीं चिन्हें दिसत आहेत. रोगराई पासून सध्यां पूर्ण मुक्तता आहे पण पंखाच्या नाकतोड्या सारखेच टोळ प्रांतांतील पुष्कळशा भागांत पसरलेले आहेत ही गोष्ट मात्र मोठ्या काळजीस कारण झालेली आहे.

**स्थलान्तर.**-- चार तहशिलदार गृहस्थांच्या खालील प्रमाणें बदल्या करण्यांत आल्या आहेतः—

| रा. रा. | सद्यःस्थल | नूतन स्थल |
| --- | --- | --- |
| पांडुरंग वासुदेव भगत | आकोट | दर्यापूर |
| रघुवीरसिंह दुनियासिंह | दर्यापूर | वणी |
| रहिमतुल्ला मौलवी हकीमुद्दीन | वणी | मूर्तिजापूर |
| धोंडू हरी ठोंगकर | मूर्तिजापूर | आकोट |

मेजर आर. पी. कोलंब डेपुटी कमिशनर आकोला हे येत्या बुधवारीं या जिल्ह्याचा चार्ज मेजर मॉडवी साहेब यांजकडे सोंपवून त्याच दिवशीं दोन प्रहरच्या गाडीनें इलिचपुराकडे रवाना होतील.

रा. रा. रंगनाथ विष्णु डोक्रस ए. अ. क. कोर्ट तेल्हारा हे १६ जून पासून ३ महिन्यांच्या हक्काच्या रजेवर जाणार आहेत. आणि त्यांच्या जागीं रा. रा. शेखमहमद इस्मायल कोर्ट वाशिम यांस पाठविण्यांत आले असून वाशिमास रा० रा० काशीनाथ श्रीराम जटार अ. क. यांस नेमिलें.

रा. रा. सैफुद्दीनखान लालखान तहशिलदार इलिचपूर यांस ए. अ. कमिशनरीची बढती देऊन उमरावतीस नेमिलें आहे आणि ते मेजर मॉडवी अ. क. उमरावती यांच्या कोर्टाचा चार्ज घेतील.

आणि मेजर मॉडवी अ. क. यांस आकोल्यास डिपुटी कामिशनरीची बढती मिळाल्या अन्वयें ते येथील कामाचा चार्ज येत्या आठवड्यांत घेतील.

येत्या १६ वे तारखे पासून येथें सेशन कचेरी सुरूं होणार आहे.

**सामुद्रिक**—रा० रा० आबाजी बाबाजी सामुद्रिक हे मुंबईहून वऱ्हाडांत आले आहेत. यांनीं हस्तसामुद्रिकाचें अध्ययन जर्मनींत जाऊन केलें आहे असें सांगतात. यांचे तीर्थरूप बाबाजीराव हे पहिलवानगिरींत फार प्रख्यात होते. ते लोखंडाच्या पहारा हातानें वळून त्यांचे तुकडे करीत असत अशा संबंधानें वऱ्हाडची जुनी मंडळी सांगतात. राजश्री आबाजी हे सामुद्रिक विद्येंत चांगले प्रवीण दिसतात आणि अशा विषयीं त्यांच्या पाशीं हजारों मोठमोठ्या लोकांचीं सर्टिफिकिटेंही आहेत. गव्हरनर, पोलिस कमिशनर, दिवाण, राजे रजवाडे, वकील, सावकार आदि करून पुष्कळशा लोकांचे हस्तछाप व दाखले यांच्या पाशीं आहेत. ह्यांचें वयमान ६०।६५ वर्षांचें असून हे शरीरानें उंच व धिप्पाड आहेत. बोलण्याचालण्यांत व गोड गप्पागोष्टींत हे फार कुशल व चाणाक्ष दिसतात हे पुष्कळ ठिकाणीं हिंदुस्थानांत व द्वीपांतरीं फिरल्यामुळें चांगले बहुश्रुत व गुणी आहेत. साधारण सामुद्रिकापेक्षां यांचा बडेजाव फार मोठा असतो आणि त्यांचा तो डामडौल पाहतांच त्यांच्या भव्य शरीराची छाप माणसावर सहाजिक पडते. यांचा वयोवृद्धपणा, बहुसाळ अनुभव आणि विनोदी हास्यमुख यांनीं मूळच्या सामुद्रिकविद्येला मोठीच भर पडते.

हल्लीं यांचा मुक्काम मूर्तिजापुरास आहे आणि तेथून ते उमरावतीस जाणार आहेत. यांच्या सामुद्रिक विद्येची लोकांनीं चांगली परीक्षा करावी आणि त्यांच्या गुणा प्रमाणें त्यांस चांगला आश्रय मिळेल यांत आह्मांस कांहींच संदेह वाटत नाहीं.

---

## आकोला बाजारभाव

| | |
| --- | --- |
| हुंडी दर्शनी | १००=॥ |
| सोनें २४।= | चांदी ७१। |
| जवारी ५५ | जवस ७॰ |
| गहू काठे ७५ | बनशी ८७॥ |
| सरकी | ५। |
| मीठ | ३॥ रु. मण |
| चणे | ३ रु. मण |
| तूप | ९। ते १० रु. मण |
| तेल | ४॥ रु. मण. |
| रुई जीन | ८१ |
| कापूस | १०-५६ |

---

### धर्माची महती—

धर्म हा रोजच्या वागणुकीचा एक नियम, मरभराटीच्या वेळीं मजबूत पहारेकरी, दारिद्र्यावस्थेंत आनंद देणारा, संकटाच्या वेळीं आश्रय देणारा, दुःखाच्या वेळीं समाधान करणारा, आणि स्वस्थतेंत आश्रयस्थापन असा आहे. धर्म शरीराला आणि त्याचप्रमाणें आत्म्याला, इंद्रिय दमनाला मोठें साधन आहे.

### जनावरांचें स्मरणार्थ—

ब्रिटिश लोकांना जनावरापेक्षां माणसांची किंमत कमी वाटते असें ह्मणून, एका इंग्रजी पत्रानें पुढील हकीकत दिली आहेः—बर्स्टो ( इंग्लंड ) येथें नामदार विल्यम ब्रेव यांनीं लोकां करितां एक पाणपोई घातली असून तीवर पुढील अक्षरें खोदलीं आहेत. ' ही पाणपोई १८९९-०२ सालांत दक्षिण आफ्रिकेंतील लढाईंत जे चार लक्ष घोडे मेले त्यांच्या स्मरणार्थ उभारली आहे.

### लहान वयांत लग्न केल्याबद्दल सरकारची चौकशी—

म्हैसुर संस्थानांत मुलीचें वय कमींत कमी आठ नऊ वर्षांचें झाल्याशिवाय तिचें लग्न करूं नये असा सरकारचा कायदा आहे. या कायद्याविरुद्ध त्या संस्थानांतील नगा मंगाला नांवाच्या तालुक्यांत एका साडेसहा वर्षांच्या मुलीचें लग्न नुकतेंच एका चवदा वर्षांच्या मुलाबरोबर झाल्याची खबर तेथील पोलीस इन्स्पेक्टर जनरलास लागल्यावरून त्यांनीं ती हकीकत दरबारांत रुजू केली. त्यावरून त्या मुलाचे आईबाप व लग्न लावणारे पुरोहित वगैरेवर रीतशीर काम चालविण्यास म्हैसुर दरबारनें परवानगी दिली आहे. व या लग्नाची बातमी उशिरा येऊन मिळाल्याबद्दल आपली दिलगिरी प्रदर्शित केली आहे.

### लोण्याचें झाड—

अशंटी येथें इंग्लिश ओक नावयाच्या झाडा प्रमाणें दिसणारें एक झाड उगवतें. त्यापासून उत्तम लोणी निघतें. हें झाड उन्हाळा, पावसाळा वगैरे सर्व ऋतूंत चांगल्या स्थितींत राहतें.

### अघोर कृत्य—

रेवा संस्थानच्या महाराजांचे सेक्रेटरी यांस कोणी द्वेषभावानें अंथरुणांत जाळून मारल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. या सेक्रेटरी साहेबांवर महाराजांची प्रीति होती तें कोणी दुष्टबुद्धि मनुष्यास सहन न झाल्या मुळें हा प्रकार घडला असावा. पोलीसचा तपास चालू आहे.

### भूमिगत सुवर्ण मूर्ती—

सोलापूर येथें सार्वजनिक मार्केट बांधा ण्याकरितां सरकारांतून शहराच्या बाहेर एक जमिनीचा तुकडा खरेदी करण्यांत आला होता. त्यांत मजूर लोक खोदकाम करीत असतां जमिनींत जुन्या पांचशें वर्षांच्या सोन्याच्या मूर्ति व रोकड रुप्याचें नाणें वगैरे आढळून आल्याचें प्रसिद्ध झालें आहे.

### माणसें व जनावरें उडून मेलीं—

कलकत्ता येथून बारा मैल अंतरावर तीन गांवांमध्यें गेल्या महिन्यांत एक भयंकर वादळ येऊन गेल्याची बातमी प्रसिद्ध झाली आहे. या वादळांत वाऱ्याचा जोर इतका भयंकर होता कीं त्यामुळें कित्येक माणसें व जनावरें उडून जमिनीवर आपटल्यामुळें मरण पावलीं व कित्येकांस जबर दुखापती झाल्या. त्या शिवाय घरदारें, झाडेंझुडें वगैरे अनेक पडून बरेंच नुकसान झालें.

### शोकजनक मृत्यु—

नाशिक येथील प्रसिद्ध कवि बळवंत खंडूजी पारख यांस पाठीच्या विकारानें १५ दिवसांपूर्वीं नाशिक मुक्कामीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास आह्मांस अत्यंत दिलगिरी वाटते. हे मोठे शीघ्र कवि होते. पोंवाडे रचण्यांत यांचा हातखंडा असे. त्यांच्या मृत्यूनें एक चांगला गुणी मनुष्य नाहींसा झाला यांत संशय नाहीं. स० वि०

### धाडसी पुरुष—

एका मोठ्या नळाच्या आत बसून नायगाराचे धबधब्याच्या पलीकडे निघून गेलेले स्वीडिश मनुष्य पीटर निस्पेन यांनीं, वॉटरप्रूफची एक जंगी पिशवी बनवून तिच्या आंत बसून वाऱ्याचे जोरावर भिरकंडत भिरकंडत उत्तर ध्रुवाकडे मजल करण्याचा विचार केला आहे.

### सोपें औषध—

ज्यांना बद्धकोट व मलावरोध होत असेल त्यांनीं प्रातःकाळीं उठल्याबरोबर एक प्यालाभर थंड पाणी प्यावें. असा कांहीं दिवस सारखा क्रम ठेवल्यास त्यांची कुरकूर दूर होईल. बरेच लोक पुरेसें पाणी पीत नसल्यामुळें त्यांनां हा विकार जडत असतो.

### स्वदेशप्रीतीचें उदाहरण—

सांप्रतच्या युद्धांत तोफांतून उडणारे सर्व गोळे जपानांत तयार झाले आहेत. डा. शिमोसे नांवाच्या जपानी शास्त्रज्ञानें शोधून काढलेली भयंकर दारू या गोळ्यांत भरलेली असते. ही दारू तयार करण्याची युक्ति फक्त त्यासच माहित असून तो स्वतः अगदीं निर्धन होता तरी त्यानें तिचें पेटंट घेऊन लक्षावधि रुपये मिळविण्याची इच्छा न धरतां तें आपल्या राष्ट्रास बक्षीस दिलें आहे! यावरून जपानी देशाभिमान ची कोणासही कल्पना येईल. वरील दारू तयार करण्यास युरोपियन दारूपेक्षां निमा खर्च येतो; पण तिचा जोर डायनामीट किंवा गन कॉटन यांहीपेक्षां फार भयंकर आहे. चालू युद्धांत या गोळ्यांनीं केलेली राशियनांची भयंकर हानी पाहून अमेरिकन, युरोपियन लोक व अधिकारी अगदीं चकीत होऊन गेले आहेत!

### असें पाणी अंगांत पाहिजे—

बड्या लाटसाहेबांचें आमंत्रण ऊर्फ हुकुम आल्याबरोबर सर्व संस्थानिक व राजे, महाराजे कर्ज काढकाढून दरबाराला गेले! पण एक संस्थानिक मात्र पाणीदार निघाला. 'आपल्या संस्थानचा खर्च उत्पन्नापेक्षां १ लक्षानें वाढला असल्यामुळें आपणास दरबारास हजर राहतां येत नाहीं,' असा रोकडा जबाब मेवाडांतील प्रतापगडच्या संस्थानिकानें मात्र सरकाराकडे पाठविला होता! के०

### तांगेवाल्यास परीक्षा द्यावी लागते—

लंडन शहरची जी जी गोष्ट ऐकावी ती अद्भूतच! तेथें इतकी एकसारखी गाड्याघोड्यांची गर्दी असते कीं तेथील तांगेवाल्यांना धंदा करण्यापूर्वी एक मोठी परीक्षा द्यावी लागते. जणु काय ही एक आपल्याकडील मुंबईची परीक्षाच होय. तांगेवाल्यास सर्व रस्तेनरस्ते, सार्वजनिक इमारती, हॉस्पिटल, पोलीस चौक्या, कचेऱ्या, थिएटरें, धर्मशाळा वगैरेंची बिनचूक माहिती असावी लागते. १९०१ सालीं या परीक्षेस १ हजार उमेदवार होते पैकीं ६ शें पसार झाले. पुष्कळजण पांच पांच सहा सहा वेळां परीक्षेस बसूनहि पास होत नाहीत. शिवाय सारथ्य-कौशल्याचीहि परीक्षा घेण्यांत येते. आणि अशा प्रकारें तो पास झाल्यावर मग कोठें त्यास तांगेवाल्याचा धंदा करण्याचा परवाना देण्यांत येतो. खरें कसब असल्या खेरीज व्यर्थ होय!

### स्त्रीशिक्षणाचा फैलाव—

तुर्क देशांत स्त्रीशिक्षणाचा प्रसार बराच झालेला आहे. तेथें मुलींच्या साठीं सरकारी शाळा आहेत त्यांवर मास्तरिणी व इनस्पेक्टरिणी सगळ्या स्त्रिया आहेत. तेथें दरवर्षी शाळेंतून जितके मुलगे पास होतात, तितक्याच मुलीही पास होतात. पुरुषशिक्षका प्रमाणें स्त्रीशिक्षकिणीहि विद्यालयांतल्या मोठमोठ्या परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या असतात.

### वधूचें कडक मौनव्रत—

कोरियन लोकांत विवाहप्रसंगीं नवरीनें ज्या दिवशीं लग्न ठरलें असेल त्या विवक्षित दिवशीं अगदीं मूकव्रत स्वीकारण्याची चाल आहे. तिनें हूं कीं चूं कांहीं एक करावयाचें नाहीं. ही अट जर कां नवरीनें मोडली तर सर्व मंडळी तिची अगदीं टेर उडवितात; शिवाय आपल्या जातीला तिला मुकावें लागतें तें निराळेंच! या प्रायश्चित्तापासून विमुक्त होण्याकरितां मोठ्या माराकुटीनें ती एखाद्या पाषाणाप्रमाणें स्तब्ध राहील, नाहीं असें नाहीं. परंतु प्रत्यक्ष नवरदेव तरी कसले खाष्ट! वाक्प्रहारानें तिला टोंचून टोंचून एखाद्या चवताळलेल्या नागिणी प्रमाणें प्रक्षुब्ध करित असतात. तेव्हां आपल्या मानससमुद्रांतील मनोविकाररूपी लाटा खवळूं न देण्याकरितां बिचाऱ्या त्या नवरीला—एक दिवसच कां होईना— जवळ जवळ साधूची वृत्ती स्वीकारण्यास काय श्रम पडत असतील तें वाचकांनीं कल्पनेनेंच जाणावें. म.

### माझी रावबहादुरी कोठें आहे?—

रावबहादुरीसाठीं वेडावलेल्या एका माणसानें गयेच्या कलेक्टरांस मध्यस्थी घालून व्हिक्टोरिया स्मारक फंडास २५००० रु. आणि लार्ड कर्झन साहेबांच्या स्वागताकरतां १००० रु. मिळून २६००० रु. त्या त्या फंडाकडे भरले व तो पदवीची वाट मोठ्या आतुरतेनें पाहात बसला. बरेच दिवस झाले तरी पदवी मिळेना. शेवटीं कमिशनरची स्वारी त्यांच्या गांवीं आली. तेव्हां आपली दाद मागण्यास ही संधी बरी आहे असें समजून आमचे हे गृहस्थ साहेबांच्या भेटीस गेले. थोडा वेळ झाल्यानंतर त्यांनीं आपली तक्रार साहेबांच्या पुढें मांडली. ते ह्मणालेः— मी रावबहादुरी बद्दल लागणारी फी आगाऊच भरली आहे व त्याची पावतीही मजजवळ आहे; मग मला अजून रावबहादूर कां ह्मणण्यांत येत नाही! पावती ह्मणजे वरील रकम भरल्या-बद्दल वरील कलेक्टराकडून आलेलें थँक्सचें पत्र होय! कमिशनर साहेबांनीं त्याविषयी चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या आणि वाटेस लावलें. झालें!

---

### नोटीस

तीं० रा. रा. रामसिंग वल्लद चिमणाजी देशमुख राहणार हिंगणे तालुके खामगांव पोस्ट— बाळापूर यांसः—

खालीं सही करणार यानकडून कळविण्यांत येते कीं तुह्मी, अमृतराव, व मी असे आपण त्रिवर्ग बंधु आहोंत. आपण पूर्वी एकत्र असतांनाच सर्वांनीं मिळून मौजे बोथ तालुके खामगाव येथील सर्वे नंबर ४ पैकी शेत एक व सर्वे नंबर ५७ पैकी शेत एक अशी दोन्ही शेते मिळविली होती. अलिकडे आपण विभक्त झालों त्यामुळें शेताचीही वाटणी झाली पाहिजे. त्याप्रमाणें तुह्मा उभयता बंधूमध्यें वाद होऊन अमृतरावानें तारीख ६।६।०४ रोजीं सर्वे नंबर ५७ शेत आपले कडे घेतले व तुह्मी सर्वे नंबर ४ पैकीचे शेताचा मला हिस्सा न देतां आपणच बळकावला हें योग्य केलें नाहीं. तरी ही नोटीस पावतांच आठ दिवसाचे आंत माझा मला हिस्सा द्यावा असे मुदतशीर न झाल्यास कोर्टांत फिर्याद करून हिस्सा घेतला जाईल. व त्याबद्दल जो खर्च लागेल तो व या नोटीशीचा खर्च तुमचे पासून भरून घेतला जाईल ह्मणून अगाऊ सुचना केली आहे. कळावें. तारीख ८।६।०४ इसवी०

सही
जगदेवसिंग चिमणाजी देशमूख
राहणार हिंगणें कारंगांव
तालुके खामगांव पोस्ट—
बाळापूर दस्तुर खुद्द.

---

### नोटीस

लक्ष्मी जवजे श्रीरामभट राहणार शेगांव तालुके खामगांव इसः—

खालीं सही करणार यानकडून कळविण्यांत येते कीं कसबे शेगांव येथील वडिलोपार्जित इनाम वंशपरंपरा लाल शाईचें सर्टिफिकीट नंबर १ व मौंजे लोहार तालुके बाळापूर येथील इनाम वंशपरंपरा लाल शाईचें सर्टिफिकीट नंबर १ व शेगांव येथील राहते घर धावे स्थावर माल असून ह्या मालाचा मालक सिताराममभट बिन मोरेश्वरभट हे होते. व त्यांचे नांवाचे दोन्ही शेतांचें खातें होतें. व धावेही त्यांचेच स्वताचे होते. सितारामभट यांनीं आपल्या मुलीचा मुलगा श्रीरामभट यांस दत्तक घेतला. त्यावरून कसबे शेगांव येथील नंबर १ इनाम खालसा त्यांपैकीं इनाम माझें नांवें लागून त्यांपैकीं कांहीं खालसा होता तो श्रीरामभट यांचें नांवें लागला. सदहू दोन्ही नंबर इनामाचें खातें माझें असून खालसा भाग जो होता त्याचें खातें तुमचे भ्रतार मेल्यावर तुमचें नांवें लागलें तें ठीक झालें. ते दोन्ही नंबर माझे आहेत. तुह्मी फक्त अन्नवस्त्राचे मालक आहात. तर हे दोन्ही नंबर व धावे माझे स्वाधीन करावे व अन्नवस्त्र मजपासून घ्यावें. मी देण्यास तयार आहे. परंतु अलिकडे तुह्मी आपले शेगांव येथील धावे तुह्मी आपला भाऊ पांडुरंग लक्ष्मण देशमुख शेगांवकर यांस खरेदी दिलें आहे. तरी असें करण्यास तुह्मास अधिकार नाहीं. त्या सर्व स्थावर जंगम जिनगीचा मी मालक आहे. त्या जिनगीपैकीं तुह्मी कांहींच कोठें गहाण, अगर खरेदी वगैरे देऊन कर्ज वगैरे काढूं नये व बक्षीसही देऊं नये. दिल्यास त्याबद्दल जबाबदार तुह्मी व्हाल. मी अगर वर लिहिलेली जिनगी होणार नाहीं. ह्मणून अगाऊ सुचना केली आहे. कळावें. तारीख ८।६।१९०४ इसवी०

सही
नरहरभट बिन मल्हारभट शेगांव
दस्तुर खुद्द.

REGISTERED No. N

वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ६० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस.... ........०१

advance.
Single copy ............................ 2 as
Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 20 JUNE 1904 NO 24

वर्षं ३८ आकोला सोमवार तारीख २० माहे जून सन १९०४ इ० अंक २४

## झारचें सुलतानास कळकळीचें पत्र.

माझी आपल्या बापाप्रमाणें तुह्माविषयीं पूज्यबुद्धि आहे. दिवसेंदिवस आपली मैत्री वृद्धिंगत होऊन व परस्परांत झालेल्या विग्रहापासून आपणांस लाभ झाला आहे. व त्यामुळें आपण बंधुप्रेमानें वागत आहों. माझी लढाई करण्याची इच्छा व तयारी नसून जपाननें एकदम लुच्चेगिरीनें पोर्ट आर्थर येथील आरमारावर हल्ला केला, व त्यामुळें झालेल्या भयंकर हानीचें वृत्त मला समजतांच मीं शोकपूर्ण अंतःकरणानें एकांत स्थलीं गेलों. तेथें माझ्या प्रिय पत्नीनें मीं स्फुंदून स्फुंदून महदाक्रोश करूं लागलों असतां माझे दुःखाश्रु पुसले ! हल्लीं तर माझें मन इतकें अस्वस्थ झालें आहे कीं, माझ्या जीविताचाही मला कंटाळा आला आहे.

माझ्या सर्व संकटांचें कारण इंग्लंडच आहे. जपानी आगबोटीवर इंग्रज अंमलदार आहेत. चीनला पण आंतून इंग्रजांचीच फूस आहे, व पोलंड आणि मध्यएशिया यांच्यामध्यें बंड उपस्थित करण्याचा प्रयत्न चालूं आहे. फ्रान्स व जर्मनीचें वळणही माझ्याविरुद्धच आहे. अशा वेळीं आपल्या मदतीची मला खास जरूर आहे व आपण मला मदत कराल तरच मी यशस्वी होईन व माझी हानि होत आहे ती बंद होईल. मी जन्मभर आपले उपकार विसरणार नाहीं. हिंदुस्थानावर चढाई करून जाण्याचें माझे मनांत आहे. त्याचा हेतु इतकाच कीं, इंग्लंडनें आपलें मन जपानांतून काढून घेऊन स्वसंरक्षणार्थ हिंदुस्थानांत झटावें. मॅसिडोनियांत बंड उभें करणारा मीं आहें अशा समजुतीनें माझा आपल्याला तिटकारा आला आहे. पण असें नीच कृत्य मी कधींही करणार नाहीं. माझें कांहीं चालत नाहीं. माझे अधिकारी सांगतील तसें मला चालावें लागतें, व त्यांचे सांगण्याप्रमाणें मी न वागेन तर माझे प्राण पंचत्वास जातील. खरोखरच माझी स्थिति फार अनुकंपनीय आहे, व माझ्या प्रिय पत्नीशिवाय माझ्या जिवाचें कोणीच माणूस नाहीं. अशा दुःखद स्थितींत मला तीन लक्ष लोकांची मदत द्याल, तर त्यांस लढाईवर न पाठवितां मुसलमानी प्रदेशांतील मुसलमान लोकांवर देखरेख व दरारा ठेवण्याकरितां ठेवीन, व तेथील माझे लष्कर लढाईवर नेईन. ह्या संकटांतून मी पार पडल्यावर आपणांस आपले हातांतून गेलेले युरोपियन प्रदेश मिळवून देण्यास मी मदत करीन, माझें आपल्याकडे घेणें आहे तें माफ करीन, व ह्या घेण्याऐवजीं मजकडे ओलीस असलेले कारो व बाटूम हे प्रांत मी आपणांस परत देईन. ह्या शिवाय, दार्दनेल्सच्या सामुद्रधुनींतून माझी लढाऊ जहाजें जाऊं देण्यास आपण परवानगी द्याल असा मला आपला भरंवसा आहे. ह्या दोन्ही मागण्यांचा आपण अनादर करणार नाहीं.

---

## सुलतानाचें झारास चतुराईचें उत्तर

तुमच्या संकटांतून परमेश्वर तुह्मांस मुक्त करो ! जपाननें दगा केला असें आपण ह्मणतां पण त्यांत अर्थ नाहीं. कित्येक प्रसंगीं लढाईंत न्याय व नियम बाजूस ठेवावे लागतात. इंग्लंडनें जपानचा पक्ष घेतला आहे, ही गोष्ट मला मान्य नाहीं. या बाबतींत तुमच्या प्रधानांनीं तुमचा गैरसमज केला आहे. प्रधानांवर विश्वास ठेवून तुह्मी लढाईला प्रवृत्त झालां; व त्यांच्याच विश्वासावर जर तुह्मी इंग्लंडशीं युद्ध कराल, तर तुमच्या बादशाहीचीं शकलें होतील. तुह्मीं स्वयंबुद्धि व्हा. हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा विचार सुद्धां मनांत आणूं नका. त्यांतून प्रस्तुत प्रसंगीं असा विचार विघातक आहे. हिंदुस्थानावर इंग्लंडचा कबजा फार मजबूत आहे. तेथें न्याय व शांतता यांचें साम्राज्य आहे. तेथील ३२-३३ कोट लोक सुखी आहेत. तुमच्या राज्यव्यवस्थेची व खजिन्याची स्थिति मला सर्व प्रकारें माहित आहे. तुम्हांजवळ पुष्कळ लष्कर असेल, पण तें योग्य व्यवस्था, पैसा व सामान ने आण करण्याच्या सवलती शिवाय काश्मीरपर्यंत सुद्धां पोहोंचणार नाहीं, व अफगाणिस्थानचा अमीर तुम्हांस हिंदुस्थानचे सरहद्दींत सहज शिरूं देणार नाहीं. हिंदुस्थानावर तुह्मी स्वारी कराल तर लढाईचें तोंड रुंद होईल, व इंग्लंडला सेंटपीटर्सबर्गवर चढाई करून जाण्यास कोणतेंही राष्ट्र अडथळा करणार नाहीं. मॅसिडोनियाचें बंड तुह्मी ( व्यक्ति या नात्यानें ) उपस्थित केलें नाहीं. पण तुमच्या सरकारानें केलें आहे, व तुमच्या सरकारच्या कृती मी कसा विसरेन ? व तुमच्या प्रधानांपुढें तुमचें कांहीं चालत नाहीं तर, तुमच्या वचनांवर मी विश्वास कसा ठेवूं ? माझे ताब्यांतून परत गेलेले युरोपिअन प्रदेश परत मिळण्याकरितां मी केवळ ईश्वराच्याच मदतीची अपेक्षा करितो. त्या एकट्यावरच माझा आधार आहे. गेलेले प्रांत पुन्हां मिळविण्याची आमची इच्छा नाहीं; कारण आह्मी बरोबर मूळस्थानाहून कांहींच आणलेलें नाहीं. सर्व युरोपियनांपासून जिंकून घेतलें आहे. प्रभू आह्मांवर दया करील तेव्हां ते आह्मी घेऊं. तुह्मी तीन लक्ष लोकांची मदत मागतां ती देण्यास हरकत नाहीं. पण हे लोक मुसलमानी प्रदेशांत मुसलमानांनीं बंड केल्यास त्यांच्याशी लढणार नाहींत. उलट त्यांच्याशीं मिळून देशास उध्वस्त करतील. व त्यामुळें आपणा उभयतांमध्यें वितुष्ट मात्र उत्पन्न होईल. व कदाचित् लढाईही जुंपेल अशा स्थितीत तीन लक्ष लोकांची मदत देतां येत नाहीं. दार्दनेल्सच्या सामुद्रधुनीतून लढाऊ जहाजें नेण्यास तुह्मी परवानगी मागतां, ती पण देतां येत नाहीं. कारण, तुर्कस्तान व इतर युरोपियन राष्ट्रांमध्यें झालेला तह त्यामुळें मोडेल. ह्या तहावर तुमच्या प्रधानाचीही सही आहे. तहाचें व धर्माचें बंधन अशा रीतीनें वचनभंग करून मी मोडूं इच्छित नाहीं. अफगाणिस्तानाचे सरहद्दींत पेंडजेशहरचा कबजा आपण घेतला त्यावेळीं लढाई उपस्थित होण्याचा संभव आहे असें मानून इंग्लंडनेंही अशीच परवानगी मागितली होती. पण ती इंग्लंडची मागणीही आह्मी स्वीकारली नाहीं. तुमची दुर्बल स्थिति लक्षांत आणून मी तहाचे करार मोडीन तर दरेक राज्यसंकटाचे वेळीं तशी मागणी येईल व माझें तुर्कस्थान संकटांत पडेल. ह्या उत्तराचा तुह्मी नीट विचार करावा. तें वाजवी आहे असें तुम्हांस वाटेल, करितां याबद्दल वाईट वाटूं देऊं नका. तुमचीं पापकर्में परमेश्वर माफ करून तुम्हांस शुभ मार्ग दाखवो !

---

## हवामान, पाऊस व जमिनीची पाणी सांठवून ठेवण्याची शक्ति.

**पर्जन्य मापन—** एखाद्या सपाट जागेवर पडलेलें पावसाचें पाणी वाहून न जातां, जमिनींत न मुरतां किंवा वाफेनें हवेत उडून ( वाष्पी भवन होऊन ) न जातां तसेंच जर एक इंच भर सांठलें तर त्यास एक इंच पाऊस पडला असें ह्मणतात. पाऊस मोजण्याचें जें यंत्र असतें, त्यास पर्जन्य मापक यंत्र असें नांव आहे. हें यंत्र तयार करण्याची एक अगदीं सोपी युक्ती अशी आहे कीं:-

पावणें चवदा इंच घेराची जस्ताची एक नळिका घेऊन त्याचें एक तोंड बंद करावें व त्यांत मधोमध लहानसें एक भोंक पाडावें. नंतर दुसरें एक लहानशा तोंडाचें भांडें घेऊन ही वरची नळी त्यांत घट्ट बसवावी. हें सजोड भांडें घरापासून, भिंतीपासून व झाडापासून दुर सपाट व उघड्या जागेंत ठेवावें. अशा रीतीनें तयार केलेल्या भांड्यास ग्राहकपात्र ह्मणतात. ह्यांत पडलेलें पावसाचें पाणी खालच्या द्वारानें खालीं जोडलेल्या भांड्यांत जातें तें पाऊस बंद जाहल्यानंतर मोजावें.

**पाऊस मोजण्याची रीत—** एक फूट लांब व ३ $\frac{15}{16}$ इंच घेराचें एक जस्ताचें भांडें तयार करावें. ह्या भांड्याच्या आंतल्या बाजूस कसली तरी रंगाची उभी रेघ पाडावी. व ह्या रेषेचे बरोबर ६४ भाग करावे. या प्रत्येक भागास खालपासून वरपर्यंत आंकडे घालावेत. सांचलेल्या पावसाच्या पाण्यानें जर सर्व भांडें भरलें तर एक इंच पाऊस पडला असें ह्मणतात. पावसाचें पाणी सकाळीं एकदां ठरलेल्या वेळेला मोजण्याचा प्रघात ठेवावा. मुसळधार चालली असेल तर मात्र सांचलेलें पाणी वरचेवर काढून घेतलें पाहिजे.

**पाऊस कसा पडावा—** शेतकीच्या कामास पाऊस पुष्कळ पडला पाहिजे इतकेंच नाहीं तर तो चांगलाही पडला पाहिजे व पावसाच्या लहान लहान सरी येत असाव्यात. एखाद्या देशांत पाऊस ८० ते १०० इंच सुद्धां पडत असेल व हा पाऊस शेतीस मुबलक आहे; पण तो पाऊस कसा व कधीं पडतो हें पूर्णपणें ध्यानांत आणलें नाहीं तर आपण केलेल्या हवामानाच्या अंदाजांत चूक होण्याचा संभव आहे. प्रत्येक आठवड्यांत किती दिवस व प्रत्येक वेळेला किती इंच व किती वेळपर्यंत पाऊस पडला हें नेहमीं पाहिलें पाहिजे. खरीपाचे पीकासाठीं नांगरणी सुरूं करण्याच्या अगोदर थोडासा पाऊस पडला पाहिजे. व मग पेरणी झाल्यानंतर झाडाची सदोदित सारखी वाढ चालूं राहावी ह्मणून मीज पावसाच्या सरी अंतरा अंतरानें येत असाव्यात. एप्रिल महिन्यांत एकदम १०।१५ इंच पाऊस पडला तर त्यापासून शेतकीस कांहीं उपयोग होणार नाहीं. त्याच प्रमाणें सपटेंबर महिन्याचे आरंभीं जोराचा पाऊस पडून पुढें पाऊसच न आला तर त्यापासून पुष्कळ नुकसान होतें. सुगीच्या वेळीं व सर्व पीक फुलोऱ्यांत येऊन दाणा धरण्याच्या वेळीं पाऊस नसणें फार चांगलें. पाऊस अगदीं बुरबुर किंवा अगदीं मोठा कधींही पडूं नये. कारण, मंद गतीनें पाऊस पडला तर पावसाचें पाणी पडल्याबरोबर लागलींच सुकून जातें; किंवा धोधो पडला तर सर्व पाणी जमिनींत मुरण्यास अवसर न सांपडल्यामुळें बरेंच पाणी वाहण्यास लागून जमिनींतील बारीक कण नाहींसे होतात व जमीन कठीणही होते. मोठ्या पावसामुळें तलाव, धरणें, व पाट भरून जातात व त्या साठींच वर्षांतून एक दोन मुसळधारीच्या पावसाची जरूर असते.

### पाण्याचा सांठा

ह्या देशांत अति वेगाची पर्जन्यवृष्टि क्वचित होते. नेहमीं साधारण पाऊस पडतात. त्याच प्रमाणें दोन पावसांत उघाडीही पुष्कळ दिवस असते ह्मणून पावसाचें सर्व पाणी जमिनींत सांचून राहील असे कांहीं तरी उपाय योजिले पाहिजेत. एखाद्या मोठ्या उतरणीवरील पाणी वरून खालीं बांध घातला असतां एक तळेंच बनून त्यांत सर्व पाणी सांठवितां येईल, व अशा प्रकारचे डोंगरांत केलेले तलाव आपल्या पाहाण्यांत पुष्कळ येतात. नद्यांतील पाणी समुद्रांत निरर्थक जाऊं नये ह्मणून नद्यांचें पाणी ठिकठिकाणीं वळवून व सखल जागीं जितकीं तळीं बांधतां येतील तितकीं बांधून त्यांत नदीचें पाणी सोडावें, व तेथून बागाईत करण्याकरितां तें शेतकरी

लोकांस देत जावें किंवा मोठा पाटच लांबवर नेऊन त्याच्या शाखा व उप शाखा सर्व देशभर बागाईत जमिनींत पसराव्या. नदीचा उगम ज्या ठिकाणीं होतो त्या टेकडीवर व नदीच्या दुथडयावर झाडांच्या रांगा लावून अति वेगानें नदीकडे जाणाऱ्या पाण्यास बऱ्याच अंशीं अटकाव करतां येतो. तें पाणी जमिनींत मुरल्यानंतर उन्हाळ्यांत त्याच पाण्याचे जिवंत झरे बनतात. आपणास आकाशांतील ढगापासून पाणी मिळतें त्याच पाण्या बरोबर झाडांस अत्यंत अवश्यक असे कांहीं पदार्थ हवेंतून जमिनीस मिळतात. या करितां आकाशांतून पडलेल्या पाण्यापैकीं बहुतेक अथवा बराच भाग जमिनींत मुरवून सांठविण्याकडे प्रत्येक शेतकरी मनुष्याचें लक्ष्य असावें; व याकरितां त्यानें आपलें शेत पावसाळा सुरू होण्याच्या अगोदर चांगल्या रीतीनें नांगरून त्यांत शेणखतासारखीं खतें भरपूर घालावीं ह्मणजे पावसाचें पाणी वाहून न जातां जमिनींतल्या जमिनींत मुरून जाईल.

अशा रीतीनें नांगरून ठेवलेल्या जमिनीस पहाटे पडणाऱ्या दंवापासूनही फार फायदा होतो. सर्व प्रकारच्या पिकांस व विशेषतः कडधान्यास दंव फार हितकारक आहे. रात्रीं आकाश साभ्र असलें तर जमिनीवर दंव पडत नाहीं.

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ शुद्ध ७ शके १८२६

## साम्राज्याची तृष्णा

इंग्लंडातील स्पेन्सर नांवाच्या साहेबांनीं महा मुत्सद्दी ग्लॅडस्टन साहेबांच्या चरित्रलेखांत इंग्लंडच्या साम्राज्याच्या वाढलेल्या तृष्णे संबंधानें जो उल्लेख केला आहे तो विचार करण्या सारखा आहे. मनुष्याच्या स्वतंत्रतेचा खरा पाठिंबा व पुरस्कर्ता ग्लॅडस्टन साहेबा शिवाय विरळाच सांपडेल ! त्यांच्या मृत्यू बरोबर स्वातंत्र्याचा एक महा आधार स्तंभच कडाडून पडला यांत शंका नाहीं. ग्लॅडस्टन सारखा स्वातंत्र्य प्रिय पुरुष सर्व युरोपांतही आढळणार नाहीं. लोकांवर विश्वास ठेवून त्यांस स्वातंत्र्यसौख्याची गोडी लावून देणें हेंच त्यांच्या आयुष्यांतील इतिकर्तव्य होतें. दुसऱ्याच्या स्वातंत्र्यावर घाला घालण्यासाठीं त्यानीं आपली कधींच वाचा विटाळली नाहीं. आपलें पारतंत्र्याचें जूं फेंकून देऊन स्वतंत्र होण्याची महत्वाकांक्षा व लालसा ज्या ज्या लोकांनीं उत्कट दाखविली त्या त्या लोकांना सहाय्य करण्यांत इंग्लंडचा पाय पहिला असे. आणि स्वातंत्र्य रक्षणाच्या कामीं इंग्लंड हें आपणांस कधींहि नाहीं ह्मणणार नाहीं अशी सर्वांची मोठी आशा व भिस्त असे. परंतु पूर्वीचे ते सुविचार व उदात्त कल्पना इंग्लंडच्या नष्ट झाल्या आहेत. दुसऱ्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याची इंग्लंडास पर्वा वाटत नाहींशी झाली आहे. आपणच आपल्या बाहुबलानें दुसऱ्यास पादाक्रांत करून त्यांचें स्वतंत्र्य हिसकावून घ्यावें अशी पाप वासना इंग्लंडचे पोटांत उत्पन्न झाली आहे. दुसऱ्याचें स्वातंत्र्य व देशभक्ती त्यांच्या डोळ्यांत सलूं लागली आहे. जे जे देश व जे जे लोक इंग्रजी साम्राज्याच्या छत्रा खालीं येत नाहींत त्या सर्व रानटी लोकांना बळजेरीनें इंग्रजी समशेरीनें व बंदुकीनें सुधारले पाहिजे असें महा पवित्र कृत्य करण्याचें त्यांनीं मनांत आणिलें आहे. आणि जों पर्यंत त्यांच्या पुण्याईचा व सद्दीचा जोर आहे तों पर्यंत याच्या आड कोणी येईल हें संभवत नाहीं.

## घोर संकटाचा हृद्रोग

रशिया हा आज उद्यां जपानची खबर घेईल ह्मणून जो पुष्कळांचा भ्रम होता तो आतां भ्रमाचा भोपळा चांगला फुटला आहे. रशियाची शक्ति चांगलीच अजमावली गेलेली आहे. झाराचा व सुलतानाचा पत्रव्यवहार आह्मी पहिल्या पृष्ठावर छापला आहे त्यावरून रशियाची अंतःस्थ स्थिती बरोबर कळून येणारी आहे इतकेंच नव्हे तर एका शितावरून हंडाभर भाताची परीक्षा करावयाची ह्मटलें ह्मणजे सर्व युरोपियन राष्ट्रांची दुर्बलता सहजी दृष्टोत्पत्तीस येते. पृथ्वीच्या पाठीवर आज नांव घेण्यासारखीं महा साम्राज्यें अशीं दोनच आहेत. इंग्रजी साम्राज्याचा पंगुपणा किती आहे ह्याची ओळख बोअर लढाईचें स्मरण दिल्यानें चांगली पटणार आहे. सध्यांची तिबेटावरील मोहीमही याच गोष्टींची साक्ष देत आहे. इंग्रजी साम्राज्याच्या तोडीचें रशियन साम्राज्य आहे व त्या साम्राज्याची खरी शक्ती सध्यांच्या जपानच्या लढाईंत दिसतच आहे. जपानच्या अव्याहत जयामुळें युरोपियन राष्ट्रांस 'यलो पेरिल' ह्मणजे पिंवळ्या लोकांचें आलेलें संकट हें भयभीत करून सोडीत आहे इतकेंच नव्हे तर त्यास असाहि हृद्रोग जडला आहे कीं, आशियांतील हें पिंवळें व काळें रक्त पांढऱ्या रक्ताचें मंथन करील की काय कोण जाणे ! एवंच हा लढाया ह्मणजे युरोपियन पारतंत्र्यांत गुरफटलेल्या राष्ट्रांस स्वातंत्र्यप्राप्तीचा एक सोपा सन्मार्गच दाखवीत आहेत ह्मणावयाचें ! लढाईच्या आदिमायेचें शक्तिसामर्थ्य थक्क करून सोडणारें आहे. ती अती उन्नत अशा शैलशिखरीं नांदणाऱ्या एखाद्या महा राष्ट्रास रसातळास आणून पोचवितें आणि दुसऱ्या एखाद्या खालीं खोल लोळत पडणाऱ्या राष्ट्रास उच्च पदीं अधिष्ठित करिते. हे युद्धदेवते तूं खरोखरी मोठी अगम्य आहेस !

## रुसो-जपानी युद्ध

जपान व रशिया यांच्या मधील युद्ध संग्रामांत या आठ दिवसांत कांहीं विशेष अशी लढाई झाली नाहीं. पोर्ट आरथरचा वेढा हाच सध्यां सर्वांच्या डोळ्यापुढें दिसतो आहे. जपानी लोक एक सारखे त्यावर हल्ले करित आहेत. किल्ल्यांतील रशियन लोकांजवळ अन्नसामुग्री भरपूर नाहीं तरी त्यांचेजवळ दारूगोळा मात्र पुष्कळ आहे. आणि त्यांची सुटका करण्यासाठीं दुसरे रशियाचे लोक लौकर आले नाहींत तर त्यांस अखेरची जिवावर उदार होऊन एक लढाई द्यावी लागेल व अशा निकराच्या लढाईंत जपानच विजयी होईल. एकंदरीनें पोर्ट आरथर हें जपानच्या हातीं येण्यास थोडासा कालावधी आहे इतकेंच.

पोर्ट आरथर जवळील मोठ्या समुद्रांत आणि चीनच्या हद्दींत रशियानें तरते सुरुंग टाकले आहेत. हें करणें गैर कायदा असून इतर राष्ट्रांस चीड आणणारें आहे. किल्ल्या सभोंवती १५ फूट खोलीचा खंदक आहे. शिवाय सभोवार मोठमोठ्या तोफा डागल्या असून चोहोंकडे सुरुंगाची पेरणीच केली आहे. येणें प्रमाणें त्या किल्ल्याची तनदुरुस्ती रशियन लोकांनीं केलेली आहे.

चीनचें जपानशीं सख्य आहे ही गोष्ट रशियास बरी वाटत नाहीं. लायओसि येथील सैन्याचा तळ तुह्मी उठविला नाहीं तर आह्मी जपानशीं सख्य करूं अशी धमकी चीननें रशियास दिली होती व त्या प्रमाणें तें सैन्य तेथून हलविण्यांतहि आलें. चीनी लोक जपान बरोबर मित्रत्वानें वागतात ह्मणून रशियन लोक फार संतप्त झालेले आहेत.

रशियांतील लोक नवीन आरमारासाठीं मोठमोठे फंड जमवीत आहेत आणि समुद्रांत दडी मारून राहणाऱ्या गलबतांत सुधारणा करणारांस मोठीं बक्षिसें देण्याचे हुकूम सुटले आहेत. रशियांतील अंतर्भागांत अस्वस्थता झाली असल्यामुळें रशियन मुत्सद्दी मोठ्या काळजींत आहेत. लढाईमुळें राशियांतील व्यापारधंदाहि मंदावला असून लोक दिवाळी काढीत आहेत आणि कारखानदार आपले कारखाने बंद ठेवीत आहेत.

## सर्व जगाची लढाई

इंग्रजी साम्राज्य आपले हात पाय दूरवर पसरीत चाललें आहे ही गोष्ट दुसऱ्या कोणच्याहि राष्ट्रास खपत नाहीं. सर्व युरोपामध्यें इंग्लंडचा खरा दोस्त असें राष्ट्र क्वचितच असेल. इंग्रजी दराऱ्यामुळें व युक्तीमुळें इतर राष्ट्रें वर तोंड काढीत नाहींत इतकेंच. बाकी सर्व युरोपियन राष्ट्रांच्या मनांत इंग्लंड बद्दल प्रखर द्वेषाग्नि पेटत आहे. आपल्या साम्राज्य भोंवतीं पेटत चाललेला हा वणवा इंग्रज लोकांच्या डोळ्यापुढें आहेच व त्या साठीं त्यांची तयारीहि आहे. 'सर्व जगाची लढाई' असें एक पुस्तक जर्मनींत निघणार आहे. त्यांत इंग्लंडनें कावेबाजपणानें इतर राष्ट्रांस झुंझायास लावून आपला फायदा करून घेतला असें तो ग्रंथकार सिद्ध करून दाखविणार आहे. ही इंग्लंडची चतुराई आतां सर्वांस चांगली समजूं लागली आहे. आणि ह्मणूनच सर्व राष्ट्रांचें एक घनघोर युद्ध पुढें लौकरच होईल असा संभव आहे. इंग्लंडचा पुरा द्वेष करणारे फ्रेंच, जर्मन, व रशियन राष्ट्रें एकत्र होऊन इंग्लंडाचा मूड घेतील असें एकंदरीत भविष्य दिसतें. इंग्लंड-संबंधीं मनांनी मनें कलुषित झालेलीं आहेत व इंग्लंडचा पाडाव करण्याचे बेत व तयारी प्रत्येक जण आपल्या मगदुराप्रमाणें करीत आहे आणि असा हा आनंदाचा दिवस केव्हां येईल ह्मणून अनन्यभावें वाट पहात आहेत. अशा प्रकारें सर्व जगताची लढाई करून असंख्य जीव मारून अमूप रक्त सांडण्यांत त्या ईश्वराचा काय हेतू असावा बरें ! अशा या भावी प्रलयाचें भयंकर दिसत असलेलें स्वरुप पाहून भीतीनें मन कचरतें आणि हा मानवी संहाराचा प्रसंग परमेश्वर न आणो ह्मणून त्याच्या पदीं शरण जातें.

## तिबेट मोहीम

सध्यांच्या तिबेट वरील मोहिमी इतकी अन्यायाची गोष्ट दुसरी झाली नसेल ! तिबेटी लोक मोठे भोळसट व गरीब आहेत. आज हजारों वर्षे ते त्या पर्वतामध्यें सुखानें नांदत आहेत. दुसऱ्याच्या कामांत त्यांनीं कधींहि हात घातला नाहीं व त्यांच्या कामांत कोणी पडूं नये अशी त्यांची फार इच्छा आहे. इंग्रजांनीं त्यांच्यावर वाईट दृष्टी ठेविली ही गोष्ट बरी केली नाहीं. आज ग्लॅडस्टन साहेब असते तर त्यांनीं आपल्या वक्तृत्व शक्तीनें ही तिबेटची मोहीम माघारी फिरविली असती. इंग्लंडची नीतिमत्ता दिवसेंदिवस नष्ट होत आहे ही गोष्ट राष्ट्राच्या कल्याणाला बरी नाहीं.

तिबेटी लोक आपल्या स्वातंत्र्यासाठीं जीव कीं प्राण ह्मणून लढत आहेत. त्यांस उघड रीतीनें कोणाकडून मदत मिळेल अशी आशा नाहीं तरीं चोरून त्यांस थोडीशी तरी मदत होत आहे. मोंगोलिया व सैबेरिया कडून त्यास शिकलेल्या हत्यारी लोकांचें सहाय्य मिळालें आहे ह्मणतात. तसेंच तिबेटी लोकांस चांगल्या बंदुका, तोफा, व दारूगोळा मिळाला आहे. ते मोठ्या हिंमतीनें इंग्रजावर हल्ले व छापे घालतात. गियांत्से किल्ल्याची जागा नाकेबंदीची आहे व हा किल्ला तिबेटी लोकांनीं चांगल्या बंदोबस्तानें संभाळला आहे. खांगमा गांवीं तिबेटी लोकांनीं नुकताच इंग्रजी छावणीवर छापा घातला तेव्हां जें शौर्य दाखविलें तें खरोखर वर्णनीय होय ! ह्या लढाईंत तिबेटी लोक जिवावर उदार होऊन लढले. शत्रूच्या गोळीबारास न भितां तटबंदी पर्यंत ते चालून गेले आणि त्यांनीं शत्रूच्या बंदुकीच्या तोंडावर हात देऊन तरवारीचा मारा चालवून तटबंदी सर करण्याचा मोठा प्रयत्न केला. पण शेवटीं त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. असो. पराजित होत असताहि शौर्यानें स्वातंत्र्या साठीं लढणें हेंच खरें मर्दुमकीचें कृत्य होय !

## सेशन खटले

गेल्या गुरुवारा पासून येथें सेशन कचेरी भरत असते. या सेशनांत चार पांच खुनांचे खटले चालणार आहेत.

पहिला खुनाचा खटला ह्मणजे लहान लहान पोरांनीं केलेला एक भयंकर खेळच होय. खामगांव तालुक्यांतील जल्म या गांवीं हा खून तारीख १३ एप्रिल रोजीं घडला. एक गोविंदा वल्लद मुपऱ्या नांवाचा धोब्याचा

पोरगा सकाळीं खेळावयाला ह्मणून घराबाहेर गेला. तो आपला सोबती संपत्या माळी याजबरोबर खेळण्यास गेला होता. संपत्याचें वय १५।१६ वर्षांचें आहे. संपत्या बरोबर आणखी दोन धोब्याची पोरें शिवऱ्या व खंड्या नांवाचीं १२।१३ वर्षांचीं होतीं. या तिन्ही पोरांनीं गोविंदाला ओढीत ओढीत रानांत नेलें. गोविंदाच्या अंगावर रुप्याचीं कडीं, चांदीच्या मुद्या व तीन सोन्याच्या बाळ्या मिळून बारा पंधरा रुपये किंमतीचा विषय होता. त्यांचा कोणता खेळ चालला होता. कोण जाणें! त्यांनीं गोविंदाला विटांनीं मारमार मारलें, त्याच्या गळ्याजवळील भागांत खुंटी ठोकली व अशा रितीनें त्याचा वध त्या तीन पोरांनीं दिवसाढवळ्या केला. गोविंदाच्या अंगावरील दागिने काढून घेऊन त्या पोरांपैकीं संपत्यानें ते घरांत पुरून ठेविले आणि सोन्याची बाळी एका सोनाराजवळ १ रुपयावर गहाण ठेविली. गोविंदाचें प्रेत नाल्यांत तसेंच पडलें होतें. पुढें गोविंदा हरवला ह्मणून दोन प्रहरीं सर्वत्र शोध सुरूं झाला तेव्हां चौकशी होतां होतां तें प्रेत सांपडलें संपत्यानें गोविंदाच्या अंगावरील माल काढून दिला, सोनारा कडील बाळी आणिली, आणि संपत्यानें व दुसऱ्या दोन्ही पोरांनीं भराभर सर्व गोष्टी कबूल केल्या आणि खाम गांवचे १ ले वर्ग माजिस्त्रेट रा० रा० क्राफर्ड यांच्या समोर त्यांनीं कबुली जबाबही दिले. ही गोष्ट पोरस्वभावाला अगदीं अनुरूप अशीच झाली. पण पुढें सेशनांत खटला चालूं झाल्यावर आरोपींनीं पूर्वीच्या कबुली जबाबांचा इनकार केला. गोविंदाचा खून झाला खरा पण शिवऱ्या व खंड्या या दोन पोरा विरुद्ध पुरावा नसल्यामुळें त्यांस दोषमुक्त करण्यांत आलें आणि संपत्या माळ्या संबंधानें आज निकाल सांगण्यांत येईल. पोरापोरांमध्यें खुनाचे खेळ होतात ही गोष्ट जवळ जवळ अगदीं अपूर्व होय. पोरांची ही दुष्ट मनोवृत्ती पाहून फार वाईट वाटतें.

## टोळधाड

टोळधाडीचा अनुभव आमच्या प्रांताला अगदीं नवीन आहे. हें विघ्न फार मोठें आहे. सध्यां टोळांची स्वारी या प्रांताकडे वळली आहे. पश्चिमेकडून व दक्षिणेकडून या टोळांच्या फौजा या प्रांतावर लोटल्या आहेत. पूर्वे कडूनही कांहीं टोळ्या येत असल्या विषयींही लोक बोलतात. टोळांच्या झुंडीच्याझुंडी आकाशांतून जात असतांना दृष्टीस पडतात अशा विषयीं चोहोंकडून बातम्या आल्या आहेत. गेल्या गुरुवारीं सायंकाळीं टोळांच्या कांहीं पलटणी आकोल्याच्या आसपास उतरल्या तेव्हां आकाशांत एक लांब चेलांबत पसरलें आहे असा भास होई. टोळाला घोडा असेंही ह्मणतात. या घोड्यांच्या अनेक जाती आहेत. कांहीं नाकतोड्याच्या आकृतीचे असून पंखांचे असतात. कांहीं लांबलचक असून रंगीबेरंगी असतात आणि त्यांच्या पंखांचा भाग करवता सारखा तीक्ष्ण धारेचा असतो. टोळ ज्या झाडावर बसतात त्या झाडाला एक पानीहि शिल्लक ठेवीत नाहींत. यांचे थवेच्या थवे ठिकठिकाणीं येऊन बसतात तेव्हां त्यांच्या भारानें वृक्षाच्या फांद्याही लवतात. ज्या भागांमध्यें टोळ उतरतात त्या भागांत झाडाला पानें राहत नाहींत

टोळांची शीरगणती करण्याचा संभवच नाहीं. मुंग्यांची जशी संख्या मोजतां येणार तशीच गोष्ट या टोळांची आहे. टोळ हा प्राणी प्रवास करण्याला मोठा जबरदस्त आहे. त्याचा प्रवास दिवसांतून चाळीस चाळीस पन्नास पन्नास मैलहि होत असतो. याचा आयुष्य क्रम शोधक बुद्धीला मोठा विचारणीय वाटेल. असा अनुभव सांगतात कीं, टोळांची स्वारी येण्या पूर्वीं कांहीं दिवस प्रथम प्रथम थोडे तुरळक टोळ हेरा प्रमाणें आगाऊ येत असतात आणि नंतर ते टोळ मोठमोठ्या समुदायानें येऊं लागतात. टोळ हा मोठा समाजप्रिय प्राणी दिसतो. त्याची हालचाल नेहमीं टोळीटोळीनें होत असते. टोळांची एखादी टोळी आकाशांतून जात असतांना मध्यंतरी जर एखाद्या भूभागावर हागली तर तेथें विष्टेचा एक थरचा थर दृष्टीस पडतो यांचा एक एक समुच्चय केवढा मोठा असतो हें त्यांच्या विष्टेच्या ढिगावरून कळण्या सारखें आहे. आकाशातून त्यांची स्वारी जाऊं लागली म्हणजे एका प्रकारची घनदाट गर्द छाया पडते.

यंदा मुंबई इलाख्यांत टोळांनीं प्रचंड विध्वंस केला. टोळ हे वनस्पतीच्या सृष्टीचे संहारकर्तेच होत. इतकी जबरदस्त विध्वंस करण्याची त्यांची शक्ती आहे! टोळांचा नाश करण्याची युक्ती मनुष्यांस अजून कांहीं कळलेली नाहीं. आमच्या प्रांतांत हा टोळांचा उपद्रव पहिल्यानेंच आहे. सध्यां टोळ आले आहेत पण त्यांस नाश करण्याला पिकें वगैरे कांहीं उभीं नाहीत. टोळांची गती उत्तर दिशेकडे आहे. कदाचित आमच्या प्रांतांत पिकें येण्याच्या सुमारापर्यंत यांचे कोठे तरीं द्वीपांतरीं गमन होईल असा अंदाजा आहे. कांहीं लोकांचा समज असा आहे कीं, पर्जन्य काळ चांगला जोराचा होऊन सर्वत्र विपुल वृष्टी झाली म्हणजे आपोआपच यांचा संहार होईल. टोळांचे विघ्न म्हणजे ईश्वरी क्षोभच होय. परमेश्वरच हा विघ्नबाधा दूर करो !

## जेल प्रकरण

हल्लीं येथील तुरुंगाच्या प्रकरणाचा शोध रात्रंदिवस चालू आहे. तुरुंगांतील आगीचा मागमूस चांगला लागला आहे असें लोक बोलतात. आमच्या जिल्ह्याचे पोलीस सुपरिंटेंडेंट रा. रा. वूड साहेब या कामीं अश्रांत परिश्रम घेत आहेत. मध्यप्रांताचे जेलचे इन्स्पेक्टर जनरल मेजर बनातवाला हेही येथील तुरुंगाच्या प्रकरणा विषयीं फार दक्षतेनें चौकशी करीत आहेत. या एका आगीच्या प्रकरणानें पुष्कळशा संबंधांत आग पसरून दिली आहे. नाना विध गोष्टी बाहेर येत आहेत आणि लोकवार्तेतील शंभर गोष्टी पैकीं एक गोष्ट खरी ह्मणून जमेला धरली तरी असें वाटतें कीं बहूत वर्षांच्या संचित झालेल्या पापराशींच्या खाणीचा गुप्त दरवाजाच या आगीच्या प्रकरणानें उघडून दिला आहे कीं काय ! खऱ्याखोट्याची शहानिशा न्याय कोर्टांतच होण्यासारखी आहे तेव्हां आह्मी या संबंधानें कांहीं अधीक लिहूं शकत नाहीं पण आमची एवढीच विनंती आहे कीं, या तुरुंगाच्या प्रकरणाचें दप्तर निराळें ठेवून त्याच्यावर सरकारी ठराव लोक माहित साठीं अवश्य प्रसिद्ध करण्यांत यावा. पुष्कळशा गोष्टि खऱ्या असतात पण त्या न्यायाच्या दरबारांत शाबीत होण्या सारखा नसतात तथापि त्यांच्या संबंधानें सरकार आपल्या खात्या पुरती अंमलबारी चांगली करूं शकते गुन्हेगारावर आरोप शाबीत करण्याची गोष्ट निराळी आणि आकोल्याच्या तुरुंगाचा इतिहास गोळा करण्याची गोष्ट निराळी. लोकांस हा इतिहास पाहिजे आहे. आणि आह्मांस तर असेंहि वाटतें कीं लंडन मिस्टरी प्रमाणें येथील तुरुंगाचा एक मोठा इतिहासच होईल.

### छोटें पिल्लूं

या तुरुंगाच्या प्रकरणाचें छोटें पिल्लूं हल्लीं कोर्टासमोर आलेलें आहे. रा. रा गोपाळ वामन बायट बी. ए. एल एल बी. माजिस्ट्रेट वर्ग १ ला यांच्या समोर विठलदास भाटे यांच्यावर फौजदारी खटला चालूं आहे. सदर्हू विठलदास हे जेलचे कंट्राक्टर आहेत. जेलाला सामान पुरविण्याचा मक्ता यांच्या कडे आहे. जेलांतील नीळ वगैरे मालाची अफरातफर यांच्या हातून करविण्यांत आली आणि अशा प्रकारें चोरीच्या मालाची विल्हेवाट केली असा यांच्यावर आरोप आहे. हा खटला चालूं असतांना लोकांची गर्दी पुष्कळ होते. गेल्या शनिवारीं मोकद्दम्याची दुसरी पेषी झाली. विष्णु प्रभाकर माणकीकर व आबाजी गाढवे या दोघा कैद्यांच्या साक्षी पुरवा व्हावयाचा होता पण कांहीं कायद्याच्या भानगडी मुळें हा खटला येत्या शनिवारा पर्यंत तहकूब ठेवण्यांत आला आहे. माणकीकर याला माफी अजून मिळावयाची आहे ह्मणून ती मिळे पर्यंत त्याची साक्ष घेण्यांत आली नाहीं. माणकीकर यांस माफी देण्याचें कारण असें दाखवितात कीं, जेल-प्रकरणांतील पुष्कळशा गोष्टींत यांच्याकडे प्रधान भाग होता आणि यांच्या साक्षीचें फारच फार महत्व आहे. आबाजी गाढवे याची साक्षहि अपूर्णच राहिली. २५ वे तारखे-पर्यंत हा खटला तहकूब आहे.

दुःखद मृत्यु लेख—आमचे व्यवसाय बंधु रावसाहेब अंताजी रामचंद्र जोगळेकर धारवाडवृत्त कर्ते यांस तारीख १६ गुरुवार रोजीं धारवाड मुक्कामीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास आह्मांस अंत्यत दुःख वाटत आहे. अलिकडे वर्षभरापासून रावसाहेबांची प्रकृती खालावत जाऊन शेवटी कफक्षय व मधुमेह होऊन त्यांतच त्यांचा अंत झाला. मरणसमयीं त्यांचें वय ५६ वर्षांचें होतें. ह्यांनीं धारवाडवृत्त पत्र आज ३० वर्षे मोठ्या बाणेदार रीतीनें चालविलें होतें. यांचे लेख चांगले लोकमान्य असत. रावसाहेबांना सार्वजनिक कामांत पुढाकार घेण्याचीहि मोटी हौस असे. ९९ साळच्या प्लेगाच्या वेळीं यांनीं चांगली कामगिरी बजाविली ह्मणून सरकारांनीं त्यांस 'रावसाहेब' असा बहुमानाचा किताबत दिला होता. शिवाय ते ऑनररी मॅजिस्ट्रेटीचें कामहि करीत होते. सरकारानें वृत्तपत्रकाराचा इतका गौरव केल्याचें उदाहरण विरळाच! यांच्या मृत्यूनें कर्नाटकांतील एक अनुभवी, पोक्त, हुषार व उद्योगी गृहस्थ नाहींसा झाला ह्मणून लोक फार हळहळत आहेत. रावसाहेबांचे मागें त्यांचे नांवाईक धारवाडवृत्त वर्तमानपत्र नामशेष होऊं देणार नाहींत अशी आह्मी उमेद बाळगतों. रावसाहेबांस स्वर्गलोकीं ईश्वर सुखी ठेवो !

## वऱ्हाडवृत्त

**हवामान**— दोन तीन पाऊस चांगले झाले. मृगशीतळाई विशेष सुखकारक वाटते. आकाशांत ढग पुष्कळ जमतात आणि पाऊस चांगला पडण्याचीं चिन्हें दिसत आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी कोणतीच नाहीं.

रा. रा. हेअर साहेब कमिशनर हे १ ल्या जुलै पासून पेनशनदार होतील आणि त्यांच्या जागीं लेफ्टेनंट कर्नल वारन हेस्टिंग्स आय. ए. डेपुटी कमिशनर वर्ग १ ला यांस कमिशनर नेमण्यांत आलें आहे. या जुन्या अधिकाऱ्यांचा गौरव कमिशनरी देऊन केला हें फार चांगलें झालें.

रा. रा. सैफुद्दीनखान यांस एक्स्ट्रा आसिस्टंट कमिशनर नेमल्यामुळें त्यांच्या इलिचपूरच्या तहशिलदारीच्या जागीं रा. रा. बळीराम त्रिम्बक नायब तहशिलदार यांसच तेथें नेमण्यांत आलें. आणि तेथील नायब तहशिलदारीवर रा. रा. दत्तोपंत बरवे यांस नेमिलें.

## नोटीस

बेशमी- (१) भिवा वल्लद हरी बारी आणि (२) विठू वल्लद हरी बारी उभयतां राहणार आकोट- यांसः-

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, मौजे खुदावनपूर ता० आकोट येथील शेत सर्व्हे नंबर २२ एकर १४ गुंठे २३ आकार रुपये १३ हें सालीम शेत तुमचे कडेस पुष्कळ वर्षांपासून तावे गहाण ह्मणून होतें. तीन चार वर्षां पूर्वीं दिवाणी कोर्टांतून त्या शेतातील दोन हिस्से महादू व जानजी ह्या दोघांस मिळून १/३ हिस्सा शिवाचा तुमचे जवळ अद्याप पावेतों गहाण आहे. त्या गहाणाबद्दल जे हिशोबानें पैसे होत असतील ते घेऊन तुह्मी शेत आमचे ताब्यांत द्यावें. या गोष्टी करितां आठ दिवसांची मुदत तुह्मांस दिली आहे. येणें प्रमाणें तुह्मी न कराल तर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून अखेर निकाला पर्यंतच्या सर्व कोर्टखर्चासह व या नोटिशीच्या खर्चासह रक्कम तुह्मांकडून घेऊन शेतहि ताब्यांत घेतलें जाईल. ह्मणून मुद्दाम या जाहीर लेखानें तुह्मांस कळविलें आहे. कळावें. तारीख १८ जून सन १९०४ इ०

सहीची निशाणी

जानू वल्लद केसोजी राहणार

आकोट निशाणी खुद्द.

**धीर सत्व—**

वस्तूचें स्वरूप परिणामीं घातुक पण मुळांत मोठें सुंदर, सुखकर, लोभनीय, चित्ताकर्षक असें असतें; व पुष्कळदां याच स्वरूपाला भुलून जाऊन मनुष्य कायमचें खेदजनक कार्य करण्याला तयार होतो. जो या वरपंगी देखाव्याला भुलत नाहीं तोच खरोखर शहाणा व तोच खरोखर धैर्यवान्.

**गमतीची चाल—**

जर्मनींतील एका गांवीं तरुण कुमारिकेस जेव्हां पुष्कळशा लोकांकडून मागण्या येतात, तेव्हां गुलाबाच्या फुलाच्या पाकळ्या निरनिराळ्या करून दरेक पाकळीस एकेक पुरुषाचें नांव देतात. नंतर त्या पाकळ्या पाण्यांत फेकून देतात व त्यांपैकीं ज्या नांवाची पाकळी सर्व पाकळ्यांच्या शेवटीं पाण्यांत बुडेल, त्या मनुष्याची मागणी कबूल करण्यांत येते.

**वाऱ्यानें चालणारें घड्याळ—**

ब्रुसेल्स येथें एक मोठें घड्याळ आहे. त्यास मनुष्य प्राण्याकडून किल्ली देण्याचें कारण पडत नाहीं. तें वाऱ्याच्याच जोरावर बरोबर चालतें.

**मौजेचा कायदा—**

आफ्रिकेमध्यें एका जातीचे लोक आहेत. त्यांत जाहीर सभेंत भाषण करणाऱ्या लोकांस आपल्या भाषणाच्या वेळीं एका पायावर उभें रहावें लागतें. व जेथपर्यंत त्यांस एका पायावर उभें रहावेल तेथपर्यंतच त्यांस भाषण करण्याची परवानगी असते.

**काय चमत्कार पहा—** लुधियाना जिल्ह्यांत एका गांवांत प्लेग आल्यामुळें ग्रामस्थ लोक स्थानांतरास गेले. त्यांतच तेथील एक सधन गृहस्थहि आपली बायका मुलें घेऊन बाहेर गेला. त्याच्या घरांत फक्त त्याची वृद्ध मातोश्री राहिली होती, आणि तिला दुसऱ्या दिवशीं येऊन तो नेणार होता. त्याच रात्रीं गांवावर दरवडा आला. गांवांत ठळक व धनाढ्य घर हेंच असल्यामुळें चोरटे ह्याच गृहस्थाच्या घरावर पहिल्यानें येऊन त्यांनीं गृहप्रवेश केला. तों आंतून चोरांच्या कानीं असा ध्वनि आला कीं, "आलेत, बरें झालें तुमची वाटच पहात होतें" हे उद्गार घरांत असलेल्या वृद्ध मातोश्रीनें आपला मुलगा आपणांस नेण्यास आला, असें वाटून मोठ्या उत्कंठेनें उच्चारिले होते, परंतु चोराला तेच उद्गार विपरीत भासले. प्लेग देवता आमचा बळी घेण्याकरितां आंत बसली आहे, आणि तिचेच हे शब्द आहेत, अशी त्यांची भावना होऊन त्यांची जागच्या जागीं गठडी वळली. दोचे चोरटे तर तेथच्या तेथेंच भीतिविव्हल होऊन प्राणास मुकले व कांहीं जीव घेऊन कसे तरी पळाले. दरोडा राहिला बाजूसच ! दुसऱ्या दिवशीं सकाळीं वृद्ध बाईचा मुलगा मातोश्रीला नेण्याकरितां घरीं आला, तों घरांत दोन प्रेतें ! ! पुढें चौकशी करितां ते दरवडेखोर होते व ईश्वरी शासनानें मेले असें कळलें. प्र.

**चर्बीचें झाड—** चर्बीचीं झाडें चीन देशांत पुष्कळ दिवसांपासून असून, तेथें या चर्बीचा चांगला व्यापारही चालतो. शंभर वर्षांपूर्वी हीं झाडें हिंदुस्थानांत आणून, त्यांची बंगाल, वायव्य व पंजाब प्रांतांत लागवडही केलेली होती; व सुमारें ६० वर्षांपूर्वी छोटा नागपूर प्रांतांतही कांहीं झाडें लावलीं होतीं. हिंदुस्थानांतील हवेंत हीं झाडें चांगलीं वाढतात असा अनुभव आला आहे; पण चर्बी काढण्यांत जशी मेहनत करावयास पाहिजे तशी होत नसल्यामुळें, चीनप्रमाणें इकडे हा धंदा फायदेशीर झाला नाहीं. ह्या झाडांच्या चर्बीच्या मेणबत्त्या, साबण वगैरे पदार्थ तयार करण्याच्या कामीं उपयोग होत असून, त्यांच्या पानांचा काळा रंग होतो व लांकूड बळकट आणि कठिण असल्यामुळें, छापखान्यांतील कोरीव चित्रें करण्याच्या कामीं तें उपयोगीं पडतें. चीन देशांत हा धंदा फायदेशीर असून, दरवर्षी हजारों टन चर्बी बाहेर जात असते.

**चिनी लोकांच्या उलट्या चाली—** होकायंत्र नेहमीं दक्षिण दिशा दाखवितें, पुरुष झगे घालतात, बायका इजारी घालतात पुरुष आपले केंस सडक लांब ठेवतात, बायका आपल्या केसांना गांठीं मारून वेटाळी करतात, बोलण्याची भाषा लिहिण्यांत येत नाहीं, लिहितात ते बोलत नाहींत, बुकें पुढून मागें वाचीत जातात, टिपा वगैरे द्यावयाच्या त्या डोक्यावर देतात, लग्नाच्या वेळच्या करवल्या काळा पोषाख करतात व त्या मुली नसून ह्मातार्‍या बायका असतात. कोणाचीही गांठ पडली असतांना, भेटणाराचा हात न हालवितां आपलाच हात हालवितात व बोज्यावर बसतांना मागून बसतात.

**सुभाषितें—** समरामध्यें जय हा राज्याच्या विस्तारावर किंवा वयावर अवलंबून नसून तो राष्टांतील लोकांच्या देशभक्तीवर व आलौकिक कर्तबगारीवरच अवलंबून असतो हें जपाननें जगाच्या पूर्ण निदर्शनास आणून दिलें आहे.

**प्लेगचें अद्भुत निदान—** प्लेगच्या रोगासंबंधानें आजपर्यंत इतकीं निदानें झालेलीं आहेत कीं तीं सर्व एकत्र केल्यास प्रत्येक वस्तूंत प्लेगचे जंतू असतात असें शेवटचें निदान निघेल ! गाईचें शेण व गोमूत्र यांत प्लेगचे जंतू असतात असें बहारीचें निदान बहारप्रांतांतील एका गृहस्थानें काढलें आहे ! त्याचें कारण काय तर बहारप्रांतांत गवळी फार मेले ! कांहीं ठिकाणीं मारवाडी अधिक मेले, येवढ्याच कारणावर मारवाड्याजवळ असलेल्या सोन्यानाण्यांत प्लेगच्या जंतूंचें वास्तव्य आहे असे प्रतिपादन करण्यासारखेंच हें होय. मो.

**उदार महात्मा—** दुसऱ्याचा जीव वांचविण्याकारता आपले प्राण खर्ची घालणाराच्या आप्तविषयांना मदत करण्याकारितां मि० अँड्रयू कार्नेगी यांनीं युनायटेड स्टेट्समध्यें १० लाख पौंड दिले आहेत !

**अती वृद्ध भिकारीण—** बुडापेस्ट येथील कंगालखान्यांत ११६ वर्षांच्या वयाची एक म्हातारी बाई नुकतीच मेण्यांत आली. तिनें प्रथम आपलें वय १०९ वर्षांचें आहे असें खोटें सांगितलें होतें. पण तिचें खरें वय ११६ आहे. खोटें वय सांगण्याचें कारण आपणास आपल्या ह्मातारपणाबद्दल लाज वाटते असें ती ह्मणाली.

**मांजराची विक्षिप्त वृत्ती—** सर्कसमध्यें घोडे, कुत्रे, माकडें, हत्ती, वाघ, सिंह, हीं कांहीं पकडी करितांना लोकांनीं पाहिलीं आहेत. परंतु मांजर कधीं कोणीं पाहिलें नाहीं. याचें कारण असें आहे कीं, सर्व प्राण्यांत मांजरास शिकवून तयार करणें फार कठिण काम आहे ह्मणतात. मांजर कोणाच्या कह्यांत वागत नाहीं ही अनुभवांतलीच गोष्ट आहे.

**उन्हानें मृत्यु—** बी.बी. आणि सी. आय् रेलवच्या छारोडी स्टेशनानजीक विरमगांवपासुन अमदावादेस जाणाऱ्या पायरस्त्यावर मारवाड्यांचीं चार प्रेतें सांपडलीं. हे लोक उन्हाच्या प्रखर तापानें मरून पडले असावे असें ह्मणतात. कोण ऊन्ह हें !

**नवरदेवा प्रमाणें मिरवण्याची चमत्कारिक हौस—** जामनगर संस्थानांत खंबालिया ह्मणून एक गांव आहे. तेथील एका ४० वर्षांच्या ब्राह्मणास लग्न करण्याची मोठी मनीषा होती. लग्न नच झालें तर निदान घोड्यावर बसून नवरदेवा सारखे वाजत गाजत मिरवून घेण्याची हौस फार होती. ही मनीषा परिपूर्ण झाली तर तो वेडावून जाईल अशी भिती वाटल्या वरून तेथील लोकांनीं त्याचा वरघोडा काढला होता. मिरवणूकोसाठीं मुद्दाम घोडे, नगारे, डंका निशाण लाविलें होतें. वरील गृहस्थ नवरदेवा प्रमाणें सजले होते. गांवांतील पुरुष मंडळी मागाहून चालत होती. शिवाय भाडोत्री स्त्रिया गातगात चालल्या होत्या. येणें प्रमाणें फार थाटामाटानें हा प्रसंग पार पडला, ह्या चमत्कारिक नवरदेवा साठीं गांव प्रयोजनहि देण्यांत येणार आहे. अशा प्रकारें या शहरांत मोठी पोट धरून हंसण्यासारखी मजा चालली आहे.

**पक्ष्यांचें चातुर्य**

सैबिरियाच्या पुष्कळ प्रदेशीं सर्वत्र फिरून आलेल्या एका रशियन प्राणि शास्त्रवेत्त्यानें, तिकडे मासे धरणें, शिकार करणें आणखी भक्ष्य शोधण्याचीं कामें करणें तीं, गरुड, पोपट, बगळे वगैरे पक्षी, अगदीं हुबेहुब लष्करी पद्धतीनें मोठाल्या टोळ्या करून सुव्यवस्थित रीतीनें करितात असें एक पुस्तक लिहून नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे.

**लौकर न पेटणारें लांकूड—** पोपलर जातीचें लाकूड लवकर जळत नाहीं. नार्टिंगह्याम येथें एका घराला आग लागून कांहीं तासपर्यंत जळत निखारे वरील लांकडाच्या मुईवर होते, पण ती मुई जळाली नाहीं.

**वेदांत सांगितल्या प्रमाणें तयार होणारें विमान—** मुंबईतील रा० तळपदे नांवाच्या गृहस्थांनीं प्राचीन वेद ग्रंथांत वर्णन केल्याप्रमाणें हवेंत उडणारें विमान कोणत्या रीतीनें तयार करण्यांत येईल त्या संबंधाचा एक नकाशा तयार केला आहे इतकेंच नाहीं, तर अशा विमानाचा प्रत्येक भाग यांत्रिक शास्त्रतत्वानुरोधें कशा प्रकारें जोडितां येईल, हेंही पण त्यांनीं सिद्ध केलें आहे. अशा रीतीनें तयार केलेला नकाशा त्यांनीं मुंबईतील मोठमोठ्या शास्त्रज्ञाकडे नेला होता व त्या सर्वांनीं सदरहु नकाशांत तयार केलेलें विमान सशास्त्र व सोपपात्तिक आहे असें सांगितलें आहे. तळपदे यांना आश्रय मिळेल तर बरें होईल. तें विमान तयार करण्यास जवळ जवळ दहा हजार रुपये खर्च लागणार असल्यामुळें तळपदे ह्यांनी गव्हे. रजवाड्याकडेस मदती करितां अर्ज केले आहेत. सदरहु विमान तयार होऊन त्याच्या प्रयोगापासून उत्पन्न होणारी रक्कम तळपदे यांनीं प्राचीन वैदिक ग्रंथांच्या पुनरुज्जीवनार्थ समर्पण करण्याचा निश्चय केला आहे. स्तुत्य आहे.

**हत्तीचें शहाणपण—** जनावरांत हत्ती इतका शहाणा प्राणी एखादा दुसराच सांपडेल. एकदां तर सिलोन बेटांतील हत्तींनीं मोठमोठे दगड, त्यांना सांखळ्या बांधून उचलून उंच टेंकडीवर जेथें सांगितलें तेथें नेऊन ठेविले. त्यांपैकीं एका हत्तीनें आपण होऊनच टेंकडीवरील एक मोठा थोरला दगड सांखळ दंड बांधून उचलला व खालीं देऊन चालला. सांखळदंड जरा लांब झाल्या मुळें त्याच्या ढोपरावर तो दगड सारखा आपटूं लागला. एक मिनिटभर त्यानें तो न आपटेल अशी तजवीज करण्याची खटपट केली, पण तें कांहीं जमत नाहीं, असें पहतांच त्या सांखळदंडाचा आपल्या मुख्यास एक विळखा देऊन तो आंखूड केला व तो दगड आपटेनासा झाला. ही त्याची युक्ती पाहून सर्व मंडळी चकित झाली.

**अद्भुत चमत्काराची मुलगी—** कॉकेशस प्रांतांत लेडी क्वॉस येथें बारा वर्षांची एक मुलगी रहात आहे, ती फारच अद्भुत चमत्कार करून तेथील लोकांना चकित करीत असते ! ती ल्युदा नांवाच्या एका बड्या कामगाराची मुलगी आहे. ती ज्या वस्तूजवळ जाऊं लागते त्या वस्तू हालूं चालूं लागतात; टेबला जवळ गेली असतां त्यावर ठेवलेले ग्लास, बशा, वगैरे नाचूं लागून शेवटीं गडबडून खालीं पडतात आणि त्यांचा चुराडा उडून जातो ! ही मुलगी चांगली सशक्त असून अशा रीतीनें घडलेल्या कृत्याकडे चमत्कारिक रीतीनें हांसत असते. पुष्कळ लोकांनीं ह्या मुलीचा तपास चालविला आहे, पण तिच्यामध्यें ही कोणती शक्ति आहे, ही परीक्षा करणें अशक्य झालें आहे. हल्लीं रशियाची राजधानी, सेंटपिटर्सबर्ग येथें ह्या मुलीस पाठविण्यांत आलें असून तेथील प्रख्यात शोधक लवकरच ह्या मुलीच्या अंगच्या लोहचुंबक शक्तीचा बारकाईनें तपास करतील.

REGISTERED No. N.

बाहेरगांवीं टपालहाशिलांसह ........ २ ७
वर्गणी आगाऊच दिली पाहिजे.
किरकोळ अंकास....................२ आणे
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत ह० १
दर ओळीस.........८१ ०६
दुसरे खेपेस.... .... ....८१

All Subscriptions to be paid in advance.
Single copy .......................... 2 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......3 as
Repetitions Per line ,, 2 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVIII AKOLA MONDAY 27 JUNE 1904 NO 25

वर्ष ३८ आकोला सोमवार तारीख २७ माहे जून सन १९०४ इ० अंक २५

## नोटीस.

कामी मर्द रामजी माळी खाजोने राहणार आकोट सोमवार पेठ तालुके मजकूर जिल्हे आकोला इसः—

खालीं सही करणार रुखमी मर्द सदाजी बरोडे माळी राहणार आकोट इजकडून नोटीस देण्यांत येते कीं माझा बाप मनाजी वल्लद लक्ष्मण माळी मेहरे राहणार आकोट यांचे मो॥ मौजे खानापूर व मौजे कान्हेरी प्रगणें आकोट तालुके मजकूर येथील शेतें असून तो मयत झाला आहे सदर्हू शेताचे खाते मनाजीची आई यमाई मर्द लक्ष्मण इचे नावें झाल्यामुळें तिला तुमचे नवऱ्यानें फसवून व भुलथाप देऊन तिजकडून शेताचा राजीनामा देवविला व कबुलायत रामजी तुमचा नवरा यांनीं देऊन खातें त्यांनीं आपलें नांवें सन १८९९ इसवी सालांत करून घेतलें.

सन १८९९ इसवी सालीं मी अज्ञान होती त्यामुळें मला कांहींच कळत नव्हते ह्मणून माझे आजीस तुमचे नवऱ्यांनीं फसविलें. जर मी त्या प्रसंगी सज्ञान असती तर माझी आजी फसली गेली नसती तेव्हांच सदर्हू शेताचेही खाते माझें नांवें झालें असतें.

तुमचे नवऱ्यानें अजमास ७–८ वर्षे सदर्हू शेते वाहून आपला बराच फायदा केला व मला माझे अज्ञानपणामुळें बुडविलें. आतां मी सज्ञान झाली आहे व तुमचा नवरा मयत झाला आहे.

शेताची योग्य वारस मी आहे कारण सदर्हू शेती माझे बापानें संपादान केली आहे मी त्यांची योग्य वारस कन्या असल्यामुळें शेताचा कबजा मला देण्याविषयीं तुह्मास ह्मणत असतां तुमची ही बेमानी माझे नजरेस आली, तपास करितां या कामांत तुमचे नवऱ्यानें दस्ताऐवज करून घेतला नाहीं हे निश्चयानें कळते त्या अर्थी तुमचे नवऱ्यानें कपट करून शेती आपले नांवें करून घेतली आहे. नोटीस पावतांच शेताचा मला कबजा द्यावा नाहीं पेक्षां मी ह्या सालीं सदर्हू शेते वाहणार व कबजा करणार यांत अंतर होणार नाहीं ह्मणून या नोटिशीनें तुह्मास कळवून प्रसिद्धी होण्याकरितां वऱ्हाडसमाचार आकोला छापखान्यांत ही नोटीस छापली आहे. व सदर्हू शेतांतील पिकाचे नुकसानी बद्दल मी तुमचेवर दावा करीन. किंवा तुह्मी आपसांत नुकसान भरून द्यावें.

( शेताचा प्रकार )

[ १ ] मौजे खानापूर प्रगणें आकोट येथील शेत सर्वे नंबर २३ एकर गुंठ ६०११

[ २ ] मौजे कान्हेरी प्रगणें आकोट येथील शेत सर्वे नंबर १९ पैकीं एकर गुंठे ७४१८ या प्रमाणें शेतें आहेत. नोटिशीचा खर्च तुह्मापासून घेतला जाईल. शेतें तुह्मी पेरू नयेत. पेरल्यास आयते पीक मी घेईन. तुह्मास लागवडाचा खर्च मिळणार नाहीं. कळावें. तारीख १९।६।०४ इसवी०

सही

रुखमी मर्द सदाजी माळी राहणार
आकोट निशाणी बांगडी
हातची.

## नोटीस

बेशमी रा. रा. गणपत जमाजी सरकारी मक्तेदार आणि मक्त्याचे पोट मालक रा. रा. हरी कुकाजी राहणार शेगांव यांस

खालीं सही करणार याजकडून या जाहिर नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं शेगांव येथील आमच्या राहतें बराचा उतरेकडील वेगळा तुटक असलेला दुकानाच्या जाबत्याचा भाग तुह्मी आह्माकडून कलालीच्या दुकानासाटीं दरसाल १२० रुपये प्रमाणें भाड्यानें घेतलेला आहे. मागील भाड्याचा अजून तुह्मी चुकता हिशोब केला नाहीं. ह्मणून तुह्मास आमचें दुकान खालीं करून गेल्या मार्च महिन्यांत मागितले असतां तुह्मी तें दुकान खालीं करून दिलें नाहीं. चालूं सालापर्यंत कलालीच्या व्यापारांत आमचा हिस्सा होता ह्मणून आह्मी दुकानाच्या जुन्या भाड्या बद्दल फारसा तगादा केला नाहीं पण येंदापासून आपलीं व आमची पाती तुटली असल्यामुळें आह्मी मुद्दाम तें दुकान परत मागितलें होतें. पण तुह्मी आमच्या ह्मणण्याकडे दुर्लक्ष्य केलें इतकेंच नाहीं तर आह्माला न विचारतां तुह्मी तें दुकान कोठें कोठें पाडलें आहे आणि दुकानाची खराबी मांडली आहे. ही नोटीस पोहाचल्या तारखे पासून आठ दिवसांच्याआंत आमचें दुकान खालीं करावें आणि गेल्या तीन महिन्यांचें भाडें ३० रुपये चुकते करावें. तसें करण्यास तुह्मी चुकाल तर दुकानाचा ताबा आह्मी कोर्ट मार्फत घेऊं आणि कोर्ट मार्फत ताबा मिळपर्यंत दरमहा २९ रुपयें प्रमाणें तुह्माला भाडें द्यावें लागेल आणि त्याशिवाय या नोटिशीचा खर्च व इतर सर्व नुकसानी तुह्मावर पडेल. कळावें तारीख २४ जून १९०४ इ०

सही

राघोसा शंकरसा राहणार
शेगाव दस्तुर खुद्द

## नोटीस

चिरंजीव रा. जगदेवसिंग चिमणाजी देशमूख राहणार हिंगणे कारेगांव तालुके खामगांव यांसः—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, तुह्मी तारीख १३ माहे जून सन १९०४ इसवीचे वऱ्हाडसमाचार अंकांतून नोटीस दिली ती सर्व प्रकारें खोटी आहे. तुह्मी आज सुमारें २९ वर्षांपासून निराळे आहांत. त्या निराळेपणांत मौजे बोथ येथील शेत सर्वे नंबर ९७ व शेत सर्वे नंबर ४ अशीं दोन शेतें आह्मी मिळविलीं. या शेतांतील हिशा संबंधानें तुह्मी कोर्टात दिवाणी मुकद्दमा नंबर २११ चा दावा केला होता.

९८

त्या दाव्यांत तुमचे वतीनें हक्काची शाबिती होत नाहीं असें दिसलेवरून तुह्मी राजीनामा दिला. आतां आपलें मागणें अयोग्य आहे. कळावें. तारीख १९ माहे जून सन १९०४ इसवी०

सही

रामसिंग चिमणाजी देशमूख मौजे
हिंगणे कारेगांव दस्तुर खुद्द.

## नोटीस

ती. रा. रा. लक्ष्मणराव तुरेराव
( २ ) जयवंतराव तुरेराव
( ३ ) जीवनराव तुरेराव
देशमूख राहणार जामठी
बुजरुख पोस्ट कुरुम तालुका
मूर्तिजापूर यांसः—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी आह्मी मिळून समाईक कुटुम्बांतली मंडळी आहों. आपली स्थावर जंगम इस्टेट आणि रुसुमाचा पैसा पांडेपणाची गांवें वगैरे सर्व इस्टेट अविभक्त आहे या पुढें माझा हेतु एकत्रपणांत राहण्याचा नाहीं. तेव्हां माझा आठ आण्याचा हिस्सा मला वाटून देण्या संबंधाची गोष्ट गुदस्ता मी तुह्मा जवळ काढली असतां तुह्मी कांहीं तरी उडवा उडवीचा जबाब देतां. आणि हल्लीं तुह्मी आपसांत एक रुसुमाचा दावा उमरावतीच्या कोर्टांत केला आहे त्यावरून असें दिसतें कीं तुमचा विचार मोठा लबाडीचा असून माझा हिस्सा पचविण्याचा दिसतो. ही नोटीस पोचल्या तारखेपासून आठ दिवसांच्या आंत चार पंचा समक्ष आमचा आठ आण्यांचा हिस्सा स्थावरजंगमा सुद्धा आमचे स्वाधीन करावा आणि आमची चुकती पावती घ्यावी. असें करण्यास चुकाल तर विनाकारण कोर्टखर्चानें आणि इतर नुकसानी मुळें आपलें सर्व नुकसान करून घ्याल. आणि त्या शिवाय माझीही मोठी खराबी होईल पण त्याबद्दलची सर्व जबाबदारी तुह्मा त्रिवर्गांच्या शिरावर राहील. कळावें. तारीख २३ जून १९०४ इसवी.

सही

यशवंत गुंडेराव देशमूख
राहणार जामठीबुजरुख
दस्तुर खुद्द.

मूर्तिजापूर ता. १७।६।०४

## वैश्यसभा.

वैश्य महासभेची हकीकत आपले पत्रांतून पूर्वी प्रसिद्ध झालेली होतीच. आपल्या वृत्तपत्रांत नेहमीं वैश्य लोकांच्या हिताहिताच्या गोष्टींची चांगली चर्चा केलेली असते. सध्यां वैश्य महासभेचे उपदेशक पंडित चुन्नीलालजी हे वऱ्हाडांत उपदेश करीत फिरत आहेत. नुकतेच ते आमच्या मूर्तिजापुरासहि आले होते. पंडितजी वयानें फार वृद्ध आहेत, त्यांचा हा अंगीकृत सदुद्योग मोठा प्रशंसनीय आहे. पंडितजींची बोलण्याची शैलीहि मोठी मोहक आहे. तारीख १२ रोमीं येथील शेट सागरमलजी यांच्या घरीं वैश्यलोकांची सभा भरवून तेथें पंडितजींनीं चांगलें शास्त्रप्रमाणयुक्त व्याख्यान केलें. सभासद सुमारें ४०–५० जमले होते. त्यांनीं सर्वानुमतें ठराव पास केला कीं:—

( १ ) अपशब्द ज्यांत आहेत अशीं गाणीं स्त्रियांनीं गाऊं नयेत.

( २ ) विवाहादि मंगल प्रसंगीं वैश्यांगनांचा नाच तमाशा करवूं नये.

आणि ( ३ ) लग्नसमारंभांत तसेंच और्ध्व देहिक कार्यांत पैसा उधळूं नये.

वरील ठरावा नंतर सभा रीति प्रमाणें बरखास्त झाली. पंडितजीच्या उपदेशानें वैश्य लोकांच्या मनः प्रवृत्ती चांगल्या गोष्टीकडे सहज वळतात हें आमच्या वैश्य लोकांचें मोठें सद्भाग्य होय, पंडितजी आणखी ज्या ज्या शहरीं उपदेश करितील तेथें तेथें तेथें त्यांचा उपदेश लोकांच्या मनावर चांगला ठसेल अशी आह्मांस खात्री वाटते.

आपला.
" एक वैश्य. "

—:०:—

वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ शुद्ध १३ शके १८२६

## जेल रिपोर्ट

१९०३ सालचा तुरुंगाचा वार्षिक रिपोर्ट नुकतांच तयार झाला आहे. पण त्यावर स्थानिक सरकारानें जो आपला अभिप्राय प्रसिद्ध केला आहे तेवढाच सध्यां आह्मास उपलब्ध आहे. या मध्यप्रांताच्या रिपोर्टांतच आमच्या प्रांतांतील तुरुंगाची वार्षिक माहिती एकत्र केलेली आहे. १९०३ सालचें सामान्य स्वरूप फार समाधानकारक आहेत. तुरुंगांतील लोकसंख्या पुष्कळ कमी झाली. चक्रवर्ती बादशहाच्या राज्याभिषेका संबंधानें पुष्कळसे कैदी सोडण्यांत आले आणि गेले वर्ष आबादानीचें गेल्यामुळें नवीन कैद्यांची भरती मोठीशी झाली नाहीं. १९०२ च्या अखेरीला जेवढे कैदी होते तितकेच कैदी सरासरीनें १९०३ सालच्या अखेरीला होते. या संख्येमध्यें वऱ्हाडांतील कैद्यांची गणती केलेली असूनही तेवढीच संख्या कायम राहिली हें विसरतां कामा नये. १९०३ सालीं तुरुंगांत नवीन कैदी फारच कमी आले आणि सगळ्या मध्यप्रांताच्या इतिहासांत नव्या कैद्यांची इतकी कमी संख्या पूर्वीं कधींच नव्हती. तुरुंगांतील रहिवाश्यांचें आरोग्य विशेष समाधानकारक होतें आणि त्यामुळें मृत्यूंची संख्या कमीच होती. मध्यप्रांतांतील तुरुंग आणि वऱ्हाडांतील तुरुंग यांच्या अंतर्व्यवस्थे संबंधानें एका बाबदींत विलक्षण फरक दिसतो. कैद्यांनीं सद्वर्तन ठेवावें ह्मणून ज्या नानाविध शिक्षांची योजना होत असते त्या शिक्षा फारच फार प्रचलित दिसतात आणि आमच्या प्रांतांत या शिक्षांची यादी अगदीं छोटी असते. वऱ्हाडांतील कैद्यांच्या सद्गुणांची वाखाणणी करून या फरकाचें स्पष्टीकरण होण्यासारखें नाहीं. कोठें तरी कांहीं चूक होत असावी असा सरकारी अभिप्राय आहे.

तुरुंगांची लोकसंख्या कमी झाली तरी तुरुंगखात्याचा महकमा कायमच होता आणि त्यामुळें व इतर स्थलविशिष्ठ उपाधीमुळें प्रत्येक कैद्या मागें खर्च ५ रुपया पासून ८ रुपया पर्यंत वाढलेला आहे. सागरच्या तुरुंगांत कैद्याच्या खाण्यापिण्याचा वार्षिक खर्च दर माणशीं १७ रुपये आला. हा आंकडा सर्व प्रांतांत कमी आहे आणि सगळ्यांत मोठ्या खर्चाचा आंकडा ह्मटला ह्मणजे चांदा तुरुंगांतला दर माणशी लागलेला ३५ रुपये खर्च होय. आकोला व इलिचपूर येथील तुरुंगांचा देखील खर्चाचा आंकडा फार मोठा आहे.

× + ×

जेलचे इनस्पेक्टर जनरल यांच्या मनांतून तीन मोठे कारखाने तीन सेंट्रल तुरुंगांतून चांगल्या रितीनें चालू करावयाचे आहेत. कोष्ट्यांच्या वीणकामाचा कारखाना रायपुरास मोठ्या प्रमाणावर चालवावयाचा आहे. खिळा प्रेसांचीं सर्व कामें नागपुराच्या तुरुंगांतच ठेवण्यात येतील आणि शिळा प्रेसांचा कारखाना उमरावतीस राहील. या व्यवस्थेला कैद्यांची अदलाबदल करण्याचा अधिकार पाहिजे. आणि हा अधिकार लवकरच देण्याविषयीं चीफ कमिशनर साहेब हुकूम फर्मावणार आहेत. सध्यांच्या हुकूमा प्रमाणें मध्य प्रांताचा कैदी वऱ्हाडांत आणतां येत नाहीं आणि इकडचा कैदी तिकडे नेतां येत नाहीं. ही अडचण मोठी आहे पण ती लवकरच दूर होण्या सारखी आहे. ही नवी व्यवस्था पूर्णपणें अंमलांत आली ह्मणजे तीन कारखाने उत्कृष्ठपणें चालतील असा आमचा समज आहे. आमच्या आकोल्याच्या तुरुंगांत देखील एक स्वतंत्र कारखाना चालण्या सारखा आहे. येथें सत्रंज्या, टुवाल वगैरे सामान चांगलें तयार होतें. या रिपोर्टांत आकोल्यास चालू करावयाच्या कारखान्या संबंधाचा उल्लेख अवश्य पाहिजे होता पण तो तसा उल्लेख कोठें नाहीं तरी येथील चालूं कारखाने बंद करण्यांत येतील असें आह्मांस वाटत नाहीं.

× + +

तुरुंगांतील आमल्याचा पगार वाढविण्याविषयीं इंडिया सरकाराची मंजुरांत आलेली आहे. लहान लहान जिल्ह्याचे तुरुंग मोडून टाकावे असा सरकारी विचार आहे. लहान जिल्ह्याच्या ठिकाणीं कच्या कैद्यां पुरती योजना कायम ठेवण्यांत येईल पण तेथील तुरुंगाचा समावेश एखाद्या नजिकच्या सेंट्रल तुरुंगांत करण्यांत येईल. या धोरणानेंच इलिचपुराचा जिल्हा—तुरुंग मोडण्या संबंधाचा हुकूम नुकतांच सुटलेला आहे. आकोल्याच्या तुरुंगांत जी आग लागली होती तिच्या संबधानें नामदार चीफ कमिशनर यांनीं मोठा खेद प्रदर्शित केला आहे पण दुःखांत सुख इतकेंच कीं या आगीच्या बाबदींत जी पुनः चौंकशी मुद्दाम करविण्यांत आली आहे त्या चौकशीमुळें येथील तुरुंगाचा इतिहासच नव्यानें लिहावा लागेल असें वाटतें. कर्नल मेजर डाक्टर रेली साहेब यांच्या सुपरिनटेंडन्सी खालीं हा तुरुंग पुष्कळ वर्षांपासून आहे आणि त्यांच्याच राज्यांत इतके आगीचे लोक निघतील असा आह्मांस भरंवसा नव्हता ! कदाचित् सध्यांचे काळेकुट्ठ ढग निवळतील तेव्हां डाक्टर रेली यांची कारकीर्द चांगली शुभ्र दिसेल अशी आह्मी आशा बाळगतो.

## सलामाची सक्ती

जेव्हां कोणी कोणास भेटतो तेव्हां दोघेही परस्परांस नमन करितात. हें नमन ह्मणजे भावी कुशल प्रश्नांचा पहिला श्रीगणेश होय. हे नमनाचे प्रकार ज्ञाती धर्मामुळें नानाविध असतात व तसेच लहान मोठ्या अधिकारां अन्वयें हे तऱ्हेतऱ्हेचे असतात. सलाम, रामराम, नमस्कार, गुड मॉर्निंग, इत्यादि प्रकारांचा अर्थबोध एकच आहे. हस्तादिक्रांच्या या पविक्र्यानें परस्परांचें अभिनंदन करण्याचा परिपाठ फार जुना आहे. आणि तो परिपाठ शिष्टसंप्रदाया अन्वयें अगदीं रूढींतला झालेला आहे. पहिल्या भेटीलाच एकजण दुसऱ्याचें अभिनंदन करितो आणि या प्रमाणें दोघेही परस्परांस आनंदवितात. हा शिष्टाचार फार चांगला आहे आणि त्याचा अव्हेर करावा असें कधींही कोणास वाटणार नाहीं. या नमनाच्या प्रकाराचा उल्लेख आह्मी सलाम या शद्बानें केला आहे आणि या शद्बाच्या संग्राहक अर्थशक्तीनें नमनांच्या सर्व प्रकारांचा बोध आपण घेतला पाहिजे.

सलाम करण्याची रीत मोठ्या आदबीची आहे. या संप्रदायानें सलाम करणारा इसम जसा शिष्टांच्या पंक्तीमध्यें जाऊन बसतो तसाच तो सलाम घेऊन उलट सलाम करणाराही गृहस्थ शिष्टांमध्येंच मोडतो. पुष्कळदां जे घाणाक्ष लोक असतात त्यांच्या नमनामध्यें सलाम व प्रतिसलाम यांची वेळा बहुतेक एकच येते. कांहीं गृहस्थ असे असतात कीं त्यांस त्यांचा मोठपणा थोडा अधीक वाटत असतो आणि ह्मणून ते आपल्या समोरचा माणूस सलाम करीपर्यंत स्वतांच्या हाताला तसदी देत नाहींत. त्यांस वाटत असतें कीं आपणांस दुसऱ्यांनीं प्रथम सलाम करावा आणि नंतर आपण त्यांचा तो सलाम परत करावा. ही श्रीची ऐट मिरविणारे गृहस्थही पुष्कळशा दृष्टीनें बरे ह्मणविले जातील. त्यांनीं मात्र दुसऱ्यांनीं कोणी सलाम केला नाहीं तर राग मानतां कामा नये. पण कांहीं अधम असे असतात कीं ते कित्येक वेळा दुसऱ्याचा सलाम नीटसा अदबीनें परत करीत नाहींत. निव्वळ मान तुकाविल्यानें किंवा शिरोभाग किंचित् हालविल्यानें सलाम परत करण्याची क्रिया पुरी झाली असें ते समजतात. दुसऱ्यांनीं मात्र असा सलाम केला तर तो त्यांस खपत नाहीं कधीं कधीं शेवटच्या वर्गांतली मंडळी दुसऱ्याचा सलाम परतही करीत नाहींत

कांहीं अधिकारी सलामाविषयीं फार लुब्ध असतात. आह्मी अधिकारी आहों ह्मणून आपणांस सर्वांनीं आदबशीर सलाम केलाच पाहिजे असें ते गृहित धरतात पण त्याच्या बरोबर आपणही दुसऱ्याचा सलाम आदबशीर परत केला पाहिजे. इतकेंच नाहीं तर प्रसंग विशेषीं आपण दुसऱ्यांस सलाम करून त्यास शिष्टाचार शिकविला पाहिजे असें ते कधीं लक्ष्यांत घेत नाहींत. कोणी सलाम केला नाहीं ह्मणजे ते फार रागावतात, चडफडतात, दांत ओंठ खातात आणि कधीं कधीं कामदोषपत्री काम चालवून सलाम न करणाऱ्यास दंडही करवितात. अधिकाराचा जोरा एवढा चालतो हें फारच विलक्षण ! आमचा अनुभव असा आहे कीं मोठ्या माणसाचा सलाम परत करीत नाहींत असे उद्दाम कोणीच नसतात; पण मोठ्या लोकां पासून दूर दूर राहणारे पुष्कळ लोक त्यांच्या दर्शनपर्यंतच येऊं इच्छित नाहींत

\+ × ×

कोणी कोणास सलाम करावा अशाविषयीं सरकारी कायदाही नाहीं. पोलीस लोकांमध्यें सलामाविषयीं कांहीं नियम आहेत असें सांगतात. पण बाकीच्या इतर खात्यांमध्यें तसे नियम प्रचलित असल्या विषयीं आह्मांस माहित नाहीं. नुकतीच आमच्या ऐकण्यांत अशी गोष्ट आली आहे कीं एक शाळा खात्यांतील शिक्षक व मुलकी खात्यांतील एक जाडासा अधिकारी यांची गांठ एका स्टेशनावर पडली तेव्हां शिक्षक सलाम करण्यास चुकला; मुलकी अधिकारी बहादूर प्रथम सलाम करीनात, आणि त्यांस शिक्षकापासून तर सलाम पाहिजेच होता. अशा स्थितींत सलाम न केल्यामुळें संताप, राग, द्वेष, इत्यादिकांनीं त्या अधिकाऱ्याचें चित्त बहकून दिलें आणि मुलकी खात्याच्या अधिकाऱ्यांनीं शाळा खात्याच्या श्रेष्ठ अधिकाऱ्यांस लिहून त्या मास्तरास दंड करविला असें ह्मणतात. हा प्रकार खरा असेल असें आह्मांस वाटत नाहीं. मुलकी अधिकारी असे आढळतील आणि त्यांचें कौतुक पुरविण्या इतके शाळाखात्याचे अधिकारी दुर्बल व अल्प विचारी असतील अशा दोन गोष्टी गृहीतच धराव्या लागतात. आमच्या मनानें दोन्ही गोष्टीस खरेपणा देववत नाहीं. तथापि ही गोष्ट दृष्टान्त देण्यासारखी आहे आणि ह्मणूनच आह्मी सलामाच्या शिष्टाचाराची महती सांगत असतांना एका चाकरानें दुसऱ्यास सलामासंबंधानें इतके दुखवूं नये असें पुनःपुनः सूचवितों. सलामाची गोष्ट ह्मणजे खुषीचा सवदा आहे. तेथें कोणी कोणावर सक्ती चालवूं नये. आणि सलामाच्या प्रकरणांत लार्ड कर्झन साहेबांनींहि असाच अभिप्राय दिला आहे कीं निदान निरनिराळ्या खात्यांतील लोकांवर परस्परांस सलाम करण्याची सक्ती होऊं नये.

## मंगल स्मरण।

आज किती तरी वर्षें आमचा हा वऱ्हाड प्रांत निजामशाही खालीं मोडत आहे! अलीकडे पन्नास साठ वर्षें ह्या प्रांतावर इंग्रजी अंमल चालत होता ही गोष्ट खरी, पण हा इंग्रजी कारभार निजामचा हा मनीं मुलुख या नांवाखालीं चालत असे. हैदराबाद सरकारानें आपला अमानी मुलुख पुष्कळदां परत मागितला पण हातांत घट्ट गवसलेलें रत्न ज्याचें त्यास परत देण्याची सुबुद्धि कुटिल राजनीती कोठून उपदेशील ? इंग्रजांनीं कोठपट्टा करून कोणत्या युक्तिप्रयुक्तींनीं व कारवाईनें हा प्रांत कायमचा सर केला आणि त्याचें दान करितांना निजाम सरकारची किती कासाविशी झाली असावी त्या गोष्टीची कल्पना आली ह्मणजे क्षणभर चित्तवृत्ती अस्वस्थ होते. गत गोष्टींच्या सुख दुःखाची आठवण होऊन मनास एक प्रकारचा अनिर्वाच्य आनंद होणें वा उद्वेग प्राप्त होणें हा मनुष्याच्या अंगचा एक अलौकिक सद्गुण होय. गेल्या मंगळवारचा दिवस वऱ्हाडच्या लोकांचा आनंद व उद्वेग यांच्या संमेलनाचाच दिवस होता. हा दिवस वऱ्हाडचा पूर्व इतिहास व भावी इतिहास यांची सांगड घालणारा एक दुवाच होय. ह्या दिवशीं पूर्वींच्या रहाशतीची संपूर्णता होऊन नव्या इंग्रजी रहाशतीस प्रारंभ झाला ह्मणावयाचा. हा

दिवस निजाम सरकारचा वाढ दिवस ह्मणून विशेषच उत्सवाचा होता. वऱ्हाडच्या कायमच्या कौलपत्रांत, कागदींच कां होईना, निजामचें नामधारी स्वामित्व इंग्रजांनी कबूल केलें आहे. आणि आपल्या न्यायप्रीयतेची व उदार बुद्धीची यशोदुंदुभी गाजविण्यासाठींच जणूं काय ह्या दिवशीं वऱ्हाडच्या राजनगरींत प्रातःसमयींच एक सुमारें ४० फूट उंच असें निजाम सरकारचें निशाण फडकत लाविलें आणि २१ तोफांची सरबत्ती देऊन तो दिवस जगजाहीर केला. येथेंच ' बर तेरा व हुकूम मेरा ' या ह्मणीची यथार्थता संपूर्णपणें मनास पटते. निजामशाहीच्या स्मारकानिमित्त ह्या दिवशीं इंग्रज सरकार मुद्दाम निशाण रोवून तोफांची सलामी देणार ही गोष्ट आह्मी पूर्वीच प्रसिद्ध केली होती. एका दृष्टीनें हा आनंदाचाच दिवस होता. या दिवशीं सर्व सरकार दरबारला सुट्टी पाहिजे होती. आजरोजीं चक्रवर्ती एडवर्ड साहेबांच्या वाढदिवसासाठीं सर्व इंडियाभर सुट्टी देण्यांत आली आहे. अशीच सुट्टी वऱ्हाडच्या प्रजाजनांना निजाम सरकारच्या वाढ दिवसा प्रीत्यर्थ अवश्य पाहिजे होती व ती दिली गेली नाहीं ही गोष्ट बरी झाली नाहीं. असो. हा वाढदिवसाचा समारंभ दर वर्षी होणार आहे त्या अर्थी ही झालेली केवळ चूक अवश्यमेव पुढें तरी सुधारली जाईल अशी आशा आहे. हा समारंभ फार थाटाचा व्हावयास पाहिजे होता, तो तसा झाला नाहीं यामुळें मनाचा विरसच झाला. त्या तोफांच्या बारांनीं आणि उंच मान काढून फडफड करीत राहणाऱ्या निशाणानें पूर्वीच्या वैभवशाली संबंधाचें स्मरण देऊन मनची समवृत्ती चंचल करून सोडली. तथापि कालांतरानें गत गोष्टीचा विसर पडेल आणि डोळ्यापुढें खेळणाऱ्या त्या त्या वस्तू चित्त अस्वस्थ करणार नाहींत. इंग्रजी कर्तृत्वशक्तीचा हा विजयध्वज व ही तोफांची सलामी नव्या रहाशतींचे आधारस्तंभ होऊन प्रजाजनांचीं मनें भावी आशा व आनंद यांत चूर करून सोडतील. हा वार्षिक उत्सवाचा दिवस यापुढें आपण आनंदांत घालवूं आणि जुन्या व नव्या दोन्हीही स्वामींचें सुयश अखंड वाढो ह्मणून ईश्वराजवळ प्रार्थना करूं. उंच निशाण, तोफांची सरबत्ती आणि निजामशाहीचा संबंध ह्या गोष्टी इंग्रजांनीं मोठ्या उदार मनस्कतेनें मद्दाम राखल्या हा कांहीं निजाम सरकारावर लहानसान उपकार नव्हे!

---

## जीवनामृत

आपण हिंदुस्थानचे लोक आज नाहीं तरी २० वर्षे एकसारखे कांग्रेस सभा भरवून आपलीं दुःखाचीं रडगाणीं सरकारच्या कानावर घालण्यासाठीं एक दिलानें प्रयत्न करीत आहों. आपण सभा वर सभा भरविल्या, आणि मोठमोठीं वक्तृत्वोत्कुछ अशीं संभाषणें केलीं आणि सर्व हिंदुस्थान देशाचा काना न कोपरा जागा केला तरी सरकारची ह्या कांग्रेसकडे एक वार नजरहि फिरत नाहीं ह्मणून मोठा

सभा जें दरवर्षी सर्व राष्ट्राचें लोकमत प्रकाशित करीत आहे त्याची किंमतच सरकारास वाटत नाहींशी झाली आहे. लोक मताची योग्य संभावना होण्याला लोकमतामध्यें जो एक जीव व जोम पाहिजे तो आपल्या पुळपुळीत कांग्रेसच्या अंगांत नाहीं आहे व तो जीव तिच्यांत येईपर्यंत तिला कोणीहि भीक घालणार नाहीं. आपल्या कांग्रेस सारखीच एक कांग्रेस बोअर लोकांनीं प्रिटोरिया येथें नुकतीच भरविली होती. हिंदुस्थान व ट्रान्सव्हाल हे दोन्हीहि देश पादाक्रान्त झालेले आहेत व दोघेहि एकाच छत्राखालीं सध्या नांदत आहेत. पण हिंदुस्थान देश आज पादाक्रांत होऊन पुष्कळशींच वर्षे लोटलीं आहेत. आणि हा पुष्कळ दिवसांचा दासपणा हिंदुस्थानच्या लोकांच्या अंगीं, हाडांत व रक्तांत खिळून गेला असल्यामळें त्यांच्यांतलें तें जिवंत पाणी मरून गेलें आहे. आणि ह्मणूनच ह्या मृतप्राय लोकांच्या मतास कोणी विचारीत नाहीं, यांत नवल तरी कसचें ! पण अशी गोष्ट बोअर लोकांची झालेली नाहीं. त्यांची पादाक्रान्ती होऊन आज उणी पुरी ४–६ वर्षेंहि लोटलीं नाहींत. त्यांचीं व राज्यकर्त्यांचीं मनें अद्याप एकवटलीं नाहींत. त्यांस राज्यकर्ते अगदीं परकी वाटतात. आपण दुर्दैवानें आज सांपळ्यांत पडलों आहों पण वेळ फावल्यास आपण यांतून निसटून बाहेर पडूं अशी त्यास उमेद आहे. त्यांचें तें तापट रक्त, वाघाचें शौर्य, स्वदेशावरील प्रीति, स्वातंत्र्याची लालसा, शत्रूबद्दलचा तिरस्कार हीं लवमात्रहि कमीं झालेलीं दिसत नाहींत. आणि जोंपर्यंत हे बोअर लोकांचे गुण इंग्रजी सुधारणेच्या कसोटीवर घासून वासून संस्कृत झाले नाहींत तोंपर्यंत या बोअर सिंहाशीं जपूनच वागलें पाहिजे. आपल्या राष्ट्रोन्नती साठीं जनरल बोथा, डिलारे आदिकरून बोअर पुढाऱ्यांनीं वरील सभा भरविली होती. आणि एकंदरीनें सरकारच्या प्रत्येक कामांत होतां होईल तों आडवे येत असावें असा त्यांचा रोख दिसला. हा जो बोअर लोकांचा कल त्याची वाढ होऊं देऊं नये व तो मुळाशींच छाटून टाकावा एतदर्थ तेथील लेफ्टनंट गव्हरनर साहेबांनीं ह्या कांग्रेसवाल्यांस लेजिस्लेटिव्ह कौंसिल चेंबरमध्यें मुद्दाम बोलावून घेऊन उभयतांच्या हिताहिताच्या गोष्टींचा एकत्र खल केला. बोअर कांग्रेसचा हा बहुमान झाला ही गोष्ट तर ठीकच झाली. पण हा बहुमान आमचे हिंदुस्थानच्या लोकांच्या डोळ्यांत सलतो असें ह्मटल्यास हरकत नाहीं. ज्या दिवसापासून आह्मी आपलीं शस्त्रास्त्रें इंग्रज सरकारच्या चरणीं अर्पण केलीं तेव्हांपासून मागील गोष्टी विसरून जाऊन यांचीच पादसेवा अनन्यभावें करीत आहों; तरी आमच्या राजभक्तीचें काय चीज होत आहे ? काय चमत्कार आहे पहा कीं, ज्या बोअर लोकांच्या मनांतील विषाचा काटा अद्याप अगुरेणु इतकाहि चळला नाहीं त्या बोअर लोकांच्या कांग्रेसची सरकारास कोण महती वाटते, व त्यांच्या ह्मणण्याचा सरकार किती तरी तत्परतेनें विचार करितें ! पण आह्मी स्वामिसेवा एकनिष्ठपणें करीत आहों असें

नाहींशी झाली आहे. आमच्या लोकमताचा बहुमान सरकार करील ह्मणून जी आह्मांस मोठी आतुरतेची आशा वाटत होती ती आतां खरोखरी खचून गेली आहे. आह्मी स्वामिसेवक भावाची जाणिव ठेवून वागलों. पण आमचा लाभकाल फार दूर दूर गेल्या सारखा दिसतो.

आह्मी चवथ्या पृष्टावर " काळ्यांचा विटाळ नको " ह्या सदरा खालीं जो मजकूर छापला आहे त्यावरून आपल्या ह्या नव्या विचारांची सत्यता आपणांस दिसून येईल. सर्व लोकांस असें वाटूं लागलें आहे कीं, दासभावांत हिंदुस्थानचे लोक अगदीं निरडून निरडून निगरगट्ट झाले आहेत, त्यांस स्वदेश, स्वातंत्र्य, पराक्रम यांची ओळखच राहिली नाहीं. चांगल्या गोष्टींची हौस व नीच कृत्यांचा तिरस्कार त्यांस वाटत नाहींसा झाला आहे. लोकांनीं त्यांचा उपमर्द केला, ' त्यांचा विटाळहि नको ' असे कठोर वाग्बाण हाणले तरी त्यांच्या मठ्ठ डोक्यांत राग वा द्वेष चढत नाहीं. खरोखर इतकी नादान स्थिती आपली व्हावी हें वाईट होय. आपण आपली मान्यता वाढविली पाहिजे. अभिमान खराखरा धरला पाहिजे., मानी स्वभावानें मान मिळतो. आपल्या अंगांत हट्टीपणा आहे. आपलेंहि रक्त दुसऱ्याच्या जुलमी व अन्यायी वागणुकीनें संतप्त होतें, आणि दुसऱ्यांनीं आपला तिरस्कार केला तर आपलेंहि मन चिडतें अशी जेव्हां दुसऱ्यास खात्री पटेल तेव्हां दुसरे लोक आपोआपच आपली मनधरणी करावयास लागतील. आपल्या अंगांतील जिवंत पाण्याची दुसऱ्यास खात्री झाल्याशिवाय कांग्रेसला कोणी जुमानणार नाहीं हाच जीव आपल्या कांग्रेसमध्यें पाहिजे आहों. सरकारास आपण मृतप्राय वाटत आहे तसें आपण नाहीं अशी सरकारची खात्री झाली पाहिजे ह्मणजे मग सरकार आपल्यास जवळ बोलावील व आपला संतोष राखील. ज्या प्रमाणें एखादा मुलगा आपल्या आईवर रुसतो, चडफडतो, रागावतो व हट्ट निग्रहीपणा करितो तद्वत् आपण सरकारशीं भांडलें पाहिजे. सरकारचें आर्जव करीत राहिलों तर ते आपणांस सध्यां प्रसंगींच दूरदूर करितील. जर आपल्यामध्यें आपल्या स्वत्वाचा कांहीं अभिमान जागृत असेल, आणि आपले लोक, आपला देश व आपला धर्म हीं नामशेष होऊं नये अशी उत्कट इच्छा असेल तर वर सांगितलेला आपल्या अंगांतील जिवंत पाण्याचा जो झरा आहे त्याचें तोंड बंद न करितां तो सहस्त्रद्वारांनीं मोठा अफाट व खोल खणला पाहिजे. आणि हेंच जीवनामृत आपल्या प्रत्येक सत्कृत्यांच्या मुळाशीं ओतलें ह्मणजे यशसंपदा हात जोडून तत्क्षणींच उभ्या राहतील. असा हा अमृताचा झरा कधींही न आटेल असा आपण सर्वांनीं प्रयत्न केला पाहिजे, आणि त्या नंतरच सर्व राष्ट्रांतील जीवनरस एकवटून राष्ट्रपुरुषाला उदयास आणील.

---

## वऱ्हाडवृत्त

हवामान— गेल्या पांच सहा दिवसांत पाऊस बिलकूल नाहीं ह्मणून पेरणीचीं चालूं

चांगला जोरदार व पुष्कळसा झाला पाहिजे. कित्येक ठिकाणीं टोळांच्या भितीमुळें पेरणीचीं कामें तहकूब झालीं आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी कोणतीच नाहीं.

रा. रा. रंगनाथ विष्णु डोक्रस एक्स्ट्रा असि. कमिशनर, कोर्ट तेल्हारा यांस २ महिन्यांची रजा मिळाली होती पण आतां असें कळतें कीं त्यांनीं आपली रजा रद्द करून घेतली.

तथापि रा. रा. शेख महमद इस्मायल एक्स्ट्रा असि. कमिशनर, वाशिम, यांची बदली आकोल्यास झाल्या अन्वयें ते लवकरच येथें येऊन दाखल होतील.

कीर्तनें— येथें कीर्तनांची मोठी गर्दी उडाली होती. एक पंढरपूरचे कीर्तनकार येथें आले असून ते आपल्या सामर्थ्यानुरूप हरिसेवा करीत असतात. दुसरे हरिदास बोवा ह्मणजे वेदमूर्ती रा. रा. कृष्णराव रावजी पातुरकर हे होत. यांनीं तर आपल्या कीर्तनांनीं श्रोतृसमाज फार आनंदित करून सोडला. यांचें कीर्तन ज्या देवळांत असें तेथें इतकी गर्दी होत असे कीं रस्त्यावर देखील मंडळी एकाग्रतेनें उभी रहात असत. राजश्री कृष्णराव यांची ती वामनमूर्ती, त्यांचें सुस्वर गायन, व त्यांचा बहुश्रुतपणा यांनीं कीर्तनास फार रंग येत असे. ब्रह्मनिरूपण, आख्यान, व प्रासंगिक चुटके हीं अवश्य ऐकण्यासारखीं असतात. एकंदरीनें येथील कीर्तनें फार उत्कृष्ठ झालीं आणि राजश्री कृष्णराव हे आमच्या प्रांतीं नामांकित कीर्तनकार आहेत हें आह्मी मोठ्या आनंदानें कळवितों.

---

## नोटीस

रा॰ रा॰ गजानन रामचंद्र कोठारी इंजिनिअर नेटिव्ह जिनिंग फॅक्टरी खामगांव.

यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी वरील कारखान्यांत इंजिनिअरचे कामावर नोकर आहांत, गुदस्तसालीं फॅक्टरी चालू असतां आपण काम करण्यांत बरेच वेळां हयगय केली, वक्तशीर जीं कामें करावयास पाहिजे होतीं तीं आपण केलीं नाहींत त्याजबद्दल वेळोवेळीं आपणांस आह्मी कळविलें परंतु त्याकडे आपण दुर्लक्ष केलें असे आमचे नजरेस आलें. कामांत हयगय व दुर्लक्ष झाल्यामुळें कंपनीचे नुकसान होण्याचा संभव आहे करितां आपणांस आह्मी या नोटिशीनें कळवितो कीं तारीख १–७–१९०४ इसवी पासून तुह्मांस नोकरीवरून दूर केलें आहे व कंपनीचा ज्या बंगल्यांत तुह्मी राहात आहा तो बंगला वरील तारखेस खाली करून आमचे ताब्यांत देणें. तसे न केल्यास तारीख १ जुलई पासून सदरहू बंगल्याचे भाडे दरमहा रुपये १०० अक्षरी शंभर तुह्मास कंपनीस द्यावे लागेल कळावे तारीख १८–६–१९०४ इसवी.

सही

गणेशदास भट्टर नेटिव जिनिंग फॅक्टरीचे म्यानेजर. तर्फे वकील नारायण काशीनाथ दाते वकील राहणार आकोले.

**राक्षसाचा सांगाडा**—मौजे नांदुर ता. निफाड येथें गोदावरीचे पात्रांत डगरीखालीं पंचवीस हात उंच व १२ हात रुंद अशा विशाळ पुरुषाचा सांगाडा सांपडला आहे दांत वरवंट्या एवढे आहेत. हीं सर्व हाडें तीन पेटाऱ्यांत भरून जिआलॉजिकल सर्व्हे आफिसरांनीं कलकत्यास नेली आहेत.

—कांहीं अपराधाबद्दल हात तोडण्याची शिक्षा देण्यांत येत असे, पण स्वतः आमिरास ही इजा असह्य आहे असें समजल्यापासून आतां ती शिक्षा रद्द करण्यांत आली आहे.

**अनुभव**—मोठ्या पाइटेस टोळांना गारव्यामुळें उडतां येत नाहीं, ह्मणून त्यावेळीं ते ज्या झाडावर बसले असतील तें झाड खूप जोरानें हलवावें, ह्मणजे टोळ खालीं पडतात. त्यांस नंतर उडतां येत नसल्यामुळें झाडाच्या टहाळ्यानें त्यांचा समाचार घ्यावा, अशा युक्तीनें बरेच टोळ मारतां येतात असा अनुभव राहुरीकडे आला आहे.

**स्तुत्य गोष्ट**—आपल्या जमिनी कशा सुधराव्या, त्यांतील पिकाचें प्रमाण वाढण्याकरितां काय करावें आणि आलेल्या पिकांचें संरक्षण करण्याकरितां कोणतें उपाय योजावे ह्या गोष्टी शेतकऱ्यांस शिकविण्याकरितां सर्व पंजाब इलाख्यांत प्राथमिक व शेतकी शिक्षणाच्या शाळा काढण्याचा उपक्रम पंजाब सरकारनीं केला असून त्या शाळांतून शेतकी व बागाइतीचें प्रत्यक्ष शिक्षण देण्यांत येणार आहे. ह्या शिवाय इलाख्यांत चालू असलेल्या सर्व भाषांत, खतें, पीकास होणारे रोग, वगैरेसारख्या विषयांवर लहान लहान पुस्तकें लिहून तीं सर्व इलाखभर वांटावी असाही पण त्या सरकारचा हेतु आहे.

**चमत्कार**—कॉकेसस पर्वतावरील एका शहरांत एक बारा वर्षांची मुलगी असून तिच्या अंगांत अशी विलक्षण विद्युच्छक्ति आहे कीं ती ज्या पदार्थाच्या जवळ जाते तो पदार्थ वर हवेंत उडूं लागतो एकदां तेथें सात आठ दिवस सारखा पाऊस पडला तेव्हां त्या मुलीबरोबर घरांत असलेल्या मनुष्यास तिच्या डोक्यावर आणि खांद्यावर सारखें पाणी पडत असून तें कितीही पुसलें तरी कमी होत नाहीं असें आढळून आलें. हवा बदलून बाहेर उघाडी पडतांच हिच्या अंगावर पडणारें पाणी बंद झालें. पृथ्वीच्या पाटीवर असले अनेक चमत्कार आहेत त्याजविषयीं विचार केला असतां ईश्वराचें अगाध चातुर्य मनास थक्क करून टाकितें.

**रात्रीचें फुल झाड**—एका वनस्पति शोधकास एक असें फुलझाड आढळून आलें आहे कीं त्यास फक्त रात्रीं फुलें येतात व तीं इतकीं विलक्षण सुंगधी असतात कीं, त्यांच्या सुंगधानें रात्रीं आसमंतातला बराच प्रदेश व्यापिला जातो. उजाडलें कीं ह्या झाडावर फुल दिसत नाहीं मग सुंगध कोठला?

**दुध काढण्याचें यंत्र**—एका फ्रेंच गृहस्थानें विद्युच्छक्तीनें दुध काढण्याचें यंत्र काढलें आहे. हें यंत्र गाईच्या स्तनाला लाविलें ह्मणजे वासरूं पीत आहे असा भास होऊन ती दूध देते. गाईला हातानें दूध काढण्यानें त्रास होतो, पण या यंत्रापासून तसा होत नाहीं. शिवाय हवेंतील अशुद्ध द्रव्यें न मिसळतां हें दूध काढतां येतें व तें पुष्कळ वेळ ताजेंही राहतें.

**फांशी जातां जातां बांचला**—कलकत्त्याकडे एक कोळी जातीची स्त्री नाहींशी झाली होती व पोलिसांस खबर देण्यांत आली होती. पुढें तेथील मॅजिस्ट्रेटास एक निनांवी पत्र आलें, त्यांत सदर स्त्रीचा खून हरी खडुं या नांवाच्या इसमानें केला आहे असा मजकूर होता. त्यावरून यास पकडून त्यावर खुनाची शाबिती झाली. पण हरीनें आपण निर्दोषी आहोंत असें सांगून कोर्टाकडून दहा दिवसांची मुदत मागून घेतली व त्या मुदतींत सदर स्त्रीचा पत्ता लावून तिला पोलिसांसमोर उभें केलें. त्यामुळें त्याजवर आलेला आरोप टळून तो फांशी जातां जातां बाचला. कशी आहे पोलीस शिताफी.

**अकरा वाजतां घरीं आलेंच पाहिजे**—लुनेबर्ग प्रांतांतील उएल्झेन येथील अधिकाऱ्यांनीं असा कायदा केला आहे कीं, सर्व विवाहित पुरुषांनीं रात्रीं अकराच्या आंत घरीं आलेंच पाहिजे. हा कायदा तेथील स्त्रियांना फार पसंत पडला आहे. ह्या कायद्याचें उल्लंघन करणाराला दहा शिलिंग दंड ठरविला आहे. ह्या दंडापैकीं निम्मे रकम फिर्यादीला—अर्थात् आरोपिच्या बायकोला— देण्यांत येते. आपल्याकडे असाच कायदा पाहिजे आहे.

**पांढरे शुभ्र हात**—हात पांढरे स्वच्छ रहावे अशी इच्छा असल्यास ते कढत दूधपाण्यांत कित्येक दिवसपर्यंत रोज तीनदां धूत जावे.

**शतावधानी**—रा. रा. नारायण मार्तंड सुखात्मे शतावधानी हे हल्लीं पुणें येथें आले आहेत हे सुमारें ८१ वर्षांचे असूनही अद्याप शतावधानें चांगलीं चालवितात.

**मजेचा कायदा**—फिजी बेटांत असा एक कायदा आहे कीं, जर एखादे वेळीं राजाचा पाय निसटला तर त्याच्या जवळ हजर असलेल्या सर्वांनीं आपले पाय निसटूं द्यावें आणि कदाचित् राजा पडला तर सर्वांनीं धडाधड जमिनीवर लोटांगणें घालावीं.

**माणसाचीं डोकीं जमविण्याची चाल**—बोरनिओ बेटांत एक जातीचे लोक राहतात त्यांमध्यें माणसांच्या डोक्यासंबंधानें फार विलक्षण तऱ्हेचा समज आहे. माणसें मारून त्यांचीं डोकीं जमवून ठेवणें हें मोठें बहादुरीचें व सन्मानाचें कृत्य असें ते मानतात जसजशीं घरांत माणसांच्या डोक्यांची संख्या जास्त सांपडेल तसतसा त्या घराचा मालक जास्त वजनदार आणि मोठा ऐपतवान् समजला जातो. या कारणानें त्या जातींतील लोक नेहमीं माणसें मारून त्यांची डोकीं जमविण्याच्या खटपटींत असतात. व कोणताहि मनुष्य हाताशीं लागला कीं त्याचें डोकें उडविण्यास ते मागेपुढें पहात नाहींत. त्या जातींत एखाद्या तरुण पुरुषास लग्न करणें झाल्यास त्याजवळ असलेल्या माणसांच्या डोक्यांचा ढीग त्याच्या भावी बायकोपुढें रचावा लागतो. ह्मणजे ती डोक्यांची मोठी रास पाहून खूष होते व त्याच्याशीं लग्न लावण्यास तयार होते. जर कोणा जवळ माणसांची डोकीं नसतील तर त्याचें लग्न होणें कठीण पडतें. जर या जातींतील पुरुषांस आपल्या शत्रूचें डोकें मिळूं शकलें नाहीं, तर ते आपल्या मित्राचें डोकें उडविण्यास सुद्धां मागेंपुढें पहात नाहींत. जमिनींत पुरलेलीं माणसांचीं प्रेतें सुद्धां ते हुडकून काढून त्यांचीं डोकीं आपल्या घरच्या संग्रहांत ठेवतात. एखाद्या मिळकतीसंबंधानें कोर्टांत दोन इसमांमध्यें दावा चालू असला, तर त्यांपैकीं ज्याच्याजवळ डोक्यांची संख्या जास्त आढळेल त्याचा हक्क अधिक शाबित ठरतो. या जंगली लोकांचें मंदीर ह्मणजे माणसांच्या डोक्यांनीं भरलेली एक खोली असते. हल्लीं या लोकांतील ही भयंकर चाल बंद पडत चालली आहे,

**वृश्चिकदंशावर उपाय**— जमिनीवर पाणी शिंपडून त्या ठिकाणीं दंश झालेल्या मनुष्यास बसवावें आणि दंश झालेल्या ठिकाणापासून तों कळा चढल्या असतील तेथपर्यंत शरीराच्या भागावर राख चोळीत रहावें ह्मणजे वेदना बंद होतात.

**पीक चांगलें देण्यास उपाय**—गहूं, ज्वारी, बाजरी, हीं पेरण्यापूर्वीं दोन तीन तास जनावरांचे मुतांत भिजवावीं आणि मग चुन्याचे पिठांत घोळून त्यांची पेरणी करावी ह्मणजे पीक जोमांत येऊन या पिकास काजळ्या रोग होण्याची भीति नाहीं.

**चमत्कारिक अंत्य विधी**—कित्येक देशांतील अंत्यविधी तर इतके भयंकर आहेत कीं, ते वाचून अंगावर शहारे येतात तिबेटमधील लोकांत मनुष्य मरण पावलें, ह्मणजे त्याच्या शरीराचे तुकडे तुकडे करून ते नदींत माशांस खाऊं घालतात. नॉर्वेमधील अस्सल वतनी लोक मनुष्याचें प्रेत अर्धेंमुर्धें जाळून तें समुद्रांत फेकून देतात. अबिसिनियामधील हबशी लोक प्रेत नदींत फेकून देतात, किंवा मेलेल्या मनुष्याच्या बिछान्या शेजारीं खाडा खणून त्यांत प्रेत पुरतात. असिरि मधील बाबिलोन प्रांतांतील वतनी लोक प्रेत सडूं नये ह्मणून तें मधांत किंवा दुसऱ्या अशाच पदार्थांत घालून राखून ठेवतात. ते प्रेतास कधीं जाळीत नाहींत. केनरी टापूमधील लोक मेलेल्या माणसाचें प्रेत उन्हांत सुकवून नंतर त्यावर वार्निस चढवितात. फ्रान्स आणि बेलजियम मधील पहाडांतील गुहांत एक प्रकारचे लोक राहतात, त्यांत मनुष्य मृत्युपंथास लागल्यापासून त्यास स्मशानांत नेतात व तेथेंच त्याचा अंत होतो. सिकिममध्यें मनुष्यास जाळून त्याची रक्षा चारी दिशांस उडवितात. आशियाच्या ईशान्येकडील अलास्का वगैरे भागांत मृत मनुष्याचें प्रेत टेंकडीच्या शिखरावर पुरतात व तेथून जातां येतांना लागणाऱ्या प्रत्येक कबरीवर एक एक धोंडा फेकतात. अमेरिकेमधील चिनी जातीच्या इंडियन लोकांत मृत मनुष्याचें प्रेत झाडास टांगून ठेवतात. व तें पक्षी कुरतडून खात असतांना प्रेताबरोबर आलेले सर्व लोक पाहत उभे राहतात या प्रेताबरोबर खानपानाच्या वस्तू, हत्यारें, तंबाखू.वगैरे बांधून ठेवण्यांत येतात. त्या मृत मनुष्यास स्वर्गलोकीं उपयोगी पडतात असा त्या लोकांचा समज आहे.

**मनुष्याचें वजनावर कर**— स्विडनमधील म्युनिसिपालिटी ठराविक इयत्तेपेक्षां जास्त वजनाचे माणसापासून कर घेते. त्यांनीं एकशें पस्तीस रत्तल वजनाचे माणसास कर माफ ठेवला आहे. यापेक्षां जास्त वजनाचे माणसापासून कर घेतात. ही पद्धत आपल्या परम दयाळू सरकारानें इकडे सुरू केली असतां कदाचित् कराचे भयानें तरी सुखावलेले दोंदील प्राणी मुत्सुद्दीत होऊन उद्योगास लागले असतां आपल्या हतभागी देशाची उन्नति होण्याचा संभव आहे.

### काळ्यांचा विटाळ नको

आफ्रिकेंतील इंग्रजी वसाहतींचे सेक्रेटरी मि० आलफेड लिटिलटन ह्यांनीं गेल्या महिन्यांत वसाहतींतील कांहीं पाहुण्यांना एक मेजवानी दिली. त्या प्रसंगीं त्यांनीं स्पष्ट ह्मटलें कीं वसाहतींतील लोक हिंदुस्थानांतील काळ्या लोकांना मोठ्या क्रूरतेनें वागवितात, त्यांच्यावर नानाप्रकारचे जुलूम चालवितात व ब्रिटिश साम्राज्यांतील इतर देशांतील लोकांना आपल्या वसाहतींत येऊं देत नाहींत. वसाहतवाल्यांच्या ह्या वर्तनाबद्दल मला मुळींच वाईट वाटत नसून, उलट त्यांच्या वर्तनाचें मला कौतुक करावेंसें वाटतें. अशा तऱ्हेच्या वर्तनापासून हिंदुस्थानच्या काळ्या लोकांच्या मनांत इंग्रजी राज्याविषयीं असंतोष व तिटकारा उत्पन्न होण्याचा संभव आहे. असें कित्येकांचें मत आहे. पण माझ्यामतें हिंदी लोकांच्या मंद डोक्यांत असंतोषाची कल्पनाच शिरणार नाहीं. बरें यदा कदाचित् शिरली तथापि काळ्या लोकांच्या संसर्गानें गोऱ्या लोकांची जात विटाळण्यापेक्षां हिंदी लोकांना असंतोष पत्करला पण काळ्या लोकांचा विटाळ उपयोगी नाहीं.

### सुभाषितें—

आरोग्यामुळें संपत्ति मिळते, पण संपत्तीमुळें आरोग्य मिळतेंच असें नाहीं.

जो दुसऱ्यास खड्ड्यांत पाडावयास पहातो, तो आपल्या नाशाचीच तयारी करतो.

आपल्या गुणांचें चीज होत नाहीं ह्मणून ज्यांना वाईट वाटतें,त्यांच्या हातून दुसऱ्यांच्या गुणांचें चीज होत नाहीं.

प्रत्येकानें पहिली गोष्ट करायला पाहिजे ती ही कीं त्यानें आपल्या कामावर प्रेम केलें पाहिजे.

“ज्या राष्ट्रवासी लोकांना आपल्या पूर्वजांच्या भव्य कृतीबद्दल बिलकुल अभिमान वाटत नाहीं, त्यांच्या हातून त्यांच्या वंशजांस अभिमान वाटण्यासारख्या स्मरणीय कृती कधींही होणार नाहींत.”